म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३०९९

REFBK-0024616

गो.रा.जोशी

नाट्यपंढरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 JUI 1985

2 1 AUG 1985

2 8 AUG 1985

2 0 NOV 1985

7 NOV 1990

2 5 NOV 1990

1 DEC 1990

9/92


17 APR 1991

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ : जिनेंद्र दिगंबर जैन मंदिर अयोध्या

३०११
२८६१६
१२१६।८५

~~२८६० ३०११~~
१२१६।८५
२५६१६



संदर्भ निबंध
३०९९
३४६१६
नराधत्य

रंगभूमीच्या हृद्य आठवणी....

नाट्यपंढरी

गो. रा. जोशी

REFBK-0024616

राजहंस प्रकाशन, पुणे–४११०३०

नाट्यपंढरी

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पार
पुणे – ४११ ०३०

© सर्व हक्क स्वाधीन

मुखपृष्ठ – चारुहास पंडीत

प्रथमावृत्ती १० मार्च १९८५

मुद्रक
अजित शशिकांत देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

किंमत वीस रुपये

अक्षत :

मराठी माणूस नाटकाचे वेड घेऊनच जन्माला येतो म्हणाना ! नाही– तर सांगलीकरांकडे सुखात कालक्रमणा करणाऱ्या विष्णूदास भाव्यांनी नाटकाचा प्रपंच कशाला मांडला असता ? कमिशनरच्या कचेरीत, चांगल्या सरकारी नोकरीत रमलेल्या अण्णासाहेब किर्लोस्करांना शाकुंतल उभं करण्याची लहर का यावी ? राजापूरचा गणू (गणपतराव जोशी) साता-रच्या ' शाहूनगरवासीं'त कसा पोचला ? शाहूमहाराजांनी औषधपाण्या-साठी मिरजेला धाडलेला बालके नारायण (बालगंधर्व) ' किर्लोस्कर संगीत'मध्ये कसा गुंगावा ? मुंबईत गिरगावात कंपौडरी करणाऱ्या केशवराव दात्यांची पाऊले नाटकाकडेच का वळावी ? व्युत्पन्न विद्वान घराण्यात जन्माला येऊन घरच्या पद्यकारितेकडे पाठ फिरवून नाटकात जाण्याचीच बुद्धी चिंतामणराव कोल्हटकरांना का व्हावी ?

याचा अर्थच असा की मराठी माणसाला " नाटक " हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. हे सारे अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

माझे वेड नि व्यवसाय यांचा सांधा जुळला नाही. मला जुळविता आला नाही म्हणा हवे तर ! पण जमिनीत लपून बसलेले टाकळा, चवेण, पाऊस पडताच कशी उरारून मान वर करून उभी रहातात, तसे माझे नाटकाचे वेड मला सदोदीत ताजेतवाने ठेवीत आले आहे. त्याच छंदातून ही ' नाट्य पंढरी'ची वारी घडली. त्यातून मी मुळचा महाडचा. महाडच्या मातीतच नाट्य आहे. मराठी रंगभूमीचे विद्यापीठ म्हणून जिचा गौरवाने

उल्लेख करतात ती 'महाराष्ट्र नाटक मंडळी' महाडातच जन्माला आली इतके सांगितले म्हणजे पुरे.

माझ्या लहानपणी आमच्या गावात लग्नाचे बोलावणे करण्यासाठी "अक्षत" फिरत असे. रुबाबात पगडी, नाही तर फेटा बांधलेले, अंगावर जरीकाठी उपरणे घेतलेले यजमान, नि बरोबर दागिन्यांनी मढलेली लफ्फेदार टोपपदरी लुगड्यात यजमानीणबाई. बोलावण्याचा फॉर्मिला ठरलेला असे. अमक्यांचा मुलगा, तमक्याची मुलगी, इतक्या वाजताचं लग्न मुलीवाळी-लेकीसुना-पैपावणा (पाहुणा) सगळ्या सगळ्यांनी लग्नाला नि जेवायला यायचं बरं का! त्याच चालीवर मी इतकेच म्हणेन नट-नाटककार-नाटकमंडळ्या नि त्या परिसरातल्या, या "नाट्यपंढरी" त माझ्या ओबडधोबड शब्दात सांगितलेल्या आठवणी गोड करून घ्यायच्या बरं का? तरी पण त्या गोड आहेत की कडू आहेत, (खुसखुशीत खमंग आहेत) की चिवट आहेत, टिकाऊ आहेत की टाकावू आहेत, हे सांगण्याचा अधिकार तुम्हाला आहेच.

'माणूस' मध्ये या आठवणी छापून येत असता, ज्यांनी पत्रानी नि प्रत्यक्ष भेटून माझे कौतुक केले, प्रोत्साहन दिले, त्या सर्वांचा मी उपकृत आहे. "माणूस" च्या माजगावकर बंधूंनी दाखविलेल्या आपुलकीचे ओझे, माझ्या शिरावरून कधीच न उतरणारे आहे.


इति अलम्! आता उलटा पान.

आपला

ब–४ सारस नगर
९८३/२ शुक्रवार पेठ,
पुणे–४११००२

चित्र फोटो : भरत नाट्य संशोधन मंदिर पुणे यांच्या सौजन्याने.

तीर्थरूप
आई-अप्पांच्या
चरणी



नाट्यपंढरी

लाल, पांढऱ्या नि क्वचित् निळसर कमळांनी भरलेले कमळांचे तळे पाहिले की, आपल्याला काही आगळाच आनंद होतो. क्षणभर आपण आपल्यालाच हरवून बसतो. तेथून दूर आलो तरी त्या आनंदाची सावली आपली साथ करीतच असते.

मराठी रंगभूमीच्या नंदनवनात अशी अनेक फुले फुलली आहेत की त्यांचा दरवळ मराठी मनाला, गेली शे-दीडशे वर्षे सतत सुखवीत आहे. उगीच का मराठी रंगभूमीला केशराचे शेत म्हणतात ? या ना त्या नात्याने रंगभूमीची सेवा करणारी अशी शेकडो कलावंत मंडळी आहेत की, ज्यांच्या वाटचालीत, कळत-नकळत, मौजेचे, सुखदुःखांचे, आनंदाचे अनेक प्रसंग येऊन गेले आहेत. अशा काही प्रसंगांची, नट-नाटककारांची कलाकारांची आठवण करून देण्याचा, ती स्मृतिसुमने रसिकांच्या ओंजळीत टाकण्याचा विशेषतः ती भावबंध तरुण पिढी-पर्यंत पोचविण्याचा मानस आहे. हा रंगभूमीचा इतिहास नाही, खऱ्याखोट्याचा काथ्याकूट नाही, आहे तो केवळ स्मृतिगंध !

❋ वंदन विष्णुदासा

तसे पाहिले तर विष्णुदास भावे यांचे 'सीतास्वयंवर' आख्यान रंगभूमीवर येण्यापूर्वी तंजावरच्या भोसलेराजांनी 'लक्ष्मी-नारायण कल्याण' नावाचे नाटक लिहिले होते. कोकणात खेळे, दशावतार, कर्नाटकात यक्षगान असे काही नाट्यसदृश प्रकार प्रचलित होते. भारूड, लळित ही तर ज्ञानेश्वर-एकनाथांच्या वेळीही होती; पण खऱ्या अर्थाने ते नाटक नव्हते. विष्णुदासी नाटक जन्माला येण्याआधीच्या त्या प्रसूति-वेदना होत्या. नाटकाच्या जवळपास येणारी ती नाटकाची रूपडी होती.

प्रथम भाव्यांनी सोंगे सजविली, उभी केली. रंगरंगोटी करून, विदूषक, देव, राक्षस अशी पात्रे त्या त्या वेषात आख्यानानुसार रंगमंचावर येऊ लागली. पडदा आला, देवांची कचेरी (सीन), राक्षसांची कचेरी, असे प्रवेश आले, सूत्रधार आला. नाटकाची सारी मदार सूत्रधारावर! सारं काही तोच बोलणार, तोच गाणार. बाकीच्या पात्रांनी कथानकाच्या संदर्भात थोडेसे भाषण, काही हालचाली करायच्या इतकेच. सगळीच नाटके पौराणिक असल्याने प्रेक्षकांना ती कथाकीर्तन नि पुराणातून तोंडपाठ झालेली असायचीच.

आज घाशीराम, गगनभेदीसारखी नाटके साता समुद्रापलीकडे जाऊन आली ना, अगदी तसेच भाव्यांचे सीतास्वयंवर जाणार होते. मुंबईच्या स्वारीत (दौऱ्यात) भाव्यांनी मोठ्या जिद्दीने साहेबांच्याच सुसज्ज ग्रँटरोड थिएटरात, त्यांच्याच रंगमंचावर त्याच दिवेबत्त्यांत आपल्या नाटकाचा खेळ करून दाखविला. म्हणतात की, पाचशे रुपये भाडे भरले होते एका खेळासाठी. थोरामोठ्यांची खूप गर्दी होती. खेळाला गव्हर्नरसाहेब हजर होते. प्रयोग पाहून गव्हर्नरसाहेब एकदम खूष झाले. भाव्यांना भेटून त्यांनीच सुचविले नि सुपारीसुद्धा दिली लंडनला खेळ करून दाखविण्याची!

पण परदेशी जाणे म्हणजे अब्रह्मण्यमूचा काळ होता तो! (१८५३-५४ चा सुमार) धर्म बुडेल म्हणून विष्णुदासांनी नकार दिला. काय करणार? खूप सोसले होते त्यांनी. नटाचे तोंड पाहिले तर आंघोळ करीत असत. नाटक केले म्हणून त्यांना नि त्यांच्या सहकाऱ्यांना सांगलीत भर पंक्तीतून उठविले होते!

आता 'ही श्रींची इच्छा' या नाटकाचा पेशव्यांच्या पुण्यात, खुद्द शनिवारवाड्यात प्रयोग झाला, तसा विष्णुदासांच्या सीतास्वयंवरचा मिथिलेत किंवा अयोध्येत खेळ झाला की नाही हे मात्र माहीत नाही!

विष्णुदासांनी सीतास्वयंवर, पारिजात, द्रौपदीस्वयंवर, कीचकवध अशी तीस-पस्तीस नाट्याख्याने रचली. त्यांच्या नाटकांची परंपरा पुढे अनेक वर्ष चालली नाही तरी परवाचे नाटक कालच्यापेक्षा नि कालचे आजच्यापेक्षा जुनेच ठरते.

अण्णा किर्लोस्करांपेक्षा भावे जुने व खाडिलकरांपेक्षा अण्णासाहेब जुनेच नाही का ? पण खरे म्हणजे नाटकात नव्या-जुन्याचा वाद नसतोच. सुसंवादच असतो. जे नाटक आवडते ते नवे. आवडत नाही ते जुने.

एवढं मात्र खरं की, विष्णुदासांनी खऱ्या अर्थाने अस्सल मराठी नाटक उभे केले. विष्णुदास हे एक बहुढंगी व्यक्तिमत्त्व होते, म्हणूनच त्यांच्या हातून नाटक घडले. ते स्वतः आख्यानकार कवी होते, चित्रकार होते. कळसूत्री बाहुल्यांच्या खेळात तरबेज होते. कवित्व, कुंचला नि रंग यांच्या बळावर ते सोंग सजवू शकले, नाटकाचे खेळ सिद्ध करू शकले; पण गंमत अशी की, खुद्द विष्णुदासांनी मात्र कधी तोंडाला रंग लावला नाही ! नाट्यरंगी रंगले नि मराठी माणसाला नाटकाचा निखळ आनंद दिला. मराठी रंगभूमीच्या या जनकाला विनम्र अभिवादन !

❋ सतीची ओटी भरायला तोबा गर्दी !

विष्णुदास भावे स्वतः आपली नाटके घेऊन पुणे, मुंबई, कोल्हापूर, नगर अशा प्रमुख शहरात फिरत. त्यांच्या या स्वाऱ्या-दौरे दहा बारा वर्षे चालू होते; पण सहकारी मंडळी ही अशिक्षित असल्याने त्यात फाटाफूट झाली नि दौरे थांबले. परंतु विष्णुदासांच्या नाटकांना तुफान लोकप्रियता लाभली होती. विष्णुदासांची कुलपरंपरा पुढे वीस-पंचवीस वर्षे निरनिराळ्या नाटकमंडळ्या चालवीत होत्या. विष्णुदासांची पौराणिक नाटके हेच त्यांचे मुख्य भांडवल होते. ज्याला आज आम्ही ' पथनाट्य ' म्हणतो, तेच विष्णुदास सुरुवातीला करीत होते. रस्त्यात, वाड्याच्या आडोशाला, वळचणीला नाटके उभी करीत होते. त्यांच्याच चिकाटीने, सतत प्रयत्नाने तेच नाटक थिएटरपर्यंत पोचले. शिष्टसंमत झाले. लोकमान्य झाले, लोकप्रिय झाले.

मुहूर्ताचा नारळ फुटला, कंपनी कधी फुटणार ? हा गडकऱ्यांचा सुप्रसिद्ध विनोद क्षणभर बाजूला ठेवू ; पण कंपन्या फुटल्या, नव्या कंपन्या निघाल्या म्हणूनच ना नवी नवी नाटके नि नवे नवे कलाकार उदयास आले ? सांगलीकर, आळतेकर, कोल्हापूरकर, इचलकरंजीकर अशा एकाहून एक किती तरी संस्था सुरू झाल्या. प्रत्येकीचे काही ना काही वैशिष्ट्य होतेच; पण मूळ विष्णुदासी नाटकच होते. भाव्यांची पौराणिक नाटके सर्रास सगळ्या नाटकमंडळ्या करीत होत्या. त्या वेळी ' मोनापली ' नव्हती. काहीजण त्यांच्या नाटकांची मोडतोड करीत होते. काही अधिक चांगले घालीत होते. उत्तम खेळ करीत होते. नवी जडण-घडण होत होती. मलिन मागे टाकीत, चांगले घेत घेत ही विष्णुदासांची नाट्यगंगा अखंड वाहात होती.

मग इंग्रजी विद्येचा सुकाळ झाला. पाश्चात्य नाटके विद्वानांना पहायला मिळू लागली. संस्कृत नाटके भाषांतरित होऊ लागली. चांगली भाषा, विनोद

कानावर पडू लागला. उत्तम अभिनयाची जाण आली. नटांना विद्वानांचा सहवास लाभला नि मग 'अलल डुर्र ऽऽ' नि 'तगडतोम्' नाटकांना ओहोटी लागली. (अलल डुर्र ऽ म्हणजे भावेकालीन नाटकात राक्षसपार्टी आलाला... असे ओरडत स्टेजवर येई. त्याची चेष्टा करण्यासाठी, तो 'आलाला' असे ओरडला की विदूषक त्याच्या मागून डुर्र.... असे ओरडे. 'तगडतोम्' म्हणजे राक्षसाच्या आरोळ्यांना 'तगडतोम् तगडतोम्' अशी पखवाजावर केलेली जोरदार साथ- या प्रकारामुळेच सुशिक्षित मंडळी या नाटकांचा उल्लेख अलल् डुर्र... नि तगडतोम् नाटकं असा करीत) 'बुकिश' नाटकांचा जन्म झाला. बुकिश म्हणजे ज्याचे बुक-पुस्तक तयार झाले, छापून प्रसिद्ध झाले असे नाटक. कारण पूर्वीच्या नाटकांची संहिता नसे. पहिले बुकिश नाटक रंगभूमीवर आले ते श्री. वि. अ. कीर्तने यांचे 'थोरले माधवराव पेशवे' इचलकरंजीकर मंडळींच्या रंगभूमीवर! (१८६१-६२).

या नाटकात श्रीमंत माधवरावांच्या निधनानंतर रमाबाई सती जातात असा प्रवेश आहे. त्या प्रवेशात श्रीमंत रमाबाई पांढरे वस्त्र परिधान करून, कपाळी कुंकवाचा मळवट भरून, केस मोकळे सोडून सती जाण्यासाठी प्रवेश करतात. काही स्त्रिया तिची खणानारळाने ओटी भरतात. अर्थात त्या काळी रमाबाई हा एक स्त्री पार्टीच होता. नि ओट्या भरणाऱ्या स्त्रियाही पुरुषच होते; पण त्या कंपनीच्या चालकांनी एका प्रयोगात रमाबाईची ओटी भरण्यासाठी गावातल्या थोरामोठ्यांच्या काही प्रतिष्ठित बायकांना पाचारण केले. सीन सुरेख रंगला; मग काय विचारता? पुढच्या प्रयोगापासून सतीच्या दर्शनाला नि ओट्या भरायला स्त्रियांची तोबा गर्दी नाटकाला होऊ लागली. स्टेजवर गव्हा-तांदळाच्या नि खणा-नारळाच्या राशी पडू लागल्या! हाच प्रवेश दोन दोन तास चालू लागला! बिचारी रमाबाई (विष्णू वाटवे हा स्त्रीपार्टी रमा होत असे) मात्र पार अवघडून आणि दमून जात असे! सातारच्या श्रीमंत सगुणाराणीसाहेबांनी हा खेळ खास आपल्या राजवाड्यात करवून श्रीमंत रमाबाईची गव्हाबरोबर मोती घालून ओटी भरली! वस्त्रालंकार दिले. रमा हा पुरुष आहे ही भावनाच नाहीशी झाली, इतके सुरेख काम विष्णू वाटवे करीत असे!

वाटवे फार देखणा होता. त्याची खुद्द राणीसरकारांनी ओटी भरली. म्हणून त्या वेळेपासूनच पुढे 'भाऊराव कोल्हटकर, नारायणराव बालगंधर्व हे हळदीकुंकू घेऊन आले; पण त्यांना कुणी ओळखले नाही. या सारख्या दंतकथा प्रचारात आल्या. आजही काही जुनी मंडळी या गोष्टी मोठ्या चवीने सांगत असतात; पण त्याचे मूळ त्या गुणी कलावंतांविषयी अपार प्रेम नि विष्णुपंत वाटव्यांच्या हळदीकुंकवाच्या सीनमध्येच असावे.

❋ वॅगन्स भरून फुले !

बुकिश नाटकाने रंगभूमीचा एकदम कायापालट झाला. तिचे रंगरूपच बदलले. संहितेबरहुकुम नाटकाचा प्रयोग होऊ लागला. त्यातला फाफटपसारा कमी झाला. नेटके नेपथ्य आले. अभिनयाचा दर्जा उंचावला. खऱ्या अर्थाने नाटक वास्तवाकडे वळले.

सुशिक्षित मंडळी, विशेषतः कॉलेजमधली प्राध्यापक मंडळी त्यात रस घेऊ लागली. संस्कृत नाटकांची भाषांतरे होऊ लागली. शेक्सपिअरची नाटके मराठी रंगभूमीवर येऊ लागली. स्वतंत्र सामाजिक नाटकांची रचना होऊ लागली. रंगभूमीचा नवा मन्वंतर सुरू झाला म्हणा ना ! या साऱ्या नवलाईचे प्रेक्षकांनी मनःपूर्वक स्वागत केले.

मृच्छकटिक, वेणीसंहार, अथेल्लो, किंगलिअर अशी नाटके खुद्द सुशिक्षित मंडळींनी सादर केली. यात मराठी नाटके करण्यात कोल्हापूरचे राजाराम कॉलेज आघाडीवर होते. या कॉलेजमध्ये प्रिन्सिपॉल कँडी हे फार रस घेत नि शक्यतो सारी मदत करीत. डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृत नाटके होऊ लागली. पुण्यातच 'आर्योद्धारक' नावाचा विद्याविभूषित तरुण मंडळींचा एक ग्रुप, मंडळ तयार झाले. त्यांनी नाटकात सर्वांगीण सुधारणा घडवून आणल्या. नाटकांचे प्रयोग करून ही मंडळी सामाजिक कार्यांना मदत करीत.

यातूनच पुढे फर्ग्युसन कॉलेजमधील विद्वान प्रोफेसर श्री. वासुदेवराव केळकर नि शंकरराव रानडे यांच्या प्रेरणेने नि मार्गदर्शनाने नटसम्राट गणपतराव जोशी यांनी आपल्या 'शाहूनगरवासी नाटक मंडळी' द्वारे झुंजारराव (अथेल्लो), त्राटिका, हॅम्लेट, कांचनगडची मोहना ही समर्थ नाटके उभी केली. 'जुने जाउद्या मरणा लागुनि' या केशवसुतांच्या उक्तीप्रमाणे 'तगडतोंम्' किंवा 'आमटी' नाटके संपली. संगीत नि गद्य नाटकांची वेल फुलू लागली.

मराठी रंगभूमीच्या या संक्रमणकाळात 'कालिदास एल्फिन्स्टन सोसायटी' या मुंबईतल्या सुशिक्षित मंडळींनी शाकुंतल नाटकाचा इंग्रजी प्रयोग केला. हेतू हा की, इंग्रज लोकांना आपल्या नाटकाची ओळख व्हावी. नाटक इंग्रजीत असले, तरी त्याचे नेपथ्य, वेशभूषा, केशभूषा सारे काही अस्सल भारतीय, मराठीच होते. नाटक वास्तव करण्याच्या दृष्टीने, सीनसिनेरीसाठी या मंडळींनी अफाट खर्च केला होता. शकुंतलेसाठी चारशे रुपये खर्च करून मद्रासहून वल्कले मागविली होती. शकुंतलेच्या पुष्पशय्येच्या प्रवेशासाठी खास पुण्याहून दोन रेल्वे-वॅगन्स भरून फुले आणवली होती. याला म्हणतात हौस !

❋ धूप दरवळू लागला !

विद्याविभूषित मंडळींनी नाटकात सर्वतोपरी सहभागी होऊन तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होतीच. अनेक गद्य नि संगीत नाटके लोकप्रिय होत होती; पण त्यात यशाचे शिखर गाठले ते अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाकुंतलाने (१८८०), करमणुकीचे शिष्टसंमत दालन, लोकमान्य प्रकार म्हणून शिक्कामोर्तब झाले, ते अण्णांच्या शाकुंतलापासून. नवविवाहित युगुले, लग्नाच्या पहिल्या रात्री कौतुकाने नाटकाला जाऊ लागली ती शाकुंतलापासूनच. त्यांचे हे नाटक म्हणजे, अण्णांनी हंसक्षीर-न्यायाने निवडलेल्या जुन्या संगीत नि गद्य नाटकातल्या गुणविशेषांचा सुंदर मिलाफच होता म्हणा ना ! त्यांना या नाटकाची स्फूर्ति ' पार्सी थिएट्रिकल ' च्या इंद्रसभा या ऑपेरासारख्या नाटकातून मिळाली असली तरी शाकुंतलापूर्वी त्याची मराठी रंगभूमीशी जवळीक होतीच. पौराणिक नाटकांसाठी खूप कविता रचल्या होत्या. नाटकांचे बारकावे न्याहाळले होते. म्हणूनच त्यांच्या हातून अशी प्रासादिक कलाकृती निर्माण झाली. त्यांच्या शब्दात सांगायचे तर ' कालीदासकविकृत ' शाकुंतलाची मराठीत गद्यपद्यात्मक रचना केली. ' गानी शाकुंतल राचिले '

हे नाटक, मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, शंकरराव मुजुमदार यांना बरोबर घेऊन रंगभूमीवर आणले. तसे हे प्रायोगिकच नाटक होते; पण त्यांच्या अपूर्व यशाने ' किर्लोस्कर संगीत मंडळी ' ला जाणत्यांनी नि रसिकांनी, मोठ्या आग्रहाने व्यवसायाची वाट दाखविली.

मोरोबा वाघोलीकर तर दुष्यंताची भूमिका करणार होते. उत्तम गायक म्हणून त्यांचा लौकिक होता. विशेषतः त्या काळी लोकप्रिय असलेला लावणीबाज त्यांना उत्तम अवगत होता; पण त्यांनी नाटकात काम केले नव्हते. साहजिकच ते मनातून घाबरले होते. ते त्यांचे गुरू जंगलीमहाराज यांच्याकडे गेले, नि म्हणाले, ' महाराज, तुम्ही आज नाटकाला या. तुम्ही असलात म्हणजे मला धीर येईल. माझे काम चांगले वठेल ! त्यावर महाराज किंचित हसून म्हणाले, ' अरे मोरू, मी कसा नाटकाला येणार ? मी नाटक पहात नाही.' आपल्या उत्तराने झालेली मोरोबांची नाराजी त्यांच्या लक्षात आली. लगेच ते म्हणाले, ' अरे मोरू, ये ऊदी घे. नाटकाच्या आधी हा ऊद घाल. तुझे काम सरस होईल.' झाले, भाबडे मोरोबा एकदम खूष झाले. थिएटरवर येताना चांगला शेरभर ऊद–धूप घेऊन आले. खेळ सुरू होण्यापूर्वी महाराजांनी दिलेली प्रसादाची ऊदी त्यात मिसळून भक्तिभावाने तो सगळा ऊद–धूप घातला. मराठी रंगभूमीवर धूप दरवळला तो त्या दिवसापासून. शाकुंतलाच्या पहिल्या प्रयोगापासून ! त्या दिवशी ' अमृतसिद्धी ' योग होता.

(३१ ऑक्टोबर १८८०, रविवार, अश्विन वद्य त्रयोदशी शके १८०२ अमृतसिद्धी योग, आनंदोद्भव नाट्यगृह, पुणे) म्हणूनच हा नाट्यसुगंध धुपाचा दरवळ आपल्याला आजही सुगंधीत करीत आहे, सुखवीत आहे. नांदीचे सूर कानी पडतात ते धुपाच्या सुगंधात भिजूनच ! मग ते नाटक सदासुखद सौभद्र– संशय-कल्लोळ असो, नाही तर लफडा सदन वा 'आज धंदा बंद आहे' असो. धूपाचा दरवळ आहेच नि हवाच !

भाऊराव आले !

अण्णांचे शाकुंतल रंगभूमीवर आले नि किर्लोस्कर मंडळीची कीर्ती चहूकडे पसरली. खरे म्हणजे गंमत म्हणून फार तर एक वर्ष अधूनमधून 'शाकुंतला'चे प्रयोग करून पुणेकर प्रेक्षकांचे रंजन करावे एवढेच अण्णांच्या मनात होते. व्यवसाय करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात कधीच नव्हती; परंतु शाकुंतल नाटक रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. मित्रांनी मुंबईला प्रयोग करण्याची गळ घातली. खेळांना उत्पन्न चांगले होऊ लागले नि सहाजिकच अण्णा नि त्यांचे सहकारी या व्यवसायात रंगले. गुळवे सावकारांनी भांडवलाची सोय केली नि 'किर्लोस्कर संगीत मंडळी' ही व्यावसायिक नाटक मंडळी झाली.

आता व्यावसायिक दृष्टीने अण्णांनी पात्रांची जमवाजमव सुरू केली. सौभद्रचे कथानक त्यांच्या डोक्यात घोळत होते; पण सुभद्रेच्या भूमिकेसाठी गाणाऱ्या स्त्रीपात्राची जरूर होती. शाकुंतल नाटकात शंकररावांनी शकुंतला सुरेख उभी केली, तरी त्यांना गाता येत नव्हते हे वैगुण्य होतेच. गाणाऱ्या पात्रांची शोधाशोध सुरू झाली.

बडोद्याच्या बापूबुवा कोल्हटकरांची दोन देखणी मुले, बुवांच्या मागे कीर्तनात साथ करतात, अशी बातमी अण्णांच्या कानांवर आली. मोठा मुलगा अप्पा नि धाकटा भाऊ. मोठ्याची गाण्याची तयारी चांगली होती. तो तबलाही उत्तम वाजवी. अण्णांनी हा मुलगा मिळविण्यासाठी मोरोबा वाघोलीकरांची बडोद्याला रवानगी केली. मोरोबांनी हरिदासबुवांची भेट घेऊन मोठ्या मुलास कंपनीत पाठविण्याची विनंती केली. त्यांनी ती नाकारली. कारण त्याला बडोद्याला इंजिनिअर खात्यात नोकरी होती. 'बरे, निदान धाकट्याला तरी द्या' असा मोरोबांनी आग्रह धरताच, होय–नाही करीत अखेर बुवांना रोख पाचशे रुपये देऊन, ते धाकटया मुलाला घेऊन पुण्याला आले. तेच रंगशारदा, रंगदेवता, संगीत रंगभूमीचे ब्रह्मकौस्तुभ–भाऊराव कोल्हटकर !

भाऊराव आले नि अण्णांचा उत्साह शतगुणित झाला. आपल्याला हवी तशी सुभद्रा सापडली म्हणून अण्णांच्या सौभद्राने वेग घेतला. भाऊरावांचे लावण्य लक्षात घेऊनच सुभद्रेची भूमिका साकार होऊ लागली. 'सुवर्ण केतकीपरी जो

दिसतो वर्ण नव्हे तो सुसरीचा' यासारख्या भाऊरावांच्या रूपाचे वर्णन करणाऱ्या पद्यपंक्ती अण्णांच्या लेखणीतून अगदी सहज उतरल्या. आता 'शकुंतला' ही गाऊ लागली–

शंकरराव मुजुमदारांच्या जागी भाऊराव 'शकुंतला' म्हणून उभे राहिले. दुधाला केशरकाडी लागली, सुवर्णाला सुगंध लागला. अण्णांचे शिष्योत्तम देवल यांनी अण्णांच्या सांगीवरून शकुंतलेची पदे रचली. अण्णांचे एक सौभद्र सोडले, तर देवलांसारखी सरळ, सुबोध, प्रासादिक पदे आजपर्यंत कुणी केली नाहीत. (अपवाद म्हणून इथे आठव येतो तो ग. दि. मां. चा !) किर्लोस्कर–देवल युती झाली. गुरु–शिष्यांचा संगम झाला तो इथेच. शाकुंतलाच्या कोंदणात किर्लोस्कर देवल ही गुरु-शिष्यांची जोडी चमकू लागली ! रंगभूमीवर पुढे गुरु-शिष्यांची अशीच एक अद्वितीय जोडी गाजली. ती म्हणजे कोल्हटकर–गडकरी. श्रीपाद कृष्ण नि राम गणेश !

आज शंभर वर्षं होऊन गेली, तरी देवलांची शकुंतलेची (भाऊरावांची) अवीट गोडीची, 'सखे अनुसये थांब की बाई', 'मी तप्त जरी मदनशरे...', 'मना, तळमळसी उगीच का असा हळहळसी', 'वृक्षवेल या दोन्हींची जोडी शोभते' अशी किती तरी गाणी पुन्हा पुन्हा ऐकावीशी वाटतात. तरुण गायक–गायिकांना मनापासून म्हणावीशी वाटतात, हीच त्यांच्या ताजेपणाची नेमकी खूण नाही का ?

रसिकहो, आपल्या संगीत रंगभूमीचा भरभक्कम पाया रचला तो शाकुंतल–सौभद्राने ! नि म्हणूनच त्याची 'बरी उभारणी' नव्हे उत्तम उभारणी झाली ना?

❋ अय्या ! रुक्मिणी कशी गात नाही ?

अगदी हवे तसे नि हव्या तशा नटसंचात अण्णांचे 'सौभद्र' रंगभूमीवर आले नि प्रेक्षक आनंदाने बेहोश झाले. (१८ नोव्हेंबर १८८२) शाकुंतलाने समाधान दिले, आनंद दिला; पण सौभद्राने रसिकांना तृप्त केले. नाटक पौराणिक तर खरेच; पण प्रेक्षकांना ते आपल्या आसपास, शेजारी-पाजारी घडणारे वाटले. किंबहुना आपल्या घरातलेच वाटले.

पसंत नसलेल्या वराशी लग्न होणार म्हणून झुरणारी वधू–सुभद्रा. तिच्या भावांनी कृष्ण-बलरामांनी वचनभंग केला म्हणून चिडलेला, विरहव्याकूळ झालेला प्रियकर–अर्जुन. मुखत्यारीने कुटुंब चालविणारा मोठा भाऊ–दादा–बलराम कुणालाही न दुखवता युक्ती-प्रयुक्तीने, गोडीगुलाबीने आपल्या बहिणीचा विवाह तिच्या प्रियकराशीच घडवून आणणारा मिश्किल धाकटा भाऊ–कृष्ण, मध्यस्थ म्हणून, गोड भांडणे लावणारा; पण शेवटी शुभच घडवून आणणारा कळीचा

नारद ! कथानकाला गती देणारी 'कथानके', (धावती गाणी) शब्दमधुर गोड गाणी. ती गाणारे, जणू त्या त्या भूमिकांसाठीच जन्माला आलेले गुणी कलावंत- स्वतः अण्णा, मोरोबा, बाळकोबा नि भाऊराव ! मग काय पाहिजे ?

तरीही एक चोखंदळ पोर आईला विचारीत होती, 'आई, रुक्मिणी का गं गात नाही ? तिचा आवाज बसला आहे का ?' नि ते विचारणे अगदी साहजिकच होते. कारण ह्या नाटकात बलराम गातो, त्या नाटकात रूपसुंदर रुक्मिणीने गाणे म्हणायला नको का ? अहो, पण ती कशी गाणार ? ही भूमिका करीत होते शंकरराव मुजुमदार ! ज्यांनी गाण्याविना शकुंतला सुरेख सजविली ते शंकरराव ! त्यांचे 'दिसणे' हेच गाणे होते ! त्यांचे सु-दर्शन हेच त्यांच्या अभिनयाचे सुदर्शन होते. मामा वरेरकरांनी, रुक्मिणीला गाणी घालून गाती केली होती; प्रेक्षकांना ती पटली नाही. रंगभूमीवर रुजली नाही. टिकली नाही. आता स्त्रियाच रंगभूमीवर कामे करीत आहेत; पण तरीही रुक्मिणी मात्र सुंदरच असावी लागते !

❋ इश्य, हे काय मेलं, मी असताना संन्यास ?

सौभद्रात मोरोबा वाघोलीकर अर्जुनाची भूमिका करीत. एकदा त्यांची बायको नाटक पहायला आली. तिने नाटक कधीच पाहिले नव्हते. नाटक कशाशी खातात हेच तिला नाहीत नव्हते. पहिल्या अंकात अर्जुनाच्या वेषात मोरोबा सुंदर दिसत होते, म्हणून तिला खूप आनंद झाला; पण पुढे चौथ्या अंकात त्यांना संन्यास घेतलेले पाहताच त्या रडू लागल्या. 'मी असताना संन्यास ?' मग वडिलधाऱ्या मंडळींनी 'अहो, ते नाटक आहे खरे नाही !' अशी त्यांची समजूत काढली.

रसिकहो, तुम्हाला खोटे वाटेल; पण ज्या भाऊराव कोल्हटकरांच्या सर्वांग-सुंदर भूमिका पहायला, शंभर-दिडशे मैलावरून लोक जीव टाकीत येत असत, त्याच भाऊरावांच्या पत्नीने त्यांचे एकही काम कधी पाहिले नव्हते. शकुंतला नाही, सुभद्रा नाही, मंथरा नाही. इतकेच काय पण पुढे ते पुरुषभूमिका करू लागले, तेव्हासुद्धा यांचा पुंडरिक, चारुदत्त, कोदंड पाहिले नाही.

मला वाटते, ती माऊली म्हणत असावी, अंतरपाट दूर झाल्यावर डोळे भरून पाहिलं. त्यापरते दुसरे रूप (सोंग) मी नाही ग बाई कधी पहायची. लोक पहातात ती नक्कल पण माझ्यापाशी आहे अस्सल. शंभर नंबरी सोनं ! आणि तेही काही खोटे नाही. उगाच का अण्णांनी, भाऊरावांना 'सुभद्रा' म्हणून समोर ठेवून, अर्जुनाच्या तोंडून सुभद्रेचे यथासांग वर्णन करणारी 'सुवर्णकेतकीपरी जो दिसतो वर्ण नव्हे तो दुसरीचा' नि 'त्या चित्रातुनि सुंदर पुतळी निवडुन मी

करी घेवोनि ' अशी सुरेख पदे रचली ?

❋ अभिनय–गदा उचलण्याचा

मातब्बर नटसंचात सौभद्र चालू होते. दुसऱ्या अंकात, बलराम श्रीकृष्ण सुभद्रेच्या महालात तिच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी येतात. बलरामदादांनी हातात गदा घेऊन ती आवरीत मोठ्या झोकात प्रवेश केला. (खरे म्हणजे बलराम इथे कधीच गदा घेऊन येत नाही) आपआपल्या आसनावर बसताना, बलरामाला गदा टेकून ठेवायला स्टेजवर सोयीची जागा सापडेना. कृष्णाचे काम करीत असलेल्या श्रीपादराव नेवरेकरांच्या ते लक्षात आले. ते लगेच म्हणाले, ' कोण आहे रे तिकडे ही दादांची गदा नेऊन ठेव ! ' एक प्रतिहारी आला नि ती गदा लाटण्यासारखी गरगर फिरवीत घेवून गेला, त्याला कडकडून टाळी पडली; पण तो आत जातो न जातो तोच त्याच्या सणकन श्रीमुखात बसली. गाढवा, बलरामदादांची गदा अशी लाटण्यासारखी फिरवित आणलीस ? त्या बिचाऱ्याला काय माहीत, ती हलकी नि पोकळ असली, तरी ती उचलण्याचा आव आणावा लागतो–अभिनय करावा लागतो ? इथे सहज आठवण होते, ती गडकऱ्यांनी राजसंन्यास नाटकात देहूच्या (पेलवान) हातातल्या ' करेल 'ची ' भीमसेनी लाटणे ' म्हणून केलेल्या उपहासाची–चेष्टेची !

❋ टिळक–आगरकरांचे जेवताना हात थांबले !

कोल्हापूर-प्रकरणाची अलाबला टळल्यावर टिळक-आगरकरांचा डेक्कन कॉलेजमध्ये मोठ्या थाटात सत्कार करण्यात आला. किर्लोस्कर मंडळी नि केसरीचा ऋणानुबंध होताच. सहाजिकच किर्लोस्कर मंडळींच्या लोकांना, मेजवानीचे आमंत्रण होतेच. त्या वेळी जेवणाच्या पंक्तीत श्लोक म्हणण्याची पद्धत होती. भाऊरावांनी ' देवी म्हणे अनार्या ' ही आर्या अशी सुरेल म्हटली (गायली) की त्यांच्या गोड गायनाने जेवणारांचे हात थांबले. सारी पंगत पंधरा–वीस मिनिटे स्तब्ध झाली. गोड गाण्यापुढे गोड खाण्याकडे लक्षच लागेना ! भाऊराव थांबले. सगळ्यांचे, टिळक-आगरकरांचे हातही सुकून गेले होते. सुभद्रेचे सौभाग्य लाभण्याच्या आधीच भाऊरावांच्या रूपा-गाण्याची कीर्ति पुण्यातल्या विद्वान मंडळीत पसरली होती ती अशी !

❋ किती सांगु तुला–

भाऊराव प्रथम शाकुंतलात ' नटी ' म्हणून उभे राहिले नि त्यांच्या दर्शनाने नि गाण्याने प्रेक्षक भारावून गेले. एका रात्रीत ते रसिकाच्या गळ्यातला ताईत बनले ! नटी-सूत्रधाराच्या प्रवेशातले नटीचे शेवटचे पद ' आज मज सहज

आला उल्हास ' हे त्यांनी संपविताच ' तुझ्या मधुर गानाच्या नादे वेडावूनी हा गेला ' हे सूत्रधाराचे पद अण्णांनी सुरू करताच, प्रेक्षकांनी जणू भाऊरावांच्या (नटीच्या) विषयीचा तो आपलाच अभिप्राय आहे अशा आनंदात उस्फूर्त दाद दिली.

❋ सौभद्र–सौभद्र–सौभद्र–

' सौभद्र ' रंगभूमीवर आले नि सारे पुणे सौभद्रमय होऊन गेले. विशेषतः भाऊरावांच्या गाण्याचे सूर नि शब्द दाही दिशांत भरून राहिले. शाळकरी पोरे-सुद्धा ' झाली ज्याची उपवर दुहिता ' रस्त्यात गुणगुणू लागली. गाण्याच्या बैठकीत ' वद जाऊ कुणाला शरण 'ची फर्माईश होऊ लागली. सनईवर तीच गाणी उमटू लागली. पेटीवाले तीच गाणी वाजवू लागले. इतकेच काय गुलहौशी मंडळी कोठीवर (बावनखणीत) गाणारणीला ' अरसिक किती हा शेला ' आग्रहाने गायला लावू लागली.

❋ बुवा, आज सौभद्र लावा !

" सौभद्र " गाजत होते त्या काळात ह. भ. प. शिवरामबुवा इचलकरंजीकर या नावाचे कीर्तनकार आपल्या रसाळ वाणीने नि गोड गळ्याने पुण्यात लोकप्रिय होते. त्यांच्या कीर्तनाला नेहमीच गर्दी असे. नाटकातली गाणीही ते ढंगदार म्हणत. त्यांच्या कीर्तनाचा पूर्वरंग झाला. की लोक आग्रह करीत ' बुवा, आज सौभद्र–आख्यान लावा ! ' बुवाही मोठ्या खुषीत येऊन, कमरेला उपरणे कसून ' झाली ज्याची उपवर दुहिता । चैन नसे त्या तापवि चिंता ' या पदाने, मोठ्या थाटात सुरुवात करून श्रोत्यांना खूष करून सोडीत.

❋ साडी सुटली–शेंडी तुटली

गणपतराव जोशी अकरा–बारा वर्षांचे होते तेव्हा कंपनीत आले. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे गणूला (गणपतरावांना) स्त्रीभूमिका कराव्याच लागत. कधी सरस्वती, कधी दासी अशा भूमिका त्यांच्या वाट्याला येत; पण त्यांना स्त्री-भूमिका करणे मुळीच आवडत नसे; पण करणार काय ? एक दिवस नाचाच्या सीनमध्ये सरस्वतीच्या सोंगात असताना, ठेच लागल्याचा बेमालूम अभिनय करून त्यांनी धाडकन जमिनीवर अंग टाकले. पडदा पडला. कंपनीचे मालक धावत आले. गणूला सावरून ओरडले, ' वेंधळा कुठला, पुन्हा तू या सीनमध्ये उभं राह्यचं नाही ! समजलं ? ' गणू रडण्याचं नाटक करीत होता; पण मनातून हसत होता. त्याला तेच हवं होतं !

आगरकरांचे हॅम्लेट (विकारविलसित) रंगभूमीवर येण्याआधी, ' वीरसेन '

हे हॅम्लेटचे भाषान्तर 'शाहूनगरवासी' करीत असे; पण ते यथातथाच होते. गणपतराव काम करताना कधी डोक्याला रुमाल बांधीत, कधी उघड्या डोक्याने (भरगच्च शेंडीसह) रंगमंचावर वावरत; पण प्रोफेसर वासुदेवराव केळकरांनी जेव्हा गणपतरावांकडे विकारविलसित बसविले, तेव्हा मात्र शेंडीला चाट देऊन, इंग्लिश कट (क्रॉप) ठेवून अपटुडेट, अगदी हवा तसा हॅम्लेट (चंद्रसेन) रंगभूमीवर आला. गणपतराव म्हटलं की, हॅम्लेट नि हॅम्लेट म्हटलं की नटसम्राट गणपतरावच !

❋ ये दाम ले

'शाहूनगरवासी' नाटकमंडळीचे अखेरचे दिवस मोठ्या हलाखीचे गेले. गणपतराव जलोदराने आजारी होते. खेळ होत नव्हते. सहकारी कंपनी सोडून जात होते. जिथे कंपनीचे बिऱ्हाड होते, त्या इमारतीच्या माडीच्या एका खिडकीत, गजांना पाठ टेकून गणपतराव भिंतीकडे पहात पडले होते तोच खाली कुणी तरी मोठ्याने बोलत असल्याचे त्यांच्या कानावर आले. कंपनीतल्या दत्ताच्या फोटोचा हार नि फुले पुरविणारा नेहमीचा फुलवाला, कंपनीच्या दामले या नावाच्या कारकुनाला पैसे मागत होता. दामले त्याला समजावीत होते. 'मालक जरा बरे होऊ देत. त्यांचे एकदा 'हॅम्लेट' लागू दे. तुला दुप्पट पैसे देईन ! मग तर झालं ?' हारवाला उत्तरला, 'अहो ते खरं; पण तुमचे मालक-बुवा सुधारणार नि तुमचा कधी खेळ होणार ? आता वीस-बावीस रुपये झाले, किती थांबायचं ? आमचा संसार कसा चालायचा ? अर्धे तरी आज द्या !' गणपतराव त्यांचे बोलणे ऐकत होते. त्यांना ते सहन होत नव्हते. भावनेच्या भरात त्यांनी आपल्या गळ्यातले नेकलेस खसकन तोडले नि ते खाली फेकीत कडाडले, 'अरे ए दामले, ये दाम ले ! सराफीत नेऊन ते वीक नी त्याचे पैसे दे ! तुझ्या मालकाचं मोठेपण त्याला काय सांगतोस ? ते चुलीत घालून का त्याची चूल पेटणार आहे ?' गणपतरावांचा आवाज कानी पडताच, फुलवाला केव्हाच निघून गेला होता !

❋ इथेही सौभद्रच पहिले !

राक्षसी महत्त्वाकांक्षाकर्ते वीर वामनराव जोशी एकदा मुंबईत आले असता, संदेशकार अच्युतराव कोल्हटकरांकडे गेले होते. गप्पांच्या ओघात 'सर्वांत उत्तम नाटक कोणते ?' असा प्रश्न निघाला. त्यावर वामनराव म्हणाले, 'आपण आपल्या मताप्रमाणे निरनिराळ्या कागदांवर नावे लिहून चिठ्या टाकू !' झाले दोघांनीही नावे लिहून चिठ्या खाली टाकल्या. उघडून पहातात तो दोघांच्याही कागदावर एकच नाव-सौभद्र !

⁂ लुटारू 'किर्लोस्कर अँड को.'

संगीत सौभद्रचे इतके अपरंपार कौतुक झाले खरे; पण तरीही, अण्णांच्या किर्लोस्कर मंडळीची कुचेष्टा करणारे काही गणंग लोक होतेच. सौभद्राच्या खेळानी होणारे अफाट उत्पन्न सहन न होऊन, 'आपण नाटकाचा धंदा करून लोकांना लुबाडता आहा,' असा आरोप होऊ लागला. इतकेच काय किर्लोस्कर मंडळी म्हणजे दुसरी 'वासुदेव बळवंत' (फडके) लुटारू कंपनीच आहे! 'केसरी'कारांनी 'किर्लोस्कर'चे मोठे मार्मिक समर्थन केले आहे.

....किर्लोस्कर आणि को. म्हणजे सरासरी वासुदेव बळवंत आणि को. हिच्याच तोडीची कंपनी! वाः! केवढे जबरदस्त दूषण हे! संगीतवाल्यांनी लोकांच्या हातावर गूळ-खोबरे ठेवून त्यांचे पागोटे हिरावून घेतले काय?.... आमचे तर या प्रकरणी असे ठरीव मत आहे की, उत्तम नाट्य ही मनोरंजनाच्या उत्तम पद्धतीपैकीच एक होय. ती अत्यंत निर्दोष असून, तीस इतर कलांप्रमाणे लोकाश्रय अवश्य पाहिजे. निदान इतके तरी खरे की, ज्याप्रमाणे उत्तम पेढे-बर्फी तयार करून, ती बाजारात विकण्याचा हलवायास हक्क आहे व असल्या दुकानी गिऱ्हाइकांची दाटी झाली असता, त्याने लोकांस टोपी घातली असे होत नाही, त्याप्रमाणेच ज्याच्या अंगी गाण्याचे किंवा अभिनयाचे कसब आहे, त्यानेही गुणावर द्रव्यप्राप्ती करून घेतली, तर त्याने काही गैर केले असे आम्हास वाटत नाही!

⁂ पुंडलीक वरदा

आषाढी वारीचे दिवस होते. रस्त्यात वारकऱ्यांची गर्दी होती. दहा-वीस वारकरी गटागटाने खांद्यावर पताका घेऊन, टाळमृदंगांच्या गजरात चालत होते. 'आर्यभूषण थिएटर'च्या रस्त्याकडील गॅलरीत गणपतराव जोशी (नटसम्राट गणपतराव) उभे होते. काही वारकऱ्यांची नि त्यांची नजरानजर झाली. त्यांनी वारकऱ्यांना भक्तिभावाने नमस्कार केला. वारकऱ्यांनी त्यांच्याकडे हात करून काही मागणी केली. गणपतरावांनी त्यांना थांबा अशी खूण करून ते खाली आले. पाच-सहा वारकरी आर्यभूषणच्या दरवाजापाशी थांबले. 'बोला मंडळी, काय इच्छा आहे आपली?' गणपतरावांनी विचारले. 'काय नाही. दुपारचं भोजन घेऊन, पुढच्या मुक्कामाकडे जाऊ म्हणतो!' वारकरी गणपतरावांनी 'ठीक आहे' म्हणून कंपनीच्या आचाऱ्याला हाक मारली नि त्या मंडळींच्या जेवणाची व्यवस्था करायला सांगितले. तोच त्या वारकऱ्यांचा म्होरक्या पुढे होऊन म्हणाला, 'मालक, आमच्या दिंडीत शंभर-सव्वाशे माणूस आहे, त्यांना टाकून आम्हीच पोटोबा करून कसं चालेल?' एका क्षणाचीही उसंत न घेता, गणपतराव लगेच म्हणाले, 'जा, सगळ्यांना बोलावून

आणा ! तासाभरात तुमचे जेवण तयार होईल ! ' थोड्या वेळाने सर्व वारकरी मंडळी आली. ' पुंडलीक वरदा हरिविठ्ठल'चा गरज होऊन पंगत बसली. गणपतराव हवेनको पहात होते. भोजन आटोपताच वारकरी–गणपतराव गळामिठी झाली नि हरिविठ्ठलाच्या गजरात वारकरी वाट चालू लागले !

❋ वंदीन चरण

७ मार्च १९२१ ला गणपतरावांचे मुंबईत निधन झाले. त्यांच्या अंत्यदर्शनाला रसिकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या. ' गंधर्व ', ' ललित कलादर्श ', ' लोकमान्य ' या कंपन्यांचा मुक्काम मुंबईत असल्याने त्या कंपन्यांचे मालक नि नटवर्गासहित सर्व मंडळी हजर होतीच. तेवढ्यात नारायणराव बालगंधर्व आले. त्यांना अश्रू आवरत नव्हते. गणपतरावांच्या मृतदेहाजवळ गेले. गुलाब-पुष्पांचा खूप मोठा हार घातला. अंगावर भरजरी शेला पांघरला. भरल्या डोळ्यांनी, ओघळत्या अश्रूंनी किती तरी वेळ ते गणपतरावांकडे एकटक पहात होते. जणू मावळता नटसम्राट, आपले सम्राटपद उगवत्याला अर्पण करीत होता ! नारायणरावांनी पदस्पर्श करून गणपतरावांना नमस्कार केला. कदाचित मनात म्हणाले असतील ' देवा, आशीर्वाद असो द्यावा ! '

❋ सौभद्र गणपती

भाऊराव कोल्हटकर आले नि सौभद्राचे पहिले तीन अंक अण्णांनी मोठ्या उत्साहात पुरे केले; पण का कुणास कळे पुढे अचानक गाडी अडली. लिखाण पुढेच सरकेना. एक दिवस मुंबईला, एका दुकानात त्यांना काचेची सुरेख गणेशमूर्ती दिसली. ती त्यांनी विकत घेऊन, चांदीच्या प्रभावळीत बसवून पूजेच्या देवात ठेवली. देवासमोर बसूनच अण्णा लिहू लागले. काय आश्चर्य पहा; बोलबोल म्हणता त्यांच्या हातून पुढचे दोन अंक पुरे झाले ! सौभद्राला पुढे अपरंपार यश लाभले, ' ती ' याच गणपतीची कृपा ! ' असे अण्णांच्या मनाने पक्के घेतले. म्हणूनच ' सौभद्र–गणपती ' म्हणून किर्लोस्कर संगीत मंडळीत त्याची नित्य पूजाअर्चा होत राहिली.

❋ किर्लोस्करांची शेती !

ज्यांच्या कवित्वकमला बुध–भृंग झाले
ऐकूनिया बहुत मानसि दंग झाले
ज्यांचे सुनाम बरवे बळवंतराय
त्यांच्या गुणावरुनि हा उतरीन काय

कोण्या एका कवीच्या या चार ओळीत अण्णासाहेब किर्लोस्करांची थोरवी स्पष्ट होते. संस्थापक, नट, नाटककार म्हणून अण्णांनी अलौकिक यश संपादन

केले; पण अण्णा कधी उतले-मातले नाहीत. सहकाऱ्यांना कधी दुखवले नाही. थोरांची संगत सोडली नाही. पहिल्याच वर्षीच्या शाकुंतलाच्या तीन खेळांच्या उत्पन्नातून, बुधवारवाड्याला लागलेल्या आगीत भस्मसात झालेल्या 'नेटिव्ह जनरल लायब्ररीला' ग्रंथखरेदीसाठी दोनशे रुपये दिले. गणेश वासुदेव जोशी यांच्या स्मारकासाठी पन्नास रुपये दिले. इतकेच नाही, तर आपल्या सहकारी मित्रांना घड्याळे नि रोख बक्षिसे दिली.

आर्यभूषण छापखान्याची मालकी टिळक, आगरकर, आपटे यांसारख्या थोर मंडळींकडे होती. प्रत्येक गोष्टीत देशाहित हेच त्यांचे ध्येय होते, कोल्हापूरकर वर्वे-प्रकरणी ही मंडळी खर्चाने जेरीस आली होती. अशा सत्कार्याला वाहून घेतलेल्या आपल्या स्नेहीहितचिंतकांना आपण मदत केलीच पाहिजे या भावनेने अण्णांनी शाकुंतल, सौभद्र या पुस्तकांचे हक्क (rights), ही पुस्तके सदर मंडळीस मी शेत म्हणून दिली आहेत अशा शब्दांत वर्णन करून, टिळक-आगरकरांना बहाल केली. या नाटकांच्या आठ-आठ दहा-दहा आवृत्या निघून या मंडळींना खूपच आर्थिक मदत झाली. अण्णांनी पेरलेले हे बीज नि निर्माण केलेली भावना, नाटकवाल्यांत चांगलीच रुजली. किर्लोस्कर, गंधर्व, बलवंत, ललितकलादर्श या मातब्बर नाटक मंडळ्यांनी तर समाजोपयोगी संस्थांना मुक्त हस्ताने मदत केलीच; पण त्या वेळच्या दहा-पंधरा छोट्या-मोठ्या नाटक-कंपन्याही आपआपल्या कुवतीप्रमाणे गावोगावींच्या संस्थांना, धर्मार्थ खेळ करून हातभार लावितच.

❋ व्रतपालन

अण्णासाहेब किर्लोस्कर हे भाऊरावांचे दैवत नि किर्लोस्कर मंडळी हे त्यांचे सर्वस्व. मग त्यासाठी ते वाटेल ते करायला तयार असत. अण्णांची नि कंपनीची प्रतिष्ठा राखणे, तिची कीर्ति वाढविणे हाच त्यांचा ध्यास होता, व्रत होते. त्यांना अनेकांकडून गाण्याची निमंत्रणे येत. थोरामोठ्यांकडून खूप आग्रह होई. खूप मोठ्या बिदागीचे आमिष दाखविले जाई. पण आपण बाहेर गाण्याच्या बैठकी करू लागलो तर कंपनीच्या खेळावर, उत्पन्नावर त्याचा परिणाम होईल, कंपनीच्या एकोप्यासही कदाचित तडा जाईल या भावनेने त्यांनी कधीही बाहेर गाण्याच्या मैफलीचे आमंत्रण स्वीकारले नाही. कधी राजदरबारी गायले, ते कंपनीच्या हितासाठीच. ते नेहमी म्हणत, 'भाऊराव पहायला मिळतील, त्यांचं गाणं ऐकायला मिळेल ते किर्लोस्कर कंपनीच्या स्टेजवरच.' आता 'नाइट'च्या जमान्यांत या भावनेचे मोल कळणे कठीण आहे.

❋ आता शालू नेसणार नाही

भाऊरावांनी आपल्या शकुंतल, सुभद्रा, मंथरा या भूमिकांनी प्रेक्षकांना वेड लावले होते. सतत तेरा–चौदा वर्षे, या भूमिका 'प्रतिक्षणिची दे नवी रुची' अशा अपूर्व नवलाईने ते वठवीत होते. पण आता आपण स्त्रीभूमिका करण्यास योग्य नाही, असे त्यांच्या मनाने घेतल्याने, त्यांनी पुरुषभूमिका करण्याचा निर्णय घेतला. पण कंपनीपुढे महत्त्वाचा प्रश्न होता की, त्यांच्या जागी सुभद्रा, शकुंतला म्हणून कुणाला उभे करायचे ? भाऊरावांच्या सुभद्रेशिवाय प्रेक्षक सौभद्र पहायला येतील का ? म्हणूनच कंपनीने जाहिरात दिली. 'भाऊरावांच्या भूमिका करण्यास उत्तम स्त्रीपार्टी हवा. गुणी नटाला महिना पाचशे रुपये (रु. ५००/–) पगार देऊ' रसिकहो, १८९६–९७ चा हा सुमार ! स्त्रीभूमिकेसाठी, कंपनीची पाचशे रुपये पगार देण्याची तयारी, म्हणजे भाऊरावांच्या स्त्रीभूमिकेची केवढी अपूर्वाई नि महती कंपनीला होती, याची तुम्हाला सहज कल्पना येईल. दुर्दैवाने, तशा भाऊरावसम सुंदर कलावंताची जोड ते कोदंड, चारुदत्त, पुंडलिक अशा पुरुष-भूमिका करू लागल्यावर त्यांना मिळाली नाही. म्हणूनच त्यांनी सुभद्रा रंगवावी, मंथरा उभी करावी, म्हणून मोठमोठी माणसे मध्यस्थी करीत. पण भाऊरावांनी आपला निर्णय कधीच बदलला नाही. तसा अभिजात कलावंत किर्लोस्कर मंडळीच्या रंगमंचावर बालगंधर्वांच्या रुपाने आला. पण फार उशीरा. भाऊराव गेल्यावर चार-पाच वर्षांनी. भाऊराव–बालगंधर्व या युतीचा योग कंपनीच्या नि रसिकांच्या कुंडलीत आधी आला असता तर ?

❋ चारुदत्त

अण्णांच्या सामाजिक कार्याच्या मदतीची पसामूठ, भाऊरावांनी आपल्या कारकीर्दीत मणा–सवामणाची केली होती. सामाजिक कार्याला एरवी सढळ हाताने ते मदत करीतच असत; पण एकदा, 'गुजराथी लोक आपले भाऊच आहेत. त्यांना दुष्काळात सर्वतोपरी मदत करणे हे आपले कर्तव्य आहे' अशा अर्थाचे निवेदन लोकमान्य टिळकांनी आपल्या 'केसरी'त केले होते. लोकमान्यांचा शब्द वेदवाक्य मानणाऱ्या भाऊराव कोल्हटकरांनी, मुंबईत नाटकाचा खेळ करून, गुजराथच्या दुष्काळनिधीस गायीगुरांच्या रक्षणासाठी, किर्लोस्कर-मंडळीच्या नावे रोख रु. २५०० ची मदत केली. मुंबईचे पुढारी नि रसिक भाऊरावांच्या या देणगीने इतके भारावून गेले की, सर भालचंद्र भाटवडेकर यांच्या हस्ते त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

भाऊराव गेल्यावर कंपनीचे कर्ते चालक अजोड कलावंत, दानशूर अशा सर्वच दृष्टीने 'लास्ट ऑफ द किर्लोस्कर्स', 'किर्लोस्कर मंडळीचा अखेरचा दुवा' या शब्दांत त्यांचे वर्णन शिवराम महादेव परांजपे यांनी आपल्या 'काळ'

पत्रात त्यांच्यावरील मृत्युलेखात केले होते.

❋ फार्स

जुन्या जमान्यात, मुंबईत 'सभ्य अमरचंदवाडी हिंदु नाटक मंडळी' गद्य नाटके करणारी नाटकमंडळी होती. त्यांची बहुतेक नाटके पौराणिकच असत; पण नाटक दाखवून वेळ उरला की, मग 'फार्स' करून दाखवीत. पुढे ही पद्धत 'शाहूनगरवासी' नेही उचलली होती. 'झोपी गेलेला जागा झाला' या नावाचा फार्स गणपतराव जोशी करीत असत. त्या काळात भरपूर करमणूक करण्याच्या कल्पनेतून फार्स जन्माला आला असावा. कारण नाटक पहाटेपर्यंत चालायलाच हवे असा त्या काळी प्रेक्षकांचा ग्रह असे.

तुम्हाला आश्चर्य वाटेल की, सौभद्र, मृच्छकटिक या नाटकांच्या मानाने 'संशयकल्लोळ' लवकर संपत असे. म्हणून त्यात 'खास जलशाचा प्रवेश' घालण्यात आला. मग त्यात नामांकित गवयांचे गाणे ऐकवू लागले. काही नाटक कंपन्यात रेवतीही जलशात 'ऐसी न मारो पिचकारी' पेश करू लागली. पुढे पुढे कित्येक 'संशयकल्लोळ'च्या प्रयोगात जलसा हेच मोठे आकर्षण होऊ लागले.

❋ गुड कॉंडक्ट फंड

अण्णा, मोरोबा, बाळकोबा, भाऊराव, रामभाऊ हे किर्लोस्कर मंडळीचे पंचत्रण ! सगळ्यांचा जीव आपल्या संस्थेत, आपल्या नाटकमंडळीत. ध्यास एकच, कंपनी मोठी कशी होईल, गुणी कलावंताचे चीज कसे होईल, हा एकच विचार त्यांच्या डोक्यात असे. संस्थेसाठी सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवण्याची त्यांची तयारी असे नि तसा त्याग त्यांनी केलाही. किर्लोस्कर मंडळीच्या स्थापनेपासून, वर्षातून दोन महिने सुटी घेण्याची प्रथा होती. मंडळी सुटीत आपापल्या घरी जात. काही तेथेच रहात; पण पगार नसे. मालकांच्या मिळकतीतून, भागिदारीतून, दोन आणे, अडीच आणे, हिश्श्याची रक्कम नटमंडळीस, योग्यतेनुसार 'गुड कॉंडक्ट फंड' म्हणून वाटली जाई. शिवाय आजारपण, कौटुंबिक अडचणीत, कंपनीकडून मदत दिली जाईच. संस्थेच्या नटवर्गाचे नि पर्यायाने संस्थेचे हित साधणाऱ्या या दूरदृष्टीच्या मालकांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे नाही का ?

आज कलावंतांना मानधन, सरकारी वर्षासन, कलाकार–निधी अशा काही मार्गांनी थोडी-फार मदत होते हे खरे; पण ती फारच अपुरी पडते. शिवाय ती सगळ्याच गरजू कलावंतांपर्यंत पोचणे अशक्य होते. आपले उगाच मनात येते की, जी. सी. एफ. (G. C. F.)चा किर्लोस्करी वसा साऱ्याच नाटकमंडळींनी मनोभावे पूजला असता, तर वीस-वीस, पंचवीस-पंचवीस वर्ष तोंडाला रंग लावून

लोकरंजन करणाऱ्या, गुणवंतांना रंग उतरताच मदतीसाठी कुणाच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी आली नसती ! आजच्या पी. पी. एफ. (P. P. F.)च्या चालीवर किर्लोस्करी ' जी. सी. एफ.'ची गंगाजळी खचितच उपयोगी पडली असती !

⁂ संगीत न्हावी

पूर्वीच्या काळी नाटकमंडळी हे एक संस्थानच असे. कलावंताच्या सरबराईसाठी गडीमाणसे, न्हावी, धोबी, आचारी अशी अनेक मंडळी कंपनीत असत. किर्लोस्कर मंडळीत विसू न्हावी ही एक इब्लिश वल्ली होती. तो भाऊराव कोल्हटकरांपासून बहुतेक साऱ्या नटांच्या त्यांच्या गाण्या-बोलण्याच्या, आवाजासहित सुरेख नकला करून, सर्व मंडळींना नेहमी हसवीत असे ! कंपनीत तो ' संगीत न्हावी ' म्हणूनच प्रसिद्ध होता; पण जितका विनोदी तितकाच प्रामाणिक. अण्णासाहेब किर्लोस्करांचा त्याच्यावर फार जीव होता. अण्णांच्या अखेरच्या दिवसांत तो त्यांच्याबरोबर गुर्लासूरला होता. अण्णांच्या वडिलांनी अण्णांची नाटके पाहिली नव्हती. हा विसू न्हावी त्यांना अनेक गाणी म्हणून दाखवी. अण्णासाहेबांना मरणापूर्वी भ्रम झाला होता. संन्यास घेण्याचा निश्चय त्यांनी बोलून दाखविला होता नि अखेर संन्यास दिलाही गेला. अण्णांचा अखेरचा श्मश्रू नि रेशीमकाठी धोतरांच्या छाट्या विसूच्याच हातून झाल्या. असे सांगतात, अण्णांचे देहावसान झाल्यावर अण्णांचा विसू–कंपनीचा संगीत न्हावी कंपनीत दिसला नाही !

⁂ ' वन्समोअर '

अहो, केशव (केशवराव भोसले) शारदेत ' मूर्तिमंत भीति उभी 'ला आठ आठ वन्समोर घेई. ' बालगंधर्वांचं कोणतंच गाणं तीन-तीन चार-चार वन्समोअर घेतल्याशिवाय पुढे जात नसे ' असे कौतुकाचे उद्‌गार, रसिक वृद्ध मंडळींकडून नाटकाच्या गप्पा निघाल्या की अजूनही हमखास ऐकविले जातात. रंगभूमीचे वैभवपर्व पाहिलेल्या त्या मंडळीचे ते म्हणणे बरेचसे खरेही आहे.

पण हा ' वन्समोअर ' मराठी रंगभूमीवर आला कसा ? असे सांगतात की, संगीत रंगभूमी सुरू झाली, तेव्हा ब्रिटिश राजवट स्थिरावली होती. इंग्रजी नाटकात कर्टन कॉल ची पद्धत होती. इंग्लिश नटांची नाटके मुंबईत होत होती. त्याच पद्धतीवर साहेबाचे राज्य असल्याने, अधिकारीवर्गाने एखादे गाणे आवडले, नि कौतुकाने टाळी वाजविली की, साऱ्या थिएटरमधून कडकडून टाळ्या पडत. गाणारे पात्र ते गाणे पुन्हा गाऊ लागे. साहजिकच साऱ्या प्रेक्षकांना त्या गाण्याचा पुन्हा आनंद लुटायला मिळे. सुरुवातीला ही पद्धत फारशी रूढ नव्हती. कदाचित एखाद्या गाण्याला ' वन्समोअर ' मिळे. पण पुढे पुढे हे ' वन्समोअर ' चे वेड (फॅड

म्हणा हवे तर) इतके वाढले की, प्रत्येक 'वन्समोअर' गणिक त्या त्या नटाला ते ते पद गावेच लागे. किंबहुना किती 'वन्समोअर' मिळाले यावरूनच त्या नटाची महति ठरू लागली. याच उपद्व्यापातून भाडोत्री 'वन्समोअर' देणाऱ्यांची योजना होऊ लागली. अर्थात बालगंधर्व, केशवराव, मा. दीनानाथ यांची गोष्टच वेगळी. त्यांच्या निखळ गाण्यामुळेच त्यांच्यावर 'वन्समोअर'चा पाऊस पडे. गुजराथी रंगभूमीवर तर म्हणे, ज्याला अधिक 'वन्समोअर' पडत त्याला त्या नटाला, पगाराखेरीज त्या भूमिकेबद्दल 'बोनस' रक्कम मिळत असे.

❋ वन्समोअर अभिनयाला !

संगीत नाटकात वन्समोअर समजू शकतो. तिथे फक्त गाण्याचाच प्रश्न असतो. पण गद्य नाटकात अभिनयाला–प्रवेशाला, वन्समोअर कधी ऐकला आहे ?

हो– हो– हो–! मुंबईत नटसम्राट गणपतराव जोश्यांचे 'मॅकबेथ' (मानाजीराव) चालू होते. नटवर्य बाळाभाऊ जोग लेडी मॅक्बेथ (दर्याबाई) च्या भूमिकेत होते. शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या हॅम्लेट त्राटिकासारखेच त्यांचे मॅकबेथही अत्यंत लोकप्रिय होते. पाचव्या अंकातला झोपेत चालण्याचा नि जागेपणी केलेल्या भयंकर कृत्यांची तोंडाने बडबड करण्याचा लेडी मॅकबेथचा प्रवेश, बाळाभाऊंनी इतका उत्कृष्ट वठविला अभिनयाची अशी उंची गाठली की, प्रेक्षकांनी कडकडून टाळी दिली 'वन्समोअर' 'वन्समोअर' ओरडत हा प्रवेश पुन्हा झालाच पाहिजे, म्हणून हट्टच धरून बसले. काही केले तरी ऐकेनात शिट्या टाळ्या नि ओरडा चालूच होता.

तेव्हा मात्र गणपतराव, मॅकबेथचा मेकअप उतरून रंगमंचावर आले नि लोकांना आपल्या समयसूचक भाषणाने त्यांनी मंत्रमुग्ध केले. खरे म्हणजे, ते 'वन्समोअर' वरचे थोडक्यात भाष्यच होते.

'प्रेक्षकबंधूंनो, आमच्या बाळाभाऊंनी प्रवेश उत्तम केला. तुम्हाला आवडला, तुम्ही टाळी देऊन आनंद व्यक्त केलात. येथपर्यंत हे सर्वच्या सर्व प्रसंग पुन्हा कसा दाखविता येणार ? देव कुठलीही गोष्ट एकदाच करतो नाही का ? आपण मोठे झालो की बाळपणीचा आनंद लुटता येतो का ? लहान होता येते का ? सूर्य उगवून माध्यान्हीला आला की, पुन्हा प्रातःकाळची सूर्योदयाची शोभा आपण पाहू शकतो का ? तसेच आमच्या नाटकाचे आहे. जे होऊन गेले, घडून गेले ते पुन्हा नाही होणार हं ! आता संगीत नाटकात पदे पुनः पुन्हा म्हणतात ! पण तो त्यांचा संगीत नाटकवाल्यांचा प्रश्न आहे. पण त्या बाबतीतही मी स्पष्टपणे म्हणेन की, गाण्यालाही 'वन्समोअर' स्वीकारू नये. त्यामुळे खेळाला खीळ बसते. आता अजूनही, बाळाभाऊंचा तो प्रवेश पाहण्याचा तुमचा हट्टच असेल तर तो पुरवायला मी तयार आहे. आता रात्रीचा दोनचा सुमार झाला आहे. मी

आत जातो. मानाजीराव (मॅक बेथ) होतो, नि प्रयोग पुन्हा पहिल्यापासून सुरू करतो. म्हणून तुम्हाला हवा असलेला प्रवेश पुन्हा पहाता येईल. आहे बसायची तयारी?'

सहाजिकच लोक चाट पडले नि नाटक पुढे सुरू झाले.

❋ खास--कुलीन स्त्रियांसाठी

आजच्या नाटकांचे शेकड्यांनी प्रयोग होतात; पण एखाद्या नाटकाचे 'खास स्त्रियांकरता' प्रयोग झाल्याचे ऐकिवात नाही. ते भाग्य फक्त सौभद्रालाच लाभले. तेसुद्धा अण्णांच्या हयातीतच. पुण्या मुंबईच्या स्त्रियांनी, आग्रह केल्याने 'किर्लोस्कर मंडळी' असे प्रयोग अधूनमधून करीत असे. नारायणराव बालगंधर्व नेहमी म्हणत असत, 'देवा, आपल्या मायबहिणींना नाटक आवडायला हवे. त्यांना आवडले, की त्या आपले पतिराज, दीर, नणंदा, जावा अशा सगळ्या कुटुंबाला पुनः पुन्हा खेळीसाठी आणतात, खरं ना?' मला वाटते, नाटकाच्या यशाची ही खूणगाठ, बालगंधर्वांनी त्याच्या पूर्वसूरींनी पाडलेल्या खास सौभद्रच्या पायंड्यातच असावी!

❋ जाहिरात! जाहिरात!

१८४३ ते १८८० पर्यंत म्हणजे विष्णुदास भावे ते अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या किर्लोस्कर नाटकमंडळीच्या स्थापनेपर्यंत नाटकांची खास अशी जाहिरात करीतच नसत. नाटकवाले गावोगाव फिरत आपले खेळ करीत. त्यांची खरी बोलकी जाहिरात म्हणजे त्यांचे प्रेक्षक. नाटकमंडळी पुढच्या गावी पोचते न पोचते तो तिची बरीवाईट कीर्ती तिथे पोचलेलीच असे. कारण पुढचा मुक्काम हा बहुधा पन्नास-पाऊणशे मैलांच्या आतबाहेरचाच असे. काही नाटकमंडळ्या लिथोप्रेसमध्ये छापलेल्या मोठ्या जाहिराती (भितीपत्रके) 'खूष खबर! येणार, येणार!' 'इचलकरंजीकर नाटकमंडळी' लवकरच आपले हातखंडे खेळ करून दाखविणार! (थिएटर, वार नि वेळ यासाठी याच जाहिरातीत मोकळी जागा असे ते मग शाईने लिहीत) अशा जाहिराती, पुढच्या मुक्कामाच्या गावी चावडी, कचेरी, इमारतींच्या दर्शनी भागावर डकवीत असत. साहजिकच त्यामुळे गावातल्या लोकांना कंपनीच्या आगमनाची चाहूल लागत असे.

ज्या गावी कंपनीचा मुक्काम असे तिथे मात्र जे नाटक असेल, त्याचे बोर्ड मोक्याच्या जागी लावीत. सकाळ-संध्याकाळ जाहिरातीचा गाडा किंवा गाडी फिरविली जाई. त्या वेळी हिरव्या, तांबड्या कागदावर छापलेल्या जाहिराती (हँडबिल्स) वाटीत असत. बस, इतकीच माफक जाहिरात असे. कधी कधी एखाद्या सजविलेल्या बैलगाडीवर दिव्यांची रोषणाई करून त्या दिवशीच्या

(रात्रीच्या) खेळाची खास जाहिरात ती गाडी गावभर फिरवून करीत; पण हँडबिल्समध्ये मात्र काही काही नाटकमंडळ्या नाटकाची थोडी गोष्ट–सीनचे वर्णन अशा काही गोष्टी चुरचुरीत भाषेत मांडून लोकांचे लक्ष वेधीत. जसे 'नारायणराव पेशवे यांच्या वधाचा फार्स'चे हँडबिल छापताना, 'श्रीमंत नारायणरावांचा कोथळा फोडला जाताच, त्यांच्या पोटातून बाहेर पडणारा साखरभात स्टेजवर प्रत्यक्ष पहा!' नटश्रेष्ठ गणपतराव जोशी यांच्या 'शाहूनगरवासी'चे एक खुशखुशीत हँडबील–

सुखवस्तु गृहस्थ : पैसे गेल्याबद्दल डोळ्यांना त्रास होणार नाही, असे कोणते बरे नाटक आज आपण पहावे?

विद्यार्थी : माझा अभ्यासाचा वेळ मोडला असे न होता, त्यातल्या त्यात इतिहासाचे ज्ञान आणि नीतीची तत्त्वे माझ्या मनावर ठसतील, असे कोणते बरे नाटक आज आपण पहावे?

स्त्री : बीभत्स शृंगारापासून मन उद्विग्न न होता, निर्मळ पातिव्रत्य आणि उज्ज्वल शौर्य यांची उदात्त कल्पना, ज्याच्या योगाने माझ्या मनावर बिंबेल असे कोणते बरे नाटक आज आपण पहावे?

चुगलचोर : ..... हा घातुक गुण ज्याच्या योगाने नाहीसा होईल, असे एखादे नाट्य आहे काय?

नोकर : .....स्वदेशाबद्दल मला कधी आठवणसुद्धा झाली नाही..... त्या स्वदेशभक्तीशी माझा परिचय कशाने होणार?..... कदाचित एखाद्या नाटकातून त्या स्वदेशभक्ताचे उत्तम चित्र असले तर असायचे; पण असे कोणते बरे नाटक आहे?

सगळ्यांना एकच उत्तर – 'कांचनगडची मोहना' पहा!

❋ मुजरा.... छत्रपतींचा

श्रीमंत शाहूमहाराजांना जेवढी साठमारीच्या खेळाची रग तेवढीच गाण्यात गोडी. जितका कुस्तीचा षोक तितकीच नाटकाची आवड. अल्लादिया खाँसाहेबांचा शागिर्द होण्यासाठी करवीरात आलेल्या, बालके नारायण राजहंसाला कानाच्या दुखण्याच्या निमित्ताने, मिरजेला औषधोपचारासाठी, किर्लोस्कर संगीत मंडळीत सुस्थळी सुपूर्द केला तो शाहूमहाराजांनीच! तोच नारायण पुढे 'बालगंधर्व' म्हणून मराठी मनाचे लडिवाळ दैवत ठरले. लोकांनी लोकमान्यांइतकेच बालगंधर्वांवर प्रेम केले.

शाहूमहाराज जितक्या आवडीने संगीत नाटके पहात, तितक्याच आवडीने गद्य नाटके पहात. एकदा ते 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चे शिवसंभव नाटक पहायला गेले होते. खरेशास्त्रीबुवांसारख्या व्युत्पन्न विद्वानाचे नाटक. केशवराव दाते,

औंधकर, शाळिग्राम यांच्यासारखे मातब्बर नटशककर्त्या शिवप्रभूंच्या जन्माचे, पहिल्यापासून अस्सल ऐतिहासिक वातावरणात घेऊन जाणारे कथानक. शिवप्रभूंच्या जन्माचा सीन आला, पाळणा हलू लागला. पडद्यात तोफांच्या सलामी झडू लागल्या. तोच शाहूमहाराज एकदम उठून उभे राहिले नि त्या दुपट्यातल्या बालशिवाजीला लवून मुजरा केला. साहजिकच महाराज उठले म्हणून सारे थिएटर उठून उभे राहिले. कडकडून टाळी पडली नि मुजराही झडला !
रसिकहो, हे यश कोणाचे ? नाटकाचे, नाटककाराचे की नटांचे ? छे, छे ! ! त्या त्रिवेणी–संगमाचे !

⁂ खरी नाट्यस्पर्धा

आजही अनेक नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जातात; पण एके काळी पुण्यात पौराणिक नाटकांची एक आगळी–वेगळीच चढाओढ मोठ्या इर्षेने होई. धोंडोपंत सांगलीकर नि श्रीपादपंत लेले (सांगलीकरच) या दोन नाटक मंडळ्यांत ती स्पर्धा होई. दोघांकडेही उत्तम नटवर्ग होता. एकाने जे नाटक केले तेच दुसऱ्याने करून दाखवायचे, किरातार्जुनयुद्ध, कर्णपर्व, शकुंतला या सारख्या नाटकांचे प्रयोग सादर होत. प्रयोगांना प्रचंड गर्दी असे नि कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे व्युत्पन्न विद्वान पंच (आजचे परीक्षक) असत. मग निकालात गोंधळ होण्याचा प्रश्नच नाही !

⁂ शनिवारवाडा नि गडकरी !

कै. राम गणेश गडकरी यांचा स्मशान हा 'वीक पॉइंट' (Weak Point) होता हे सर्वश्रुत होते. म्हणूनच त्यांचा 'कामण्णा' (भावबंधन) पहिल्याच भेटीत घनःश्यामाला आवर्जून सांगतो 'धाडस ? जगातल्या जगात काय वाटेल ते धाडस करायला सांग. माझा एकच वीक पॉइंट आहे, आणखी तो म्हणजे स्मशान. स्मशानात जायचे नाव काढलेस की प्राणसंकट वाटते बघ ! स्मशानात पाऊल टाकल्याबरोबर माझा मुडदा झालाच म्हणून समज ! जीव गेला तरी मी एकटा म्हणून स्मशानात जाणार नाही !'

गडकरी नेहमी सांगत की, तिन्हीसांजा झाल्या की मी शनिवारवाड्याच्या रस्त्याने जाणार नाही. कारण भागवत (भागवतांचे भूत) तिथे कट्ट्यावर माझी वाट बघत बसतील, मला हाक मारतील, माझा हात धरून मला खाली बसा, म्हणतील, नि सुरुवात करतील 'कमलाकरचा हा प्रवेश इथं यायला पाहिजे. इथे जयंताची एन्ट्री हवी. गोकुळचे स्वगत थोडे कमी करा' इत्यादी.

कारण गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाचे वाचन होऊन भागवतांना ते पसंत पडले होते. 'महाराष्ट्र नाटक मंडळी' ने ते घेतलेही होते. पात्रयोजनासुद्धा

झाली होती. स्वतः भागवत 'कमलाकर' करणार होते. नाटक अर्थातच भागवत बसविणार होते. त्यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे स्वभावचित्रण अभिनय, सीन्स इत्यादी गोष्टींच्या नोटस् सुद्धा काढायला सुरुवात केली होती; पण योग असा की, नाटकांच्या तालमींना सुरुवात होणार, तोच भागवतानी आत्महत्या करून जगाच्या रंगभूमीवरून कायमची एक्झिट घेतली, म्हणूनच गडकऱ्यांना सारखे वाटायचे की, ठरल्याप्रमाणे, नाटकवार चर्चा करण्यासाठी, नेहमीसारखे भागवत शनिवारवाड्यावर वाट पहाणारच !

रसिकहो, हे भागवत म्हणजेच अभिनयश्रेष्ठ नटवर्य गणपतराव भागवत ! अग्रपूजेचा मान संपादलेले गद्यश्रेष्ठ 'महाराट्र नाटक मंडळी'चे प्रमुख नट नि तालीममास्तर ! मालक नसतानाही कारखानीस, टिपणीसबंधू यांसारख्या मालकमंडळींना दबदबा वाटावा असे गुणसंपन्न नट ! काकासाहेब खाडिलकरांच्या 'कीचकवध' नाटकातले—कीचक !' 'सवाई माधवरावांचा मृत्यू'तले केशवशास्त्री ! नि 'भाऊबंदकीतले' राघोबा ! हे त्यांचे 'अभिनयबिल्वदल !' आजही ह्या त्यांच्याच खास भूमिका म्हणून ओळखल्या जातात. त्यातही कीचक म्हणजे भागवतच ! त्यावर त्यांची मुद्रा कोरली गेली आहे.

भागवत गेल्यावर या भूमिकांसाठी उभे राहणारे नट, मनोमनी भागवतांच्या पायावर नतमस्तक होऊनच रंगपटात प्रवेश करीत असत, मग ते 'केशवशास्त्री' (सवाई माधवरावांचा मृत्यू) समर्थपणे उभा करणारे केशवराव दाते असोत, भागवतांची अपुरी इच्छा पुरी करणारे कमलाकर (प्रेमसंन्यास) म्हणून रंगणारे चिंतामणराव कोल्हटकर असोत, नाही तर खऱ्या राघोबादादाहूनही कदाचित अधिक सुंदर दिसणारे— राघोबा (भाऊबंदकी) नानासाहेब फाटक असोत.

❋ मानाचा शिरपेच

'महाराष्ट्र नाटक मंडळी' ही सुशिक्षितांची फक्त गद्य नाटके करणारी ध्येयवादी मंडळी ! गुरुवर्य अण्णा कारखानीस, यशवंत नारायण तथा अप्पा टिपणीस नि माधवराव टिपणीस हे बंधू, नि दत्तोपंत देशपांडे हे चार महाडकर कायक्ष कंपनीचे प्रमुख मालक. कंपनीचे मूळ नाव 'महाडकर नाटक मंडळी' हेच होते; पण संस्थेला स्थानिक किंवा जातीय वास येऊ नये म्हणून 'महाराष्ट्र नाटक मंडळी' असे नामकरण केले. सहज सुचले म्हणून सांगतो, या कंपनीचा पहिला खेळ 'कांचनगडची मोहना' हा महाडला लहानपणी सी. डी. (चिंतामणराव) देशमुखांनी पाहिल्याची नोंद त्यांनी आपल्या Course of my life या आत्मचरित्रात्मक ग्रंथात आवर्जून केली आहे. श्री. भाटे, भानू, पानसे, गोविंदराव टिपणीस नि कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकर ही कंपनीची पाठीराखी हितचिंतक विद्वान मंडळी. साहजिकच लौकरच या संस्थेला

नाट्यविद्यापीठाचे स्थान प्राप्त झाले होते. कंपनीचा दर्शनी पडदा (Drop) गंगावतरणाचा होता. 'नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदी दुष्यस्त कामो लघुः' हे संस्थेचे ब्रीदवाक्य होते. Not failure but low aim is crime या इंग्रजी वचनाचे शि. म. परांजपे यांनी केलेले ते संस्कृत सुभाषित होते. हे सर्व सालंकृत, सविस्तर सांगण्याचा हेतू इतकाच की, अशा 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चे भागवत हे कर्तुम्-अकर्तुम् नट नि तालीममास्तर होते, यावरून भागवतांच्या कलात्मक नि बौद्धिक उंचीची कल्पना यावी.

त्याची एक अलीकडची खूण म्हणजे, 'भाऊबंदकी नाटक महाराष्ट्रात भागवतांनीच बसविले होते. 'भागवतांसारखा तालीममास्तर असातना मीच तालमी घेण्याची गरज नाही', असे काकासाहेब खाडिलकरांनी आपले मनोगत स्वच्छ सांगून टाकले होते. अलीकडे १९५८ च्या सुमारास दिल्ली येथे अखिल भारतीय नाट्यमहोत्सव साजरा झाला. सर्व भाषांतली नाटके सादर झाली. मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने (केवळ डॉ. अ. ना. भालेराव यांच्या महत् प्रयत्नाने) 'भाऊबंदकी' नाटक सादर करण्यात आले. नानासाहेब फाटक, दुर्गाबाई खोटे, मा. दत्ताराम असे मराठी रंगभूमीवरचे अनेक मातब्बर कलावंत होते. पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, चिंतामणराव देशमुख यांसारखी थोर मंडळी नाटक पहायला उपस्थित होती. दिग्दर्शन होते नटश्रेष्ठ केशवराव दात्यांचे ! शब्दाशब्दाला, वाक्या-वाक्याला नाटक चढत होते. रंगत होते. अखेर अपेक्षेप्रमाणे नाटकाला पाहिले बक्षीस मिळाले. मराठी माणसांचे दिल्लीत कौतुक झाले. मराठी भाषेचा राजधानीत बहुमान झाला. आनंदी आनंद झाला. मंदिलात शिरपेच झळकले !

पण रसिकहो, इथेही आठव येतो, याद येते ती भागवतांचीच ! दाते भागवतांचे शिष्य ! भागवतांनी १९०९ साली मांडलेले 'भाऊबंदकी' दात्यांच्या नजरेत पक्के होते. ते त्या नाटकात विविध भूमिकांत (स्त्रीपार्टसुद्धा) रंगत होते. १९११ सालापर्यंत भागवतांचे काम पहात होते. पात्रे बदलत होती, पण पट तोच होता. म्हणजे दात्यांच्या दिग्दर्शनाचा ब्लूप्रिंट (Blue print) भागवतांचाच होता. (बदलत्या रंगभूमीच्या संदर्भात केशवरावांनी आपल्या बुद्धीप्रमाणे काही बदल केलेही असतील) पण याचाच अर्थ १९०९ ते १९५८ हा पन्नास वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटूनही, भागवतांच्या अभिनयाचे, दिग्दर्शनाचे महावस्त्र विटले नव्हते, जुने झाले नव्हते, रंग उडाला नव्हता, हेच खरे नाही का ?

बक्षिसाची बातमी कानावर पडताच केशवरावसुद्धा क्षणभर डोळे मिटून भारावलेल्या अंतःकरणाने हात जोडून म्हणाले असतील, 'गुरुवर्य, हे यश तुमचं ! ही पालखी गणेशाची ! (गणपतराव) आम्ही नुसते पालखीच्या दांड्याचे मानकरी !'

⁂ मी करतो शारदा

'स्वदेशहितचिंतक नाटकमंडळी'चा मुक्काम पंढरपूरला होता. शारदा हा त्यांचा पेटंट खेळ. 'किर्लोस्कर संगीत मंडळी' पेक्षाही त्यांचा शारदेचा प्रयोग सफाईदार होत असे. एका शनिवारी शारदेचा प्रयोग जाहीर केला होता. गावातून जाहिरातीचा गाडा, ताशे–वाजंत्र्यासह फिरत होता. गुरुवारपासून तिकिटाविक्री सुरू झाली होती; पण शारदेचे काम करणारा कृष्णा देवळी तापाने फणफणला होता. उतरण्याचे चिन्ह दिसेना. खेळ बदलावा असा विचार कंपनीचे मालक जनुभाऊ निमकर यांनी मांडला; पण मॅनेजर म्हैसकर म्हणाले, 'तिकीटविक्री' झाली आहे; आता खेळ बदलून कसे चालेल? जनुभाऊ गोंधळात पडले. त्यांचा अक्षरशः हॅम्लेट झाला होता म्हणाना (To be or not To be) तेवढ्यात नऊ- दहा वर्षांचा केशव पुढे झाला. 'जनुमामा, मी करतो शारदा!" 'अरे वेड्या, तुला कसे इतके मोठे काम झेपणार? दोन दिवसात तुझं, नक्कल कशी पाठ होणार? गाणी कशी बसणार? शारदेचे काम म्हणजे चेष्टा आहे का? जा पळ!' इति जनुभाऊ. तरीही केशव तिथेच ठाम उभा राहिला. 'घ्या म्हणून माझी गाणी.' असे म्हणून त्याने चोख पाठ असलेली शारदेची नक्कल खाडखाड म्हणण्यास सुरुवात केली. तीसुद्धा भूमिकेच्या पदांसह.

जनुभाऊ आश्चर्यचकित झाले; पण तरीही केशव ही धडाडी स्टेजवर दाखविल की नाही याची त्यांना मनातन शंका वाटत होती; पण त्यांनी केशवला तालीम द्यायला सुरुवात केली नि तिकीटविक्रीही चालू ठेवली. शनिवार उजाडला. थिएटर गच्च भरले होते. केशव शारदा म्हणून रंगला. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे पडद्याची पूजा झाली. तिसरी घंटा झाली. धूप दरवळला. नांदीचे सूर सुरू झाले नि जनुभाऊंच्या पाया पडून तो आपल्या प्रवेशात रंगभूमीवर आला. ही नवी शारदा लोकांना कशी काय रुचते, हे पहात जनुभाऊ स्तब्ध उभे होते; पण केशवने सुरुवातीपासूनच अशी बाजी मारली की प्रेक्षक बेहद खूष! त्याने 'मूर्तिमंत भीती उभी' हे पद असे म्हटले की प्रेक्षकांचे देहभान हरपले. हे पद संपते न संपते तो वन्समोअर ठेवलेला! केशवने त्या दिवशी नुसती शारदा उभी केली नाही तर तो कायावाचामने शारदाच झाला होता. त्या दिवसापासून केशव 'स्वदेश हितचिंतक'ची रंगशारदाच ठरला. तो उजळून निघाला, कौतुकाच्या 'शारदीय चंद्रकलेत' तो न्हाऊन निघाला! मातेची पुण्याई, जनुभाऊंचे आशीर्वाद नि पंढरीच्या पांडुरंगाची कृपा!

रसिकहो, हा केशव, हा केशव म्हणजेच पुढे आपल्या तडफदार गान–अभिनयाने कीर्तिशिखर गाठणारे संगीतसूर्य केशवराव भोसले! 'ललितकलादर्श' नाटक मंडळीचे साक्षेपी संस्थापक, मालक नि चालक!

❋ पगडी नि जिरेटोप

आज मराठी रंगभूमी समृद्ध आहे. नाटकाला लागणाऱ्या साऱ्या सुविधा उपलब्ध आहेत. रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य या साऱ्याच गोष्टीत बहुमोल सुधारणा झाल्या आहेत; पण एक काळ असा होता की, पडदे नि बिंगसाठी पातळे वापरली जात होती. मेकपसाठी सफेदा नि हिंगूळ, पिवडी वापरली जात होती; पण परदेशात मेकपसाठी 'ग्रीनपेंट्स' वापरतात असे भागवतांच्या वाचनात आले. नटश्रेष्ठ गणपतराव भागवत हे रंगभूमीविषयक सर्वच गोष्टींचे थोर अभ्यासक होते. मग ती शेक्सपिअरची नाटके असोत, नाही तर नाट्यसंचविषयक साहित्य असो! ते सदैव अशाच विषयाच्या वाचनचिंतनात गर्क असत. त्यांनी ते इंग्रजी मासिकातले कात्रण अप्पा टिपणिसांना दाखविले. अप्पांनी मुंबईतल्या एका इंग्लिश कंपनीतून ते रंग विकत आणले. मग अप्पांनी आपल्या कल्पनेप्रमाणे, तसे व्हॅसलिनमधील रंग तयार केले. मेकपच्या आवश्यकतेनुसार त्याची प्रतवारी करून निरनिराळ्या शेडस्ना निरनिराळे नंबर दिले. आपल्याकडे मेकपसाठी तसे रंग प्रथम उपलब्ध करून देण्याचे श्रेय भागवत नि अप्पा यांच्याच कल्पकतेला आहे. यातूनच मग पुढे रंगभूषेचे तंत्र विकसित होते गेले.

रसिकहो, हे अप्पा टिपणीस—म्हणजेच यशवंत नारायण टिपणीस. महाराष्ट्र नाटक मंडळींचे एक मालक—नट नि नाटककार! अप्पा हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व होते. त्यांना नाट्यविषयक सर्वच क्षेत्रांत गती होती.

नाटकात वास्तववादी नेपथ्य अप्पांनीच आधी उभे केले. पर्वती, शनिवारवाडा, त्यातला गणेशमहाल, ओंकारेश्वर इत्यादी दृश्ये त्यांनी हुबेहुब उभी केली. (सवाई माधवराव यांचा मृत्यू आणि भाऊबंदकी या नाटकांसाठी) काकासाहेब खाडिलकरांच्या विनंतीवरून मानापमान नाटकांतला तंबूचा सीन (की जो आजतागायत लोकप्रिय आहे) अप्पांनीच उभारून दिला होता.

आज शिवाजी—संभाजींच्या जिरेटोपांची, पेशवाई पगड्यांची अपूर्वाई वाटत नाही. कुठल्याही नाट्यसंसारात (ड्रेपरीच्या दुकानात) सहज भाड्याने मिळतात; पण आज रंगभूमीवर दिसणारा (एस्टाब्लिश झालेला) जिरेटोप प्रथम अप्पांनीच तयार केला आहे. सुरुवातीला तर ते हाताने बांधीत असत. मग पुढे त्याचा साचा (Mould) तयार झाला. सुरवारी, ढोपऱ्या, पेशवाई, मराठेशाही, रजपुती अंगरखे त्यांनी स्वतः कापून देऊन शिवून घेतले. रामशास्त्र्यांचे पागोटेही त्यांचेच. नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या 'बहुरूपी'त अप्पांवरील निरतिशय प्रेमाने अशा किती तरी नवलाईच्या गोष्टींची नोंद मनोभावे केली आहे.

पगडीवरून सहज आठवण झाली. 'भाऊबंदकी' नाटकात नटवर्य त्र्यंबकराव प्रधान रामशास्त्र्यांची भूमिका करीत. त्यांची पगडी लाल रंगाची

होती. बोलण्याची ढब थोडीशी लोकमान्यांसारखीच ठेवीत. सोंगही टिळकांसारखे दिसे. मग काय विचारता, साहजिकच नाटकावर बंदी आली. मग तात्यासाहेब केळकर आदी सूज्ञांच्या सूचनेवरून पगडी बदलली. पांढरी घातली नि गंमत अशी की पगडी बदलताच (फिरवताच) प्रयोगाला परवानगी मिळाली !

❋ गवसला ग चिंतामणी

खरे म्हणजे, किर्लोस्कर संगीत मंडळीने मिरजेचा मुक्काम धेतला होता, तो कंपनीचे विसर्जन करावे याच हेतूने. कारण भाऊराव गेल्यापासून कंपनीची गाडी घसरगुंडीला लागली होती. नटवर्य नानासाहेब जोगळेकर नि कृष्णराव गोरे यांची हिरो–हिरॉइनची जोडी सुरेख जमत होती, तोच गोरे कंपनी सोडून गेले नि 'स्वदेशहितचिंतक' मध्ये सामील झाले त्यामुळे तर फारच बिकट परिस्थिती झाली. खेळ लावण्याचीच पंचाईत झाली. 'स्वदेशहितचिंतक'चे पारडे जड झाले. सौभद्र लिहिताना अण्णासाहेबांचे गाडे असेच अडले होते; पण त्यांना स्फटिकाची गणेशमूर्ती पावली नि अण्णांच्या हातून सर्वांगसुंदर सौभद्र पुरे झाले. अगदी तसेच नवल इथे घडले.

जोगळेकर, मुजुमदार आदी 'किर्लोस्कर'ची मालक-मंडळी, चांगल्या हिरॉइनच्या शोधात होती; पण भाऊरावांची जागा धेईल, निदान थोडीफार तरी बरोबरी करील असा माणूस मिळेना. श्रीमंत शाहूमहाराजांचा किर्लोस्कर-मंडळींवर पहिल्यापासून लोभ. त्यांनी मुजुमदारांना निरोप पाठविला. नारायण नावाचा मुलगा अल्लादिया खाँसाहेबांकडे गाणे शिकण्याच्या हेतूने नि औषधोपचारासाठी इथे आला आहे. नायिकेच्या कामासाठी तो योग्य आहे. तरी आपण या नि पहा! शंकरराव लगेच कोल्हापूरला आले. महाराजांच्या भेटीला गेले. सर्व बोलणे झाल्यावर, त्यांनी ताबडतोब चिंतोबा गुरवांना (दिवेकर) बोलावून घेतले. शाहूमहाराजांसमोर नारायणचे गाणे झाले. चिंतोबांना नारायणचे गाणे आवडले. मग महाराजांनीच नारायणाची समजूत घातली. 'तू किर्लोस्कर मंडळीत उतर. तिथे तुझी उत्तम सोय होईल. ही मंडळी औषधपाण्याची व्यवस्थाही करतील.' अशा तऱ्हेने खुद्द शाहूमहाराजांनीच बालके नारायणाची मिरजेत रवानगी केली.

त्याआधी पुण्यात लोकमान्य टिळकांनी त्याचे गाणे ऐकून 'अरे, हा तर बालगंधर्वच ! ' असे उत्स्फूर्त उद्गार काढून, कौतुकाने त्याची पाठ थोपटली होतीच. सुजनहो, हा नारायण म्हणजेच-नारायण श्रीपाद राजहंस. रसिकांचे लाडके बालगंधर्व !

बालगंधर्व मिरजेत कंपनीत आले. सर्व मंडळी त्यांना पहायला उत्सुक होतीच. कारण हिरॉइनच्या कामासाठी, एक अत्यंत देखणा मुलगा कंपनीत येणार आहे अशी कुणकुण त्यांना लागलीच होती. सर्वांबरोबर चहा झाला. मग त्याची

चाचणी घेण्याच्या हेतूने देवलमास्तरांनी (गोविंद बल्लाळ देवल) त्याला आपल्या खोलीत नेऊन, गाणे म्हणण्यास सांगितले. गाणे म्हटले की, नारायण एकदम खूष ! त्याने लगेच गाणे म्हणायला सुरुवात केली. एकापुढे एक अशी तीन-चार पदे म्हटली. शेवटी ' धन्य जाहला तुम्ही माझा राम पाहिला ' हे पद होताच, देवलांनी ' बाळ, पुरे ! ' असे म्हणताच गाणे थांबले. देवलांनी शाबासकी दिली. ' मुलगी पसंत आहे ' या चालीवर हिरॉइन पसंत करून ठेवली असेल. मग रात्री अण्णासाहेब किर्लोस्करांचा प्रसाद (रात्रीचे जेवण) होऊन मंडळी आपआपल्या पथारीकडे वळली.

❋ रंगदेवतेचं दर्शन घडलं

आवाजाच्या चाचणीवरून सहज आठवले की, पूर्वी किर्लोस्कर नाटक मंडळीत, चाचणी घेतली की, तो नट कसा आहे हे चाचणी घेणारी मंडळी सांकेतिक शब्दाने (CODE WORD) सांगत. ज्याची वाणी चांगली असेल, पण गाणे यथातथाच असेल, तर त्याचा उल्लेख ' शेणवी ' म्हणून होई; पण वाणी नि गाणे दोन्हीही उत्तम असेल, तर त्याला ' ब्राह्मण ' म्हणून संबोधीत.

म्हणतात ना की, नाटक मंडळीतली दोन ओगराळी (दोन वाट्या म्हणा) आमटी पोटात गेली की, नाटकावाचून दुसरे काही सुचत नाही. तेच नारायणाचे, बालगंधर्वाचे झाले. दिवेकर–परचुरे–बोडस यांच्या भुलभुलय्यात नि कंपनीच्या वातावरणात ते रमले ! गंमत अशी, तोपर्यंत आपण कंपनीत ' नट ' (' नटी ' म्हणा हवे तर) म्हणून रहायला आलो आहो याची त्यांना अजिबात जाणीव नव्हतीच !

मग एके दिवशी सुमुहूर्ती ' शारदा ' नाटकाच्या नटी-सूत्रधार प्रवेशात (फक्त तेवढाच प्रवेश खास पाच-पंचवीस निमंत्रितांच्या उपस्थितीत मिरजेच्या सरकारी थिएटरात आयोजिला होता.) नटी म्हणून रंगभूमीवर आले. एंट्रीलाच कडकडून टाळ्या पडल्या. रसिकांना साक्षात् रंगदेवतेचे दर्शन घडले ! डोळ्यांचे पारणे फिटले. अण्णांची, भाऊरावांची पुण्याई फळाला आली. किर्लोस्कर मंडळीला नारायणाच्या – बालगंधर्वांच्या रूपाने ' सोनियाच्या शिंपल्यात चिंतामणी गवसला ! '

❋ भीम आणि भीम

कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकरांचे ' कीचकवध ' महाराष्ट्र नाटक मंडळींच्या रंगभूमीवर आले. त्यात नटश्रेष्ठ गणपतराव भागवतांच्या कीचकाबरोबर नटवर्य त्र्यंबकराव प्रधानांचा भीमही मोठा सुरेख होई. गौरवर्ण, बोलके डोळे, भरदार पैलवानी देहयष्टी, ठणठणीत आवाज भीमाच्या भूमिकेला

अगदी हवे तसेच प्रधान होते. अभिनयाची जाण उत्तम. भीमाच्या भूमिकेसारखाच त्यांचा रामशास्त्री (भाऊबंदकी) खूप गाजला होता.

एकदा काय झाले की, श्रीमंत शाहूमहाराज आपल्या परिवारासह विंगमध्ये 'कीचकवध' पहायला बसले होते. नेहमीसारखीच प्रयोगाची रंगत चढती होती. तिसऱ्या अंकातला वल्लभ–सैरंध्रीचा दुसरा प्रवेश टिपेला पोचला होता. विशेषतः कंकभट (धर्म) निघून गेल्यावर सैरंध्री-वल्लभ (भीम) यांच्यातल्या प्रवेशात, काकासाहेबांची वीरवाणी (लेखणी) भीमाच्या तोंडून नुसती आग ओकते. 'भर रस्त्यावर सर्वांदेखत त्याला (कीचकाला) रथातून ओढून काढून लाथ मारून ठार करीन... कौरवांच्या रक्ताने भिजलेल्या माझ्या हातांनी तुझी वेणी घालण्याची प्रतिज्ञा कधीही खोटी व्हायची नाही... तू नुसता हुकूम कर, या क्षणी कीचकाला नाहीसा करतो!' इत्यादी भीमाचे भाषण–नि–अभिनय, प्राण ओतून प्रधान रंगवीत होते. सैरंध्री त्याची समजूत घालून त्याला ढोलीत लपून रहा म्हणून सांगत विंगमध्ये कसे तरी ढकलते. क्रोधाने भडकलेला भीम–प्रधान आत आले, ते थरथर कापत नि धापा टाकीतच! त्यांना मोठ्या प्रेमाने जवळ घेऊन शाहूमहाराज म्हणाले, 'शाब्बास रे भीमा, मोठे झाक काम केलेस पन दमलास व्हय?' असे म्हणत त्यांची मोठ्या कौतुकाने पाठ थोपटली.

अभिनयश्रेष्ठ केशवराव दाते यांनी ही सुखदस्मृति मोठ्या कौतुकाने नि थोड्या मिस्किलपणे नोंदली आहे. महाराष्ट्र नाटक मंडळीत, प्रधान खूपच धिप्पाड असल्याने मोठे मल्लच वाटत; पण त्याक्षणी ते शाहूमहाराजांजवळ उभे असताना, त्यांच्या बगलेपर्यंतसुद्धा पोचत नव्हते, इतके लहान दिसत होते. सहाजिकच आम्हा महाराष्ट्र कंपनीच्या नटवर्गाचा गर्व नाहीसा झाला!

❋ कुस्त्यांचा पंच

कीचकवधाच्या रूपाने, काकासाहेब खाडिलकरांच्या समर्थ लेखणीने, त्या वेळेच्या हिंदुस्थानातल्या (१९०७–८ चा काल) ब्रिटिश राजवटीचे–कर्झनशाहीचे–चित्र हुबेहूब उभे केले. इतके सुंदर रूपकात्मक नाटक दुसरे नाही. त्यातल्या मदोन्मत्त, अहंकारी कीचकाची भूमिका भागवत अशी करीत की त्यांच्या एंट्रिलाच, प्रेक्षकांना कीचकातला कर्झन दिसे. विराटपर्वातल्या कीचकाच्या व्यक्तिमत्त्वाला रतिमात्र न दुखवता खाडिलकरांनी कर्झन उभा केला आहे–ही त्यांच्या लेखणीची जादू! काही प्रयोग झाल्यावर या नाटकावर सरकारने बंदी घातली, कीचकवध मागे पडले; पण 'महाराष्ट्रा'च्या नटमंडळींच्या डोक्यांतून ते नाटक गेले नव्हते. १९११ साली भागवत वारले. १९२४–२५च्या सुमारास महाराष्ट्र नाटक मंडळीची सूत्रे दात्यांच्या हातात असताना त्या नाटकावरची बंदी उठवली गेली. दात्यांनी पुन्हा कीचकवध रंगभूमीवर आणले. या

वेळी अर्थातच नटांची पहिली फळी नव्हती. गंमत अशी की पहिली सैरंध्री–आता कीचक (माधवराव टिपणीस) झाली होती. रत्नप्रभा–भीम झाली होती (केशवराव दाते) दात्यांनी नाटक छान बसविले होते. काकासाहेबांनी काही तालमी घेऊन हात फिरविला होताच. प्रयोग देखणा होई.

नाशिकच्या मुक्कामात कीचकवध गाजत होते. ओळीने खेळ चालू होते. ज्या थिएटरात खेळ होत होते, त्याच थिएटरात एका रविवारी कुस्त्यांचा फड होता. कॉन्ट्रॅक्टर केशवरावांकडे आला नि त्यांना कुस्तीचे पंच म्हणून बोलावू लागला. केशवराव म्हणाले, 'अहो, मला कुस्तीतलं काही समजत नाही.' त्यावर तो म्हणाला, 'वा राव, रोज भीम कसा झोकात करता? त्या कीचकाला डोळ्याचं पातं लवतं न लवतं, तोच पट काढून उलटा करता!' तेव्हा केशवरावांच्या लक्षात आले की, हा आपल्या भीमाच्या भूमिकेचा पराक्रम. कारण केशवराव भीमाचे सोंग उघड्या अंगाने करीत. कधी कधी पंजाबी पैरण घालीत. त्यांचा तो भीम पाहून कॉन्ट्रॅक्टरची खात्री झाली होती की, हा आखाडयात खेळणारा गडी आहे. म्हणूनच तो आला होता. केशवरावांनी त्याची खूप समजूत घातली; पण तो ऐकेच ना! अखेर केशवरावांना ते निमंत्रण स्वीकारणे भागच पडले. आता प्रत्यक्ष मैदानात केशवरावांनी कुस्त्यांचे काय निकाल दिले ते त्यांचे त्यांनाच माहीत!

❋ मालकांना भेटा

रतीचे जया रूप लावण्य लाभे
कुलस्त्री जसे हास्य ओठांत शोभे
सुधेसारखा साद स्वर्गीय गाणे
असा बालगंधर्व आता न होणे

ग. दि. माडगूळकर

'नाही आमुच्या नारायणरावांप्रमाणे मी आपल्याला मायबाप, अन्नदाते म्हणणार नाही. नारायणरावांच्या लडिवाळ प्रतिभेला ते साजून दिसे. नारायणराव म्हणजे रंगभूमीवरील एक अपूर्व घटना. फूटलाइटच्या प्रकाशात उगवलेलं इंद्रधनुष्य! सुगंध असलेला स्वर आणि स्वर असलेलं चांदणं!

(नटसम्राट) वि. वा शिरवाडकर
(कुसुमाग्रज)

रसिकहो, दोन कविश्रेष्ठांनी, आपल्या नेटक्या शब्दफुलात साकारलेले हे बालगंधर्वांचे गालिचाचित्र! यापरती नारायणरावांच्या रूप–गुणांसाठी साजरी अक्षरे कोठून आणायची? आपल्या देवकोटीतल्या कलावैभवात, मधुमधुरा शब्दसुरात, रसिकांना न्हाऊन काढणारे, बालगंधर्व कलावंत म्हणून जितके थोर

तितकेच माणूस म्हणूनही खूप खूप मोठे होते. ते किर्लोस्कर संगीतमध्ये आल्यापासून, कंपनीचा प्रत्येक खेळ चढत्या उत्पन्नाचा होऊ लागला. शकुंतला, सुभद्रा, वसंतसेना, शारदा या साऱ्याच नायिका ते रंगवू लागले. त्यांच्या कामावर प्रेक्षकांच्या उड्या पडत. फार थोड्या अवधीत ते रसिकांचे लाडके झाले. थोरामोठ्यांकडून नि मान्यवर संस्थांकडून त्यांना गाण्यासाठी गळ घातली जाऊ लागली. पुण्यात डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, नूतन मराठी विद्यालय अशा अनेक शिक्षणसंस्थांतून त्यांची खूप गाणी होत. मुंबई, नागपूरमध्ये अशाच बैठकी होत. या बैठकींना जाणत्या रसिकांबरोबरच फुकट्यांचीही खूप गर्दी होई. अशा मैफलींना सर्वांना मुक्तद्वार असे. बालगंधर्वांना पारितोषिके नि बिदागीही चांगली मिळे. परंतु याचा किर्लोस्कर मंडळींच्या नाटकावर परिणाम होईल असे चालकवर्गाला वाटल्याने, कंपनीच्या हिताच्या दृष्टीने, त्यांनी अशा बैठकी करू नयेत म्हणून नारायणरावांना सुचविले. नारायणराव कंपनीचे नोकर होते. लोकप्रियतेची हवा त्यांच्या डोक्यात शिरली नाही. नाही तर बालगंधर्वांनी कंपनी सोडली असती तर ? पण चालकांच्या या सांगण्याला क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी होकार दिला. कुणी मोठी मंडळी मैफलीची अक्षत घेऊन आली, की नारायणराव सांगत, ' मालकांना (नानासाहेब जोगळेकरांना) भेटा. त्यांनी परवानगी दिली तरच मी गाईन. नाही तर नाही ! '

⁂ मी सुद्धा थर्डक्लासमध्ये बसेन

अण्णासाहेबांपासूनच किर्लोस्करमंडळीचा राजशाही थाट होता. कशाकशात म्हणून कधी कमतरता नसायची; पण पुण्यात ' किर्लोस्कर थिएटर ' बांधल्यापासून, कंपनीला खूप कर्ज झाले होते म्हणून थोडीशी काटकसर करण्याची कल्पना मालकांच्या डोक्यात आली. एकदा कंपनी हुबळीहून मिरजेला जायला निघाली. कंपनीचा प्रवास नेहमी सेकंडक्लासने होई. त्या दिवशी जोगळेकर, बालगंधर्व, बोडस इत्यादी प्रमुख नटांची सेकंडक्लासची तिकिटे काढली गेली. बाकी नट नि कामगारांना थर्डक्लासमध्ये बसविण्यात आले. साहजिकच मंडळी नाराज झाली. मिरजेला पोचताच, स्टेशनवरच या कुरबुरीला वाचा फुटली. नेहमी आमची सेकंडक्लामध्ये सोय असते. या वेळी आम्हाला थर्डमध्ये बसवून आमचा अपमान करण्यात आला आहे. आम्ही काम करणार नाही ! या मसुद्याचा अर्ज मालक जोगळेकरांना द्यायचे घाटत होते. ही गडबड बालगंधर्वांच्या लक्षात आली. ते ताबडतोब त्या मंडळींत मिसळले. तक्रारीचे स्वरूप समजताच म्हणाले, ' मंडळी, तुमचे म्हणणे अगदी रास्त आहे. आपण सर्वांनी नेहमी एकाच वर्गाने प्रवास करायला हवा. या वेळी जरी मी सेकंडक्लासने आलो असलो, तरी तुमच्याइतकेच मला दुःख होत आहे. यापुढे तुम्हा सगळ्यांना

सेकंडमध्ये बसविले तरच मी सेकंडक्लासात बसेन; मग झालं ना ?' खुद्द बालगंधर्वांनी पुढाकार घेतल्याने, ते वादळ तिथेच शमले.

लक्षात घ्यायला हवे की, बालगंधर्वही त्या वेळी किर्लोस्करमंडळीचे नोकरच होते; पण त्यांना सगळ्यांचेच मनापासून प्रेम होते. पडद्याआडच्या कलावंतांची त्यांना कणव होती. आज 'बॅकस्टेज आर्टिस्टस्' चे जे नि जसे प्रश्न आहेत, ते त्या वेळच्या नाटक मंडळ्यांनाही होते; पण एकत्र कुटुंबाच्या भावनेतून ते सोडविले जात होते. आज नाट्यव्यवसाय अगदीच निराळा झाला आहे.

❋ केवळ मित्रासाठी

बालगंधर्वांना किर्लोस्कर संगीत मंडळीच्या जुन्या माणसांविषयी अत्यंत प्रेम. कारण आपण प्रथम रंगभूमीवर आलो, ते इथेच. याच मातृसंस्थेत. हा एवढाच कृतज्ञतेचा धागा त्यांना पुरेसा होई. गोविंदराव सोरटी हे असेच एक जुने किर्लोस्करचे स्त्रीपार्टी. बालगंधर्वांचे स्नेही. नाट्यव्यवसाय सोडून त्यांनी कुंचला हाती घेतला नि उत्तम चित्रकार झाले. स्वतःची छबी रंगवायची सोडून चित्र रेखाटू लागले. त्यांनी काढलेले अण्णासाहेब किर्लोस्करांचे तैलचित्र बालगंधर्वांच्या पाहण्यात आले. ते त्या चित्रावर निहायत खूष झाले. म्हणाले, 'देवा, हे ठेवा आम्हाला !' मग, मोरोबा, बाळकोबा, भाऊराव, आपले गुरू भास्करबुवा बखले अशी एकामागून एक चित्रे गोविंदरावांकडून काढून घेतली. याचा मोबदला म्हणून सोरटींना बालगंधर्वांकडून पाच हजारांहून अधिक मेहताना मिळाला. अर्थात तो सौदा नव्हता, व्यवहार नव्हता, मैत्रीचा मामला होता. गंधर्वांनी आपल्या नेहमीच्या स्वभावानुरूप गोविंदरावांना भरपूर पैसे दिले होते. सोरटींनी ते पैसे हातावेगळे ठेवून, त्या पैशातून पुण्यात एक टुमदार घर बांधले. आपल्या मित्राच्या–बालगंधर्वांच्या–प्रेमाचे प्रतीक म्हणून त्या वास्तूचे नाव ठेवले 'नारायणआश्रम.'

❋ मखमलीचा पडदा

आज ज्याला आपण दर्शन पडदा म्हणतो अंकाचा पडदा म्हणतो, तोच मखमलीचा पडदा ! आज बहुतेक नाट्यगृहांतून, असा पडदा त्या त्या नाट्यगृहाचाच असतो. त्यावरच सर्वजण आपली नाटके करतात. पूर्वी असा पडदा नसे. प्रत्येक नाटकमंडळीचा वेगवेगळा दर्शनी पडदा असे. कुणाचा गंगावतरणाच्या सीनचा, तर कुणाचा राधा-कृष्णाच्या चित्राचा; पण हे पडदेही अत्यंत कलात्मक असत. त्यावरून त्या कंपनीची शान ठरे.

ललितकलादर्श (१९०८) गंधर्व (१९१३) नि बलवंत (१९१८) या कंपन्यांचे पाळणे पाच पाच वर्षांच्या अंतराने हललेले दिसतात. यात आजचे

planned parenthood नव्हते हं! तो योगायोग होता. गंधर्व कंपनी स्थापन होण्यापूर्वी नारायणराव बालगंधर्व लोकप्रिय झाले होते. जोडीला टेंबे, बोडस होते. 'बलवंत' निघाली तेव्हा मा. दीनानाथ यांच्याबरोबर चिंतामणराव कोल्हटकर नि कोल्हापुरे होते; पण 'स्वदेशहितचिंतक' सोडून ललितकलादर्श स्थापन करताना केशवराव भोसले– हा एक खांबी तंबूच होता. सात–आठ भागिदार होते; पण केशवरावांना ती 'अष्टग्रहीच' ठरली म्हणा ना! हळूहळू सगळे दूर झाले नि एकटे केशवराव उरले. मान्यवर नाटककारांची नवी नाटके मिळत नव्हती. सहकारी तोंडघशी पाडीत होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केशवराव निष्ठेने संस्था चालवीत होते. अखेर १९१३ साली वीर वामनराव जोशी यांचे 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे नवे नाटक त्यांनी रंगभूमीवर आणले. सर्वस्व पणाला लावून नाटक उभे केले. काही कमी पडू दिले नाही आणि सुदैवाने या नाटकाने पैशांचा पाऊस पाडला. कर्ज धुऊन गेले. पुढचा मार्ग मोकळा झाला.

या नाटकाचे सर्व सीन्स आनंदराव मेस्त्री (पेंटर) यांनी तयार केले होते. रसिकहो, याच खेळाच्या दिवशी भारी किंमतीचा, किरमिजी रंगाचा, मखमलीचा पडदा, केशवरावांनी प्रथम मराठी रंगभूमीवर झळकवीला. २० सप्टेंबर १९१३! बॉम्बे थिएटर, मुंबई.

या पडद्याची एक मोठी गमतीची गोष्ट पु. श्री. काळे यांनी नोंदून ठेवली आहे. हा पडदा ललितकलादर्शच्या रंगभूमीवर आल्यावर एकदा एक प्रोफेसर नाटक पहायला आले. तिसरी घंटा होताच, पडदा मधोमध विभागून उघडला जाऊ लागला. तोच ते प्रोफेसर, 'पडदा फाटला, पडदा फाटला' म्हणून ओरडू लागले; पण मग त्यांनी त्या पडद्याचे इंगित समजावून घेतले. त्यांनी असा सरकता पडदा पाहिलाच नव्हता. तोपर्यंत गुंडाळत वर जाणारे रोलरचेच पडदे होते.

❋ स्त्रीपार्टी

आता स्त्रीपार्ट इतिहासजमा झाला आहे. आजच्या पिढीला स्त्रीपार्ट म्हणजे काय, हेच माहीत नाही. आता स्त्रियांची कामे स्त्रियाच करतात; पण या वाक्-प्रयोगातून नकळत सूचित होते की, यापूर्वी स्त्रियांची कामे–भूमिका पुरुष करीत होते खरे ना? नि ते खरेच आहे. रंगभूमीच्या अगदी सुरुवातीपासून तो शत-सांवत्सरिक नाट्यमहोत्सव होईतो– (१८४३ ते १९४३) मराठी रंगभूमीवर पुरुषच सर्व नाटकातून स्त्री भूमिका करीत होते. स्त्रिया मुळीच नव्हत्या असे नाही. होत्या– काही स्त्रिया रंगभूमीवर आल्या होत्या. कामेही चांगली करीत होत्या; पण अधिराज्य होते, ते स्त्रीपार्टी नटांचेच! अहो, नाट्यमहोत्सवातल्या 'शारदे'त बालगंधर्व–इंदिराकाकू नि मा. नरेश– शारदा होते.

मराठी रंगभूमीवर किती तरी देखणे गुणी स्त्रीपार्टी होऊन गेले. कुणाचे

वर्णन 'पर्लेन्हाईट' तर कुणाचे 'स्वरूपसुंदर' असे केले जाई. भाऊराव कोल्हटकर, बाळाभाऊ जोग ही नावे फार जुनी झाली; पण बालगंधर्व, पोतनीस, मा. दीनानाथ, नानासाहेब चापेकर, बापुराव माने, मा. नरेश आदींचे गुणगान करणारी (आणि ते सत्यही आहे) कितीतरी रसिक मंडळी आहेत. अनेकांच्या बाबतीत अनेक नवलकथा घडल्या आहेत.

नानासाहेब चापेकरांच्या बाबतीत घडलेली अशीच एक घटना, अगदी परवा परवा नानासुद्धा कधी गप्पांच्या रंगात आले की सांगत. बापूसाहेब पेंढारकरांना नाविन्याचे अती वेड. आपल्या नाटकांना (ललितकलादर्श) साजेल असेच वास्तव नेपथ्य (सीनसिनरी) हवे ही त्यांची नित्याची धडपड. मुंबईच्या मुक्कामात आपल्या मित्रांबरोबर त्यांनी 'हॅलोवे कोर्टनीज' या इंग्लिश नाटक मंडळीची काही नाटके पाहिली. त्यांचे नेपथ्य अगदी नाटकाला हवे तसे असे. म्हणून आपल्या 'सत्तेचे गुलाम' या नव्या नाटकासाठी, तसे फ्लॅटसीन्स करून घेतले. पु. श्री. काळे (व. पुं. चे वडील) यांचे 'सत्तेचे गुलाम'चे बॉक्ससीन म्हणजे त्या वेळचे एक नवल होते, अपूर्वाई होती.

'हॅलोवे कोर्टनीज' या कंपनीच्या कलावंतांशी बापूसाहेब, काळे, चापेकर यांचा चांगला परिचय झाला होता. त्यांना आपले नवे नाटक पहायला बोलाविले. पहिला अंक संपला नि ती पाच-सहा नटनटी आत आली. चहापान झाले. नलिनीच्या (नायिका) भूमिकेत नखशिखांत श्रीमंती पोषाखात नाना होते. त्या ग्रुपमधल्या इंग्लिश नटीने (त्यांची हिरॉईन) नानासाहेब चापेकरांची खूप तारिफ केली. शाल, दागदागिने पुन्हा पुन्हा हात लावून पहात होती. हाऊ फाईन! म्हणून वस्तूंचे ती कौतुक करीत होती. अखेरीला न राहवून, तिने नानांच्या कृत्रिम उरोजांची सुद्धा लाजत लाजत चौकशी केली. (How do you manage this?) हे आपण कसे करता? रंगपटातून बाहेर पडताना ती नानांकडे सारखी वळून वळून पहात होती. जाताना म्हणाली, 'Still I don't believe you are a man' माझा विश्वासच बसत नाही, तुम्ही पुरुष आहा म्हणून! त्यावर नाना इतकेच म्हणाले, 'Excuse me madam, but I can't help it' याखेरीज, नाना दुसरे काय उत्तर देणार? लक्षात असू दे, नानासाहेब चापेकर हे त्या काळातले एकमेव ग्रॅज्युएट नट होते. नाट्यव्यवसायातून निवृत्त झाल्यावर पुष्कळ वर्षे ते आकाशवाणीवर अधिकारी होते. हो, आणि नागपूरच्या नाट्यसंमेलनाचे (१९६२) ते अध्यक्षही होते.

❋ मानापमान

पंचशरे गद्यवरे वश जी झाली
नाटकाला कविकृष्णा माला घाली

कांचनगडची मोहना, सवाई माधवराव यांचा मृत्यू, भाऊबंदकी, कीचक-वध नि बायकांचे बंड या कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकरांच्या 'महाराष्ट्र नाटक मंडळी'च्या रंगभूमीवर गाजलेल्या गद्य नाट्यकृती त्यानंतर 'पंचशरे गद्यवरे' त्यांचे 'किर्लोस्कर संगीत मंडळी'च्या रंगभूमीवर आलेले पहिले संगीत नाटक मानापमान !

'मानापमान'चा पहिला प्रयोग, १२ मार्च १९११ ला, मुंबईत सादर झाला. काकासाहेबांचे पहिले संगीत नाटक. गोविंदराव टेंबे यांच्या चाली. नाटकात संगीत दिग्दर्शक आला तो इथेच. जोगळेकर, बालगंधर्व, बोडस असा त्रिवेणीसंगम. प्रयोग दुपारचा होता. नाटकाची तिकिटे केव्हाच संपून गेली होती; पण दुर्दैवाने त्याच दिवशी सकाळी बालगंधर्वांची वर्षा-दीड वर्षांची लाडकी मुलगी अल्पशा आजाराने वारली. कंपनीत सर्वत्र दुःखाची छाया पसरली. श्री. शंकरराव मुजुमदार, नानासाहब जोगळेकर, स्वतः काकासाहेब खाडिलकर यांनी प्रयोग बंद ठेवण्याचे ठरविले. त्यावर बालगंधर्व म्हणाले, 'नाही नानासाहेब खेळ रहित नाही करायचा. मी अगदी मनोभावे काम करीन. काकासाहेबांचे हे पहिले संगीत नाटक आहे ! गोविंदरावांनी दिलेल्या पहिल्या वहिल्या चाली, मुहूर्ताचा खेळ बंद ठेवला, तर यांचे नाटक अजून नीट बसले नाही. त्यात काही तरी न्यून आहे, असा बभ्रा होईल. काकासाहेबांसारख्या थोर नाटककाराच्या संगीत नाटकाला अपशकून होईल. त्यांचा हिरमोड होईल !' त्यांनी कुणाचेच ऐकले नाही. खेळ झाला. 'टकमक पाही' या मानापमानातल्या पहिल्या पदा-पासूनच बालगंधर्वांना वन्समोअर मिळून त्यांची भामिनी रंगत गेली. भामिनी-बरोबरच जोगळेकरांचा धैर्यधर रंगला. बोडसांचा लक्ष्मीधर यशस्वी झाला. खाडिलकरांचे 'मानापमान' त्यांच्या संगीत नाट्यसृष्टीतल्या प्रवेशाचे नाट्य-सोपान ठरले ! संस्थेची, स्नेह्यांची अशी काळजी वहाणारा श्रद्धाळू कलावंत म्हणून बालगंधर्व साहजिकच सर्वांच्या कौतुकाचा विषय झाला. बालगंधर्वांची कन्या जणू 'मानापमान'वरून 'दृष्टमिष्ट पापी चांडाळाची' म्हणून, ओवाळली गेल्यानेच मानापमानाला इतके उदंड यश लाभले नाही ना ?

❋ देवा, ते मोठे आहेत !

एक श्रेष्ठ नट म्हणून, गणपतराव बोडसांचे गुण कुणीच नाकारणार नाही. शकार, लक्ष्मीधर, फाल्गुनराव या भूमिका पहाताना त्यांची आठवण होणे अटळ आहे; पण त्याबरोबरच हेही लक्षात घ्यायला हवे की, त्यांच्या यशाची कर्मभूमी, आधी 'किर्लोस्कर' नि नंतर प्रदीर्घ काळ 'गंधर्व' रंगभूमीच होती. अन्य ठिकाणी ते उभे राहिले; पण सायसंगत जुळली नाही. जीव जडला नाही. गंधर्वांकडच्यासारखे यश लाभले नाही. कौतुक झाले नाही. व्यवहारी विचाराने

नि अधिक लाभाच्या हिशेबी अंदाजाने त्यांनी गंधर्व कंपनी काही वेळा सोडली. भागिदारी पुरेपूर वसुलीने तोडली; पण बालगंधर्वांना मात्र गणपतराव आपल्याकडेच हवेत, आपल्याच स्टेजवर दिसावे असे मनोमनी वाटे. असेच ते एकदा पुन्हा कंपनीत आले. नारायणरावांचा आनंद ओसंडू लागला. नाटकांच्या तालमी सुरू झाल्या. खेळ रंगू लागले.

तालमीच्या वेळीसुद्धा, गणपतराव कवीच्या (नाटककाराच्या) मालकांच्या गादीवर बसलेले दिसत. बालगंधर्व मात्र इतर नटवर्गाबरोबर सतरंजीवर बसत. 'आपले मालक आपल्याबरोबर सतरंजीवर, नि बोडस गादीवर' हे अनेक नामवंत नटांना रुचत नसे. एक दिवस धीर करून, त्यांनी बालगंधर्वांना विचारले 'नाना, हे असे काय म्हणून!' त्यावर आपल्या नेहमीच्या स्वभावानुसार ते आर्जस्वी शब्दात उत्तरले, 'मायबाप' तेच योग्य आहे. आपले गणपतराव मोठे आहेत. भाऊरावांचा त्यांना सहवास लाभला आहे. देवलमास्तरांचे ते शिष्य आहेत. तालीममास्तर आहेत. ते तिथेच हवेत. शिवाय आता ते जायचे नाहीत!

याचे नाव नारायणराव बालगंधर्व! दुसरे अन्य नाही.

❋ खाऊ द्या हो थोडे

बालगंधर्व बाहेर पडले की, झालेला खर्च परत आल्यावर कारकुनाला सांगत. मग तो त्यांच्या नावे खर्ची टाकला जात असे. एकदा कारकुनाने लिहिलेला खर्च बरोबर आहे की नाही, हे पहाण्यासाठी कंपनीचे कारभारी दादा काटदरे, यांनी बालगंधर्वांना विचारले, 'नारायणराव, काल तुम्ही तीन वेळा व्हिक्टोरिया (घोडागाडी) केली होती का? दहा रुपये देवधर्म केला का?' त्यांच्या विचारण्याचा रोख नि हेतू नारायणरावांच्या लक्षात आला. ते लगेच म्हणाले, 'हे पहा दादा, म्हणजे त्या कारकुनाने, थोडा जास्त खर्च माझ्या नावावर दाखविला आहे. असेच ना? खाऊ दे हो गरिबांनी चार पैसे! श्रीमंताकडे लोक काय थोडे पैसे खातात? मग हा बिचारा तर आपलाच आहे!' यावर दादा काय बोलणार दगड!

❋ या नव नवल नयनोत्सवा–

'सुवर्णअक्षरात लिहून ठेवण्यासारखा दिवस' असे वर्णन, अनेक वक्ते, अनेक प्रसंगी मोठ्या भावुकपणे करतात; पण ते सारेच प्रसंग तसे नसतात हे आपणही जाणतो. कारण त्यात भावनेचाच भाग अधिक असतो; पण खरोखरच 'माना विशेष योग' किंवा 'न मिळे अशी मौज पुन्हा पाहण्या नरा' या सौभद्रातल्या नारदाच्या तोंडच्या पदात वर्णिल्याप्रमाणे खरोखरच फार थोडे प्रसंग असतात. म्हणूनच त्याचे कौतुक नि अपूर्वाई.

अण्णासाहेब किर्लोस्करांचे शाकुंतल रंगभूमीवर आले तो दिवस, भाऊराव

कोल्हटकर सुभद्रेच्या भूमिकेत रंगभूमीवर आले तो दिवस, गणपतराव जोश्यांनी हॅम्लेट म्हणून स्टेजवर एंट्री घेतली तो दिवस, हे दिवस नाट्यरसिकांच्या लेखी खरेच मोठे भाग्याचे ! आणि अगदी तसाच, हो हो अगदी तस्साच– काकणभर अधिकच भाग्याचा नि तो म्हणजे, केशव–नारायणांच्या संयुक्त मानापमानाचा ! ' केशवनारायण ' (केशवराव भोसले नि नारायणराव बालगंधर्व) रसिकांना एकाच रंगमंचावर धैर्यधर नि भामिनीच्या भूमिकेत दिसले, तो ' केशव–नारायण ' संयुक्त प्रयोगाचा– ८ जुलै १९२१ शुक्रवार, ' वालिवाला ग्रँड थिएटर ' मुंबई !

मान्यवर मंडळींच्या विनंतीनुसार, महात्मा गांधींच्या टिळक स्वराज्य फंडासाठी हे दोन मातब्बर कलावंत एकत्र आले होते. ' ललितकलादर्श–गंधर्व ', ' केशव–नारायण ' असा हा अपूर्व संगम होता. प्रेक्षकांना ती महापर्वणी होती ! रसिकहो, आज टेस्ट मॅचेस सुरू झाल्या की, जो अपूर्व उत्साह, क्रिकेटशौकिनात दिसतो, तसाच उत्साह संयुक्त मानापमानचा प्रयोग जाहीर झाल्यापासून उभ्या महाराष्ट्रात दिसत होता. जिकडे जावे तिकडे तो एकच विषय होता. मुंबई–पुण्याच्या प्रेक्षकांच्या तिकिटांवर उड्या पडतच होत्या; पण नागपूर, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदा, कलकत्ता अशा अनेक मोठ्या शहरांतली मराठी मंडळी, आपले मुंबईतले मित्र नि नातेवाईक यांना तारा करून आपली तिकिटे रिझर्व्ह करीत होती ! संयुक्त प्रयोग जाहीर झाल्यापासून निरनिराळी वर्तमानपत्रे आपआपल्या-परीने लिहितच होती. ' संदेश ' कार साहेबांनी (अच्युतराव कोल्हटकर) आपल्या विशिष्ट शैलीत लिहिले होते, ' या संयुक्त प्रयोगात संगीतसूर्य केशवराव भोसले यांची धैर्यधराची आणि संगीतचंद्र बालगंधर्व यांची भामिनीची अशा नितांत सुंदर भूमिका एकाच रंगभूमीवर पहाण्याची सुवर्णसंधी प्रेक्षकांना मिळणार आहे ! '

केशवराव भोसले नि नारायणराव बालगंधर्व हे आपआपल्यापरीने लोकप्रिय होतेच; पण बालगंधर्व या नावाभोवती भक्तीचे, लोकप्रियतेचे एक वलयच निर्माण झाले होते. बालगंधर्वांखेरीज दुसऱ्या कोणाचे नाटकच पहायचे नाही, असाही एक प्रेक्षकवर्ग पुण्यामुंबईत होता. इतके बालगंधर्वांवर प्रेम ! सुभद्रा, वसंतसेना, भामिनी, देवयानी, रेवती या तर बालगंधर्वांच्या पेटंट भूमिकाच ! पण ' स्वयंवर ' रंगभूमीवर आले नि त्यांच्या रुक्मिणीने रसिक वेडे झाले. (दादा, ते आले ना !) गंधर्वांचे दर्शन सदैव स्त्रीभूमिकेतच होत होते. त्यांचे नाव नारायण होते म्हणून त्यांना पुरुष म्हणायचे ! नाही तर ते साक्षात लक्ष्मीच !

केशवराव मात्र स्त्री नि पुरुष अशा दोन्हीही भूमिका करीत. त्यांच्या ' मृणालिनी 'ने (राक्षसी महत्त्वाकांक्षा) लोकप्रियतेचे शिखर गाठले होते; पण ते खरे रमले ते डॉ. गुलाब (हाच मुलाचा बाप) डेव्हिड (संन्याशाचा संसार) शिवाजी (शहा शिवाजी) धैर्यधर (मानापमान) या पुरुष भूमिकांतच !

म्हणूनच त्या दोघांना एकत्र पहायला, नि तेसुद्धा मानापमानात–रसिक वेडे झाले होते- केशव–नारायणांच्या भक्तांना भक्तीचे भरते आले होते. खेळाची सुरुवात संध्याकाळी साडेसात वाजता होणार होती; पण दुपारी तीन वाजल्यापासूनच थिएटरवर तोबा गर्दी होती. तरी त्या दिवशी थिएटरवर तिकिटविक्री नव्हती. सर्व प्लॅन चार दिवस आधीच भरला होता. संध्याकाळी, बालगंधर्व, केशवराव थिएटरवर आल्यावर त्यांनाही आत जायला वाट मिळेना. शेवटी ओरडून सांगावे लागले, ' बालगंधर्व, केशवराव आले आहेत त्यांना आत जायला वाट द्या ! '

संध्याकाळी साडेसातला सुरू झालेले नाटक पहाटे अडीच वाजता संपले ! केशव–नारायणांच्या गान-अभिनयाने प्रेक्षकांना मंगलस्नान घडले, असा तेज, तडफदार धैर्यधर गंधर्वांच्या रंगभूमीवर यापूर्वी दिसला नव्हता नि अशी सर्वांग-सुंदर भामिनी ललितकलेच्या रंगमंचावर दिसली नव्हती ! आजवर जणू प्रेक्षकांच्या एकाच डोळ्याचे समाधान होत होते; पण आज ते दोनेत्री भरून पावले ! नाटकाचे सोळा हजार रुपये उत्पन्न गांधीजींच्या स्वाधीन केले. जाणत्या माणसांच्या मते जर हा खेळ खास व्यवस्था करून खुल्या नाट्यगृहात (open air theatre) आयोजित केला असता तर लाखाच्या आसपास उत्पन्न झाले असते !

❋ नाटकात नसलेला प्रवेश

ललितकलादर्श नि गंधर्व यांच्यात सात्त्विक चुरस नेहमीच असे; पण त्यात कटुता नव्हती. केशवरावांना बालगंधर्वांविषयी आत्यंतिक आदर होता. ते नेहमी म्हणत सुद्धा, ' नारायणरावांचे सगळेच काही सहजसुंदर ! आम्ही कष्ट करून ताना बसवाव्या, तर नारायणरावांच्या गळ्यातून अशी सुंदर निपज निघते की वा रे वा ! खेळ चालू असता चौथ्या अंकातल्या दुसऱ्या प्रवेशात (तंबूचा सीन) भामिनी (वनमाला) धैर्यधराचा पोषाख उतरीत असते. शेवटी वनमाला (बालगंधर्व) धैर्यधराचे (केशवरावांचे) चढाव उचलू लागते. केशवरावांसारख्या भावनाशील कलावंताला ते सहन होईना. ते हळूच म्हणाले, ' नारायणराव, तुम्ही माझ्यापेक्षा मोठे आहात. ते चढाव उचलू नका ! ' नारायणरावांनी त्यांच्याकडे नुसते पाहिले. जणू त्यांचे डोळेच बोलत होते, ' देवा, मी आता वनमाला आहे, नारायणराव नाही ! '

प्रवेश संपून आत गेल्यावर केशवरावांनी पुन्हा तीच भावना व्यक्त केली. इतकेच नव्हे तर, ' अहो नारायणराव, कर्ज कर्ज काय घेऊन बसला आहात ? असे संयुक्त खेळ करून हां हां म्हणता तुमचं कर्ज फेडून टाकू ! ' असे मोकळ्या मनाने आश्वासन दिले; पण ते घडायचे नव्हते. पुढे लवकरच (४ ऑक्टोबर १९२१) केशवरावांचे विषमज्वराने पुण्यात अकाली निधन झाले !

⁂ दुःख कुणाचे, अश्रू कुणाला ?

सामान्यांनी असामान्य म्हणून भक्तिभावाने डोक्यावर घेऊन नाचविलेला नि असामान्यांनी नतमस्तक होऊन गौरविलेला, मराठी रंगभूमीवरील एकमेव श्रेष्ठ कलावंत म्हणजे रसिकांचे लाडके नटसम्राट बालगंधर्व ! बालगंधर्व हा रसिकांचा ठेवा होता. रंकापासून रावापर्यंत प्रत्येकाची 'मम सुखाची ठेव' होती. कुणी त्यांचे दर्शन सात रुपयांच्या खुर्चीवरून घेत होते, तर कुणी आपले लाडके दैवत पिटातल्या एक रुपयाच्या जागेवरून जिवेभावे न्याहाळीत होते. त्यांच्या वैभव-पर्वात, नाटकाखेरीज त्यांचे दर्शन दुर्लभ होते.

पण देवालाही दुःख असते, मग बालगंधर्व तर काय माणूसच ! देव-लोकातला शापित गंधर्व. तोही आपले विधिलिखित घेऊनच जन्माला आला होता. सदैव कलावैभवाचीच भव्य स्वप्ने पहात होता. कलेसाठी उधळण करताना कधी पैशांचा हिशोब मांडला नाही. त्यांचे पाय कधी जमिनीवर नव्हतेच. म्हणूनच व्यवहारी जगात, ते 'व्यवहारी अपूर्णांक' राहिले !

ऐनवैभवात असतानाही बालगंधर्वांना-गंधर्व मंडळीला लाख-दीड लाख रुपयांचे कर्ज झाले होते. हा हा म्हणता ही बातमी सगळीकडे पसरली. नारायण-रावांवर रसिकांचे किती प्रेम किती जिव्हाळा की, ते कर्ज जणू आपल्याच घरावर आलेली आपत्ती आहे असे प्रत्येकाला वाटत होते. जो तो आपल्यापरी हळहळत होता. त्यात वालचंद-शेठजींसारखे (वालचंद हिराचंद) रसिक धनिकही होते. एक दिवस ही धनिकमंडळी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीत जमली नि बसल्या बैठकीत दीड लाख रुपये जमा केले ! हेतू हा की, नारायणरावांचे एक-रकमी कर्ज फेडून टाकावयाचे !

पण मित्रहो, नारायणरावांनी ते पैसे स्वीकारले का ? नाही—नाही ! नारायणराव हे रसायनच काही वेगळे होते. तो काही दक्षिणेला, दानाला पुढे सरसावणारा हात नव्हता. ते एवढेच म्हणाले, 'मायबापा, मला धन नको. माझ्यापाशी आहे ते तुमचंच आहे. माझं कर्ज मी फेडीन ! फक्त माझ्यावर व कंपनीवर लोभ मात्र असाच ठेवा !' उगीच नाही, लोकांनी लोकमान्यांसारखे उदंड प्रेम केले बालगंधर्वांवर ? टिळक नि बालगंधर्व ही लोकांची दैवते होती ! इथे नकळत आठवण येते, ती भालाकार भोपटकरांच्या अग्रलेखातल्या एका खुमासदार वाक्याची. ते लिहितात, 'बासुंदी, बालगंधर्व आणि बाल गंगाधर या तीन गोष्टी महाराष्ट्राला फार आवडतात !'

⁂ अखेरची इच्छा !

बालगंधर्व हे वसंत शांताराम देसाई यांचे दैवतच म्हणा ना ! त्यांना अनेक

वर्ष नारायणरावांचा सहवास लाभला आहे. नारायणरावांवर लिहिताना त्यांच्या हळूवार नि मर्मज्ञ लेखणीचे मोठे लोभस दर्शन घडते. नारायणरावांच्या प्रेक्षकांचे वर्णन करताना ते लिहितात, 'गंधर्व मंडळीचा प्रेक्षकवर्ग इतर कंपन्यांपेक्षा अधिक संपन्न आणि अधिक व्यापक होता. गजांत लक्ष्मीत लोळणारे गुजराथी, भाटिये, खोजे आणि मुलतानी नामांकित कायदेपंडित आणि आरोग्यपंडित, परगावाहून आलेले षोकी मुशाफीर, आणि विश्वविद्यालयातील गुजराथी नि महाराष्ट्रीयच नव्हे, तर मद्रासी विद्यार्थीही. अशा प्रेक्षकांनी सदैव तुडुंब भरलेल्या रंगमंदिरात स्त्री–प्रेक्षकांचा भरणा 'डोळ्यात भरण्याजोगा असे !'

म्हणजेच ज्याला आम्ही आज सर्वधर्म-समभाव म्हणतो, तो गंधर्व-प्रेक्षकांत त्या वेळी वसत होता. त्यातच बालगंधर्व म्हणजे ज्यांचा जीव की प्राण, असे एक रसिकराज होते. त्यांचे नाव– लाला लखमीचंद ईश्वरदास ! १९२६ सालापासून नारायणरावांची नि त्यांची ओळख होती. पुढे त्याचे मैत्रीत रूपांतर झाले. त्यानंतर ते केवळ गंधर्वांची नाटके पहाण्यासाठी पुण्या-मुंबईत मुक्काम करू लागले. इतकेच नव्हे तर गंधर्वांना पुढे वेळोवेळी मदत करीत पन्नास हजारांचे कर्ज दिले. गंधर्वांनी कराचीला आपल्या घरी यावे, पाहुणचार घ्यावा, अशी त्यांची फार इच्छा होती. वारंवार ते नारायणरावांना तसा आग्रह करीत. नाटकातून सिनेमात गेल्यावर (धर्मात्मा) त्यांना तसा थोडी अवधी होता, म्हणून लालाजींच्या इच्छेखातर कराचीला विश्रांतीसाठी जाण्याचे बालगंधर्वांनी ठरविलेही होते; पण अखेरपर्यंत तो योग आला नाही !

लालाजींच्या मृत्यूसमयी (१९४०) त्यांच्या मुलांनी त्यांची अखेरची इच्छा विचारताच त्यांनी सांगितले, 'नारायणराव बालगंधर्वांचे गाणे ऐकत ऐकत डोळे मिटावेत एवढीच माझी इच्छा आहे. त्यांना आणा !' पण ते घडले नाही. तेवढा अवधीच नव्हता. अखेर ध्वनिमुद्रिकांवरच भागविणे भाग पडले !

'देहावसानाच्या वेळी मुखी रामकृष्ण यावा' हे आपण समजू शकतो; पण कानी नाद 'नारायणा'चा यावा, हे 'मम मनी कृष्णसखा रमला' सारखेच नाही का ?

※ गडकरी गेले !

राम गणेश गडकरी म्हणजे नाट्य-काव्य-विनोदाचा त्रिवेणी संगम ! कै. बापूसाहेब माटे यांनी म्हटलंय की, 'गडकरी म्हणजे घरंदाज खानदानी स्त्रीची नखशिखांत दागिन्यांनी भरलेली ट्रंक' या साहित्यसागरात हवा तो 'अलंकार' हाती लागतो. १९१८ मधल्या एकवीस–बावीस सप्टेंबरची गोष्ट. गडकरी आजारी होते; पण काही जरुरीच्या कामानिमित्त त्यांना मुंबईला जाणे भाग पडले. गडकरी पुण्याहून मुंबईला गेले, त्याच दिवशी मुंबईच्या 'इंदुप्रकाश'चा बातमीदार,

गडकऱ्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी त्यांच्या घरी गेला. (१३६ कसबा पेठ, पुणे) गडकरीमास्तरांच्या जिन्याचे दार बंद होते, म्हणून त्याने तळमजल्यातल्या मारवाड्याच्या दुकानात चौकशी केली. तो म्हणाला, 'ते गेले!' बातमीदारच तो, त्याला वाटले 'गेले' म्हणजे वारले! गडकऱ्यांच्या मृत्यूची बातमी त्याने ताबडतोब मुंबईला पाठवून दिली. लगेच 'इंदुप्रकाश'च्या १५ सप्टेंबरच्या अंकात ती छापून आली. 'शोचनीय मृत्यू.' 'मनोरंजन' वगैरे मासिकांतून आपल्या दिव्य प्रतिभापूर्ण काव्यातून ललकाऱ्या मारणारे महाराष्ट्रातील नामांकित कविचंडोल आणि प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव वगैरे उत्कृष्ट नाटकांनी महाराष्ट्र उन्नत करणारे, नाट्यकवि गोविंदाग्रज ऊर्फ राम गणेश गडकरी, यांना पुणे येथे इन्फ्लूएंझा तापाने देवाज्ञा झाल्याची शोककारक बातमी आली आहे. त्यांनी महाराष्ट्र-सारस्वतात पटकावलेली जागा भरून येणे फार दुरापास्त दिसते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो यापलीकडे मर्त्य मानवांनी काय म्हणावे?

ही बातमी खोटी आहे हे लक्षात येताच 'इंदुप्रकाश'ने 'मृत्यू चूक' या मथळ्याखाली, या बातमीची दुरुस्ती केली, तेव्हा अनेकांनी गडकऱ्यांना पत्रे पाठवून आपला आनंद व्यक्त केला.

'अशुभ वार्तेने आयुष्य वाढते हा लौकिक समज आपल्या बाबतीत खरा ठरो' अशी इच्छा-तात्यासाहेब कोल्हटकरांनी व्यक्त केली तर 'आपला मृत्युलेख आपणच वाचण्याचा मान पितामह दादाभाई नौरोजींनंतर आपणास मिळाला' याबद्दल महाडचे सुप्रसिद्ध साहित्यिक गोविंद गोपाळ टिपणीस यांनी गडकऱ्यांचे अभिनंदन केले.

हा झाला गडकऱ्यांच्या मरणाचा विनोद; पण पुढे तीन-चार महिन्यात मास्तर खरोखरच गेले! (२३ जानेवारी १९१९)

❋ शूरा मी वंदिले!

डॉ. वसंतराव देशपांडे नेहमी म्हणत की, 'आमचे गुरुजी (मा. दीनानाथ) म्हणजे एक (FLASH) नुसता बिजलीचा चमचमाट होता. असे काही गातील की मी मी म्हणणाऱ्या बुजुर्गांनी तोंडात बोटं घालावी.' तसं म्हटलं तर वसंतरावांच्या बाबतीत तेच होतं. एरव्ही वसंतरावांना नाक मुरडणाऱ्यांची त्यांच्या मैफलीत मान डोलत असे. म्हणूनच त्यांना खऱ्या अर्थाने मा. दीनानाथांचे वारसदार म्हणत. त्यांनी नुसते, 'शूरा मी वंदिले', 'सुकतात की जगिया', 'शतजन्म शोधिताना' सुरू केले की लोक लगेच दाद देऊन म्हणत 'हे दीनानाथ!' मात्र ती नक्कल नव्हती. 'डिट्टो दीनानाथही' नव्हते. ते होते अस्सल दीनानाथ – दर्शन!

माणसाचा एक विशिष्ट पिंड असतो. मा. दीनानाथांना वेड होते

पराक्रमाचे. त्यांचे नाते होते भव्यतेशी – दिव्यतेशी म्हणूनच त्यांची लतिका, शिवांगी, वीरांगना, तेजस्विनी, सुलोचना नि शेवटी त्यांचा धैर्यधर खूप गाजला! त्यांच्या धैर्यधरात त्यांचे दिसणे नि गाणे, प्रेक्षकांना क्षणार्धात दिपवून टाकी. उगीच का, त्यांचे बालपणातले गाणे ऐकून बालगंधर्व म्हणाले होते की, या मुलाला, मंगेशीपासून मुंबईपर्यंत रुपये पसरून, (रुपयांच्या पायघड्या घालून) मी माझ्या कंपनीत आणला असता!' वासुदेवशास्त्री खरे तर, आपल्या 'उग्रमंगल' ह्या नाटकातली त्यांची वीरांगनेची भूमिका पाहून चिंतामणराव कोल्हटकर म्हणाले, ' चिंतामणराव या नाटकानंतर आपल्या दिनाची दृष्ट काढीत जा!'

स्वा. सावरकरांच्या 'संन्यस्तखड्ग' नाटकाची एक हृद्य आठवण चिंतामणरावांनी नोंदून ठेवली आहे.

'या नाटकातील परमोच्च बिंदू म्हणजे तिसऱ्या अंकातला समरप्रसंग... शाक्यांची शरणागती की, वल्लभसिंहाचा प्राणनाश असा अटीतटीचा प्रश्न पडला असता, पुरुष वेषातील वल्लभपत्नी सुलोचना (मा. दीनानाथ) जेव्हा 'शरण नाही रण – मारीत मारीत मरण!' म्हणून स्वमताचा त्वेषाने पुरस्कार करते, तेव्हा प्रेक्षकातून एक खडखडीत आवाज उठला 'हे – हे सांगणारा कोणी तरी पाहिजे' संबंध प्रेक्षागृहात टाळ्यांचा एकच कडकडाट उठला!' तो आवाज होता डॉ. ना. भा. खरे यांचा! त्या काळच्या कट्टर अहिंसावाद्याचे ते सहजोद्गार होते. सावरकरांचे शब्द नि दीनानाथांचा अभिनय याला मिळालेली ती उत्स्फूर्त दाद होती.

असे हे मा. दीनानाथ मंगेशकर! पण आज सभासंमेलनात बोलताना किंवा लिहिताना त्यांची ओळख करून दिली जाते, ती ते लता मंगेशकर यांचे वडील म्हणून. हा कालमहिमा आहे. लताताई स्वरसम्राज्ञी आहेतच. ती सर्वच भावंडे संगीतक्षेत्रात मोठी आहेत. तरीही रंगभूमीवर आपल्या तेजाने बिजली-सारखे चमकून गेलेल्या, रंगभूमीच्या वाटचालीत आपल्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा उमटविलेल्या दीनानाथांची ओळख – 'ही मा. दीनानाथांची मुले' अशीच करून द्यायला हवी. मुलांनाही त्यातच धन्यता वाटते. 'आम्ही दीनानाथांची आमच्या बाबांची मुले! म्हणून आपल्या वडिलांच्या चरित्राला अर्पण-पत्रिका लिहिताना लताबाईंनी भावपूर्ण शब्दात लिहिले आहे 'बाबा, तुम्हाला आम्ही काय देणार? कुबेराला का कुणी काही द्यायचे असते? ही तुमचीच शब्दगाथा तुमच्या चरणी वाहात आहे.'

❋ बोडसांचा कोट बालगंधर्वांना!

गडकऱ्यांची प्रेमसंन्यास नि पुण्यप्रभाव ही दोनच नाटके त्यांच्या हयातीत

रंगभूमीवर आली. पहिले प्रेमसंन्यास महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रंगभूमीवर, तर दुसरे पुण्यप्रभाव किर्लोस्कर संगीत मंडळीच्या रंगभूमीवर. बाकीची तिन्ही नाटके–भाववंधन, एकच प्याला नि राजसंन्यास ही त्यांच्या मृत्यूनंतर रंगभूमीवर आली. (वेड्यांचा बाजार हे त्यांचे प्रहसन) ही पित्याविना पोरकी पोरे फार फार गुणी नि पराक्रमी. आपल्या जन्मदात्याचे नाव अजरामर करणारी, चिरंजीव करणारी. याचा अर्थ असा नव्हे, की पहिली दोन कमी गुणी होती. तीही तशीच गुणी; पण त्यांचे बोट धरायला, ती चार-पाच वर्षांची होईतो का होईना, त्यांचा पिता हयात होता. त्यांच्या पाठीवर त्याच्या प्रेमाचा हात फिरला होता.

गडकऱ्यांच्या साऱ्याच नाटकांनी मराठी माणसाला अपूर्व आनंद दिला. एकेक नाटक असे विक्रमी, की एकेका नाट्यसंस्थेचा जणू प्राण. हुकमी एक्का ! हा खेळ लागला की, पैशांचा पाऊस पडावा. कंपनी साऱ्या अडचणीतून मोकळी व्हावी. कंपनीच्या पन्नासपाउणशे माणसांच्या कुटुंबावर आनंद फुलावा. भाववंधन हे ' बलवंत ' चे बलस्थान तर एकच प्याला ' गंधर्वा ' ची कीर्ति ! पुण्यप्रभाव, ' ललितकले ' चा अडखळणारा रथ सावरणारी पुण्याई !

असे सांगतात, की गडकरी एकदा बालगंधर्वांना म्हणाले होते, ' नारायणराव, आजपर्यंत तुम्ही भरजरी शाल-शेल्यात रंगभूमीवर मिरवलात. किर्लोस्कर-देवल-खाडिलकरांची शब्दकळा सावरलीत; पण मी माझ्या नाटकात तुम्हाला फाटक्या पातळात रंगभूमीवर आणणार आहे ! ' त्याचीच परिणती, म्हणजे काळजाची कालवाकालव करणारे, समर्थ शब्दलेणे–एकच प्याला ! एकच प्याला रंगभूमीवर आले नि खरोखरच सिंधूच्या रूपाने गंधर्वांचे एक अगदी वेगळेच दर्शन घडले !

हे नाटक मास्तरांनी गणपतराव बोडसांसाठी लिहिले होते. त्यातला गद्यप्रमुख सुधाकर हा खास गणपतरावांसाठीच लिहिला होता; पण झाले मात्र उलटे ! नाटक रंगभूमीवर आले नि तेजस्वी, साध्वी सिंधूचे (बालगंधर्वांचे) झाले, सुधाकराचे राहिले नाही. बोडसांवाचून अडले नाही. म्हणून एकदा अभिनयश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर म्हणाले, " गणपतराव, मास्तरांनी माप घेतले तुमचे; पण कोट बसला नारायणरावांना !

⁂ मोबदला घेणार नाही !

बालगंधर्वांना घडविण्यात, त्यांच्या यशात काकासाहेब खाडिलकरांचा सिंहाचा वाटा होता. बालगंधर्व म्हणजे, भामिनी, देवयानी, रुक्मिणी, द्रौपदी, मेनका, सावित्री या सगळ्या काकासाहेबांच्या नायिका. या भूमिकांनी गंधर्वांचे कलाजीवन संपन्न झाले, वैभव चढले; पण द्रौपदी नाटक रंगभूमीवर आले नि बालगंधर्वांना कर्ज झाल्याचा गवगवा सुरू झाला. कर्ज झाले ही गोष्ट खरी; पण

ते द्रौपदी पडले म्हणून नाही; तर नारायणरावांनी त्या नाटकाच्या उभारणीसाठी साक्षात मयसभा उभारून हजारो रुपयांची उधळण केली म्हणून ! शिवाय कलासक्त नारायणरावांनी आयुष्यात कर्जाचा कधी विचार केला होता ? जे हवे ते हवेच. त्यात काहीही कमी होता कामा नये. कलेचा आविष्कार, कर्जाच्या कुंपणात त्यांनी कधीच बंदिस्त केला नाही, हाच त्या थोर कलावंताचा स्थायीभाव होता. म्हणूनच बालगंधर्व ते बालगंधर्व !

हे सगळे माहीत असले, तरी आपल्या 'द्रौपदी' मुळेच नारायणरावांना कर्ज झाले हा लोकापवाद काकासाहेबांना सहन होईना. त्यांनी स्वच्छ सांगून टाकले की, नारायणरावांचे कर्ज फिटेपर्यंत नाटकाचा मोबदला घेणार नाही !' नि खरोखरच नाटकाचे कर्ज फिटेपर्यंत त्यांनी मानधन घेतले नाही !

⁂ तालमीला उभा रहा !

काकासाहेब खाडिलकर हे 'महाराष्ट्र नाटक मंडळी' चे दैवत. त्याच कुटुंबात केशवराव दाते लहानाचे मोठे झाले, 'कीचक वधा' वरची बंदी उठली नि ते दात्यांच्या अमदानीतच पुन्हा रंगभूमीवर आले. या नाटकाच्या खास तालमी घेण्यासाठी काकासाहेब कंपनीच्या मुक्कामी नाशिकला आले. केशवराव तालमीला हजर होते; पण त्या नाटकात भूमिका करीत नव्हते. तालमीच्या वेळी काकासाहेब काही बोलले नाहीत; पण तालीम आटोपल्यावर दात्यांना बाजूला घेऊन म्हणाले, 'हे रे काय, या नाटकात तू काम करणार नाहीस ?' त्यावर दाते भीत भीत म्हणाले, 'माझा आवाज चालत नाही. घशाला फार ताण पडतो.' लगेच काकासाहेब करारी आवाजात म्हणाले, 'ताण पडलाच पाहिजे. उद्यापासून भीमाच्या कामाला उभा रहा !' दुसऱ्या दिवसापासून दाते तालमीला उभे राहू लागले. केशवरावांचा भीम पुढे खूप गाजला. याला म्हणतात नाटककाराची–गुरूची जरब नि नटाची विनयशीलता–आज्ञाधारकता !

⁂ नाटकवाल्यांचे पालक

काकासाहेब खाडिलकर हे 'महाराष्ट्र' नि 'गंधर्व' मंडळीचे दैवतच होते. अण्णासाहेब कारखानीस नि बालगंधर्व यांनी, त्यांच्याविषयीचा आदर वेळोवेळी व्यक्त केलाच आहे; पण फार काळ काकासाहेबांचा सहवास न लाभलेल्या चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या 'बहुरूपी'त काकासाहेबांचे मोठेपण, मोठ्या हळव्या शब्दात टिपले आहे. चिंतामणरावांनी नाट्यसृष्टीत पहिले पाऊल टाकले तेच मुळी काकासाहेबांचे बोट धरून !

'Not failure, but low aim is exicute.' हे ब्रीदवाक्य शिरोधार्य मानणाऱ्या 'महाराष्ट्र नाटक मंडळी'च्या रंगभूमीवर गडकऱ्यांचे 'प्रेमसंन्यास'

हे पहिले नाटक आले; पण त्या वेळी 'महाराष्ट्रा'ला फाटाफुटीचे वेध लागले होते. मालकांचे मतभेद चव्हाट्यावर आले होते, पण काकासाहेबांच्या धाकामुळे, कारखानीस-टिपणीस–देशपांडे ही मालकमंडळी दबून होती. तरी पण या कंपनीच्या गढूळ वातावरणाचा गडकऱ्यांच्या नाटकावर नेमका वाईट परिणाम झाला. प्रधान (कमलाकर), अप्पा टिपणीस (विद्याधर) यांच्या नकलाही धड पाठ नव्हत्या. प्रयोग फार ठिसूळ झाला. दुसऱ्याच दिवशी प्रयोगाच्या यशापयशांची चर्चा करताना, काकासाहेबांना न राहवून अप्पा टिपणिसांना त्यांनी खडसावले, 'तुमच्या अशा कृत्यामुळे एक नवा नाटककार जगातून उठणार आहे याची तुम्हाला जाण आहे का?' नुसते इतके बोलूनच काकासाहेब थांबले नाहीत तर त्यांनी ताबडतोब तालमीची घंटा देववून काही प्रवेशांची स्वतः तालीम घेतली. हा सर्व प्रकार घडताना गडकरी तिथेच होते. खाडिलकरांसारख्या सिद्धहस्त नाटककाराने, आपल्यासारख्या नव्या नाटककाराविषयी दाखविलेल्या आपुलकीच्या जिव्हाळ्याने ते भारावून गेले. त्या क्षणापासून ते खाडिलकरांना 'काका' या घरगुती वडिलकीच्या नात्याने संबोधू लागले. 'प्रेमसंन्यास'चे पुढचे प्रयोग रंगू लागले. खाडिलकरांच्या पुण्याईने गडकऱ्यांचा लौकिक वाढीस लागला नि या वाढत्या लौकिकाचा वेलू गगनावरी गेल्याचेही त्यांनी (काकासाहेबांनी) डोळे भरून पाहिले!

※ नाटक मालकांच्या हातात हवे

१९२० साली गडकऱ्यांच्या नावामागे दुःखद 'कै' लागून त्यांचे 'भावबंधन' बलवंत संगीत मंडळीच्या रंगभूमीवर आले. प्रेमसंन्यास नि पुण्यप्रभाव यांच्या नवलाईने, त्यांच्या नव्या नाटकाविषयी कुतूहल होतेच. शिवाय नाटककर्ता अकाली निवर्तल्याने प्रेक्षकांना हळहळही वाटत होती. प्रयोग पुण्यात होता. साहजिकच प्रतिष्ठित विद्वानमंडळींची गर्दी होती. त्यात काकासाहेब खाडिलकरही होते. प्रयोग सर्वांगसुंदर झाला! बलवंत संगीत मंडळीच्या मालकांनी मास्तरांच्या नाटकात काहीही न्यून ठेवले नव्हते. चिंतामणराव कोल्हटकर (घनःश्याम), मा. दीनानाथ (लतिका), दिनकर ढेरे (कामण्णा) या प्रमुख पात्रांच्या कामांचे खूप कौतुक झाले. तरी एक गोष्ट सिद्ध होती की, ते नाटक दिनकरचे होते. कारण त्याने आपल्या त्या भूमिकेने नावाचे 'कामण्णा' हे नाणेच पाडले होते. आजही त्यांच्या नावाचा उल्लेख दिनकर ढेरे असा न होता, 'दिनकर कामण्णा' असाच होतो. इतके अफाट यश त्याने त्या भूमिकेत संपादले होते.

काकासाहेब खेळ आटोपल्यावर आत गेले. त्यांनीही नाटकाचे तोंड भरून कौतुक केले; पण एक व्यवहारी सूचना करायलाही ते विसरले नाहीत. ते

म्हणाले, 'नाटकातल्या प्रमुख भूमिका नेहमी मालकांच्याच हातात हव्यात. (चिंतामणराव–दीनानाथ–कोल्हापुरे हे तिघे मालक नि दिनकर नोकर होता) दिनकरसारख्या मुलाने उद्या एखादी भलतीच गोष्ट मनात आणली, तुम्हाला सोडून जायचे ठरविले, तर तुम्ही काय करणार? यापुढे ही अवश्य काळजी घ्या!' यावर चिंतामणराव मोठ्या कृतज्ञतेने लिहितात, 'इतक्या दूरदर्शीपणाचे, धंदेवाईकपणाचे धडे पितृतुल्य जिव्हाळ्याने योग्य वेळ येताच ते देत...हा नाट्याचार्य व्यवहारी– म्हणजे आपला स्वतःचा व्यवहार पहाणारा नव्हता–तर त्या सर्व नाटकमंडळीचा अंदाज घेऊन, वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शन करणारा होता. असा नाटककार कधी कुणाला भेटला असेल किंवा पहाण्यातही आला असेल, असे मला वाटत नाही!'

❋ हे माझे भाग्य!

गणपतराव जोशी, भागवत, खाडिलकर, गडकरी अशी थोर नट, नाटककार मंडळी त्या त्या काळात अनेक नटांची श्रद्धास्थाने होती. त्यांच्या पायी माथा ठेवण्यात त्यांना नेहमीच धन्यता वाटे, अशीच एक आठवण केशवराव दाते यांनी अभिनयश्रेष्ठ गणपतराव भागवतांविषयी सांगितली आहे. केशवराव 'महाराष्ट्र नाटक मंडळी'त रहाण्यासाठी पुण्याला आले, तेव्हा त्यांना उतरून घेण्यासाठी खुद्द भागवत स्टेशनवर आलेले पाहून ते भारावून गेले. भागवतांची नि केशवरावांची आधीची ओळख नव्हती. दाते येत आहेत, अशी आगाऊ सूचना मिळाल्याने भागवत स्टेशनवर आले होते. दात्यांनी मात्र 'अरे, हे कांचनगडची मोहना'. मधले पिलाजीराव गणपतराव भागवत!' म्हणून लगेच ओळखले नि त्यांच्यापाशी गेले.

गावात शिरताना योगायोगाने शनिवारवाड्याजवळ प्रा. भानूंची गाठ पडली. भागवतांनी त्यांचे नाव सांगून, त्यांना नमस्कार करण्यास खुणावले. भर रस्त्यात केशवरावांनी प्रा. भानूंना वाकून नमस्कार केला. दाते आपल्या स्वभावाला अनुसरून मोठ्या विनयाने लिहितात– 'खरं म्हणजे, माझ्यासारख्या नवख्या तरुणाला उतरवून घेण्यास आस्थेने त्यांनी स्वतः येण्याची अजिबात आवश्कता नव्हती. ते आले याचे कारण 'नट' या संस्थेबद्दल त्यांना आतून वाटणारे खरेखुरे प्रेम!....भागवतांसारख्या थोर कलावंताचे बोट धरून 'महाराष्ट्र'मध्ये मी पाऊल ठेवले हे माझे भाग्य!'

❋ 'आग्ऱ्याहून सुटका'ची सुटका

नागपूर मुक्कामात केशवराव दाते 'समर्थ नाटक मंडळी'त आले. त्या वेळी औंधकरांनी 'आग्ऱ्याहून सुटका'चे दोन अंक लिहून पुरे केले होते. दाते

आल्यावर साहजिकच त्यांना हुरूप आला. त्यांनी नाटक पुरे केले. केशवरावांनी कसून तालमी घेतल्या नि नागपूर मुक्कामातच कंपनीने नाटक बाहेर काढले. प्रयोग सुरेख झाला. नागपूरकरांना आवडला. नाटक पैसे देणारे ठरले. दाते, औंधकर, वैशंपायन, सीताराम पंत जोशी हा आधीचा 'महाराष्ट्र'चाच कसदार नटसंच होता.

अमरावती–अकोल्यालाही प्रयोग झाले; पण या ठिकाणचे लोक नाटकावर नाराज आहेत, अशा तक्रारी दाते–औंधकरांच्या कानांवर येत होत्या. वाशिमच्या मुक्कामात तर चक्क एका मुस्लिम पोलीस इन्स्पेक्टरने थिएटरवर येऊन खेळ बंद केला. मालक मंडळींनी मेकप उतरून प्रेक्षकांचे पैसे परत केले; पण हा झालेला प्रकार त्या गावच्या पुढारी मंडळींना फार लागला. दुसऱ्या दिवशी ही मंडळी कंपनीच्या बिऱ्हाडी आली आणि त्यांनी खेळ झालाच पाहिजे असा हट्ट धरला! 'तुम्ही खेळ करा, बाकी सर्व जबाबदारी आमची' – झाले. तिसऱ्या दिवशी, नाटक उभे राहिले. दाते सांगतात. 'स्टेजवरून समोर पाहिले, तो खुर्चीपासून पिटापर्यंत प्रत्येक प्रेक्षकाच्या हातात काठी होती. तसेच थिएटरच्या बाहेर, चार चार पाच पाच, जवान लोकांचा गट पहारा करीत होता. नाटकाला चिकार गर्दी होती. त्या मुसलमान इन्स्पेक्टरची थिएटरवर फिरकण्याची छाती झाली नाही. ही वाशिमकरांची जिद्द मात्र पुढे कुठे दिसली नाही.

❋ अंगाऱ्याचा प्रभाव

'समर्थ नाटक मंडळी' जळगावला पोचताच खुद्द कलेक्टरसाहेबांचीच 'आग्ऱ्याहून सुटका'च्या प्रयोगावर बंदी आली. दात्यांनी कलेक्टरची भेट घेण्याचे ठरविले. दाते–वैशंपायन जोडी, चोपड्यास कलेक्टरच्या भेटीला गेली. कलेक्टर इंग्रज होता. या खेळाच्या उत्पन्नावर पाउणशे माणसांची उपजिविका अवलंबून असल्याचे दात्यांनी त्याला समजावून सांगितले. ते मान्य करूनही कलेक्टरसाहेब म्हणाले, 'या तुमच्या नाटकात औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा शिवाजीला भेटते, हे मुसलमानांना पसंत नाही. त्यांच्या भावना दुखावतात.' त्यावर केशवरावांनी त्यात धार्मिक भावना दुखविणारे काही नाही म्हणून स्पष्ट केले, परंतु कलेक्टरला ते पटेना. शेवटी त्यावर तोडगा म्हणून बदल करण्याचे दात्यांनी मान्य केले. तसे लिहून दिले. त्यावर कलेक्टरची सही झाली नि प्रयोगाची परवानगी हाती पडली. मग औंधकरांनी झेबुन्निसाचे हिंदुकरण करून 'राजकुंवर' (राजा जयसिंगाची कन्या) औरंगजेबाची मानलेली लाडकी मुलगी दाखविली. दाते नि कलेक्टर यांची चर्चा चालू असताना, इंग्रजी येत नसल्यामुळे वैशंपायन गप्प बसून होते; पण, एकीकडे टेबलाखाली वाकून कलेक्टरसाहेबांच्या दिशेने हातातला अंगारा फुंकीत होते 'असे करू नकोस' म्हणून दात्यांना एकदोन वेळा

डोळ्यांनी दटावलेही. कारण साहेबाच्या लक्षात आले असते, तर हा काही तरी चेटूक करीत आहे म्हणून भानगड झाली असती. बाहेर पडताना, दाते वैशंपायनांना म्हणाले, 'अरे हे तुझं करणं, साहेबाच्या लक्षात आलं असतं तर आपण पकडले गेलो असतो?' त्यावर वैशंपायन शांतपणे म्हणाले, 'तसं होईल कसं? ती कोंडिबामहाराजांची कृपा आहे. त्या अंगाऱ्यामुळे तर आपल्याला परवानगी मिळाली.' यावर आता दाते काय सांगणार? दाते म्हणतात, 'परवानगी मिळण्यातली ग्यानबाची मेख वेगळीच असावी. आम्ही साहेबाला भेटलो ती डिसेंबरची तेवीस तारीख होती. साहेब नाताळसाठी मुंबईला जाण्याच्या गडबडीत होता म्हणून लगेच परवानगी हाती पडली. काही का असेना– येशूची कृपा असो नाही तर, कोंडिबामहाराजांची असो, आमचे काम झाले एवढे खरे.'

❋ शिवाजी–औरंगजेब पळाले !

'आग्ऱ्याहून सुटका' उभ्या महाराष्ट्रात गाजत होते. ज्या ज्या गावी कंपनी जाई, तिथे आधी मुसलमान पुढाऱ्यांची समजूत घालावी लागे. मुसलमानांच्या भावना दुखावण्यासारखे त्यात काही नाही, हे पटवावे लागे. बरे, इतके करूनही प्रयोग सहिसलामत होईलच याची शाश्वती नसे. अशाच वातावरणात कंपनी मुंबईत आली नि रिपन थिएटरमध्ये प्रयोग लावला. खिलाफतच्या लोकांना औंधकरांनी नाटकाला बोलावले होते. मुसलमानांना खुपण्यासारखे काही असल्यास ते बदलण्याची समजूतदार भूमिका कंपनीची होती. कारण नाटक रंगणारे नि भरपूर कमाई करून देणारे होते.

प्रयोग सुरू झाला. पहिले दोन अंक सुरळीत पार पडले. तिसऱ्या अंकातला, राजकुंवर–औरंगजेब (सीतारामपंत जोशी–राजकुंवर, केशवराव दाते–औरंगजेब) प्रवेश सुरू झाला. तोच पुढच्या रांगेतून दोन तीन मुसलमान तरुण, चाकू काढून ओरडत स्टेजवर चढले, विंग्ज पाडल्या, आरसे फोडले, नट वर्ग रंगपटात पळाला. औरंगजेबाने राजकुंवरला सावरत तळघर गाठले. गडबड सुरू झाली. प्रेक्षक पळाले ! प्रयोगाला पोलीस परवाना असूनही हे घडले. Evening News मध्ये बातमी छापून आली, 'शिवाजी–औरंगजेब खेतवाडीतून पळाले.'

❋ आग्ऱ्याहून सुटका नि अच्युतराव !

'आग्ऱ्याहून सुटका'च्या, मुंबईतल्या पहिल्याच प्रयोगाला रिपन थिएटरमध्ये दंगल झाल्याने कंपनीला (समर्थ नाटकमंडळी) कोणताच खेळ लावण्याची ताकद होईना. दाते–औंधकर, वरिष्ठ पोलीस-अधिकाऱ्यांना तसेच काही पुढारी लोकांना सारखे भेटत होते; पण कोणीही प्रयोग करा, असे म्हणेना ! उलट, जाऊ द्या कशाला हो करता तो खेळ? उगीच दंग्याला कारणीभूत कशाला

होता ? हाच उपदेश त्यांना ऐकावा लागे. अखेर पंधरा–वीस दिवसांनी परळच्या ' दामोदरहॉल ' वर ' करीन ती पूर्व ' चा प्रयोग लावला. कारण खेळ न करता कंपनी चालणार कशी ? नशिबाने खेळाला तुफान गर्दी होती. थिएटर ओव्हरफुल होते. साडेनऊला नाटक सुरू होणार तोच प्रेक्षकांनी ओरडा करण्यात सुरुवात केली. सगळ्यांचा एकच गिल्ला ' आग्र्याहून सुटका पाहिजे, करीन ती पूर्व नको ! ' मॅनेजरने बाहेर येऊन सांगितले की, ' त्या खेळाची सर्व पात्रे इथे हजर नाहीत. दात्यांचे या नाटकात काम नसल्याने ते हॉलवर आलेले नाहीत.' इ. तोच लोक ओरडले ' त्यांना आणा ! आग्र्याहून सुटकाच हवे ! ' प्रेक्षक काही केल्या ऐकेनात. अखेर गिरगावातून केशवराव दात्यांना गाडीत घालून आणले. बाकी बहुतेक पात्रे होती. केशवरावांनी रंगाला बसण्यापूर्वी पाहिले, तर या जमावाचे, या मंडळींचे, म्होरक्ये प्रमुख पुढारी होते– साहेब (दे. भ. अच्युतराव कोल्हटकर). मध्यंतरी परवाना पहाण्यासाठी एक मुसलमान पोलीस इन्स्पेक्टर हॉलवर थडकलाच होता; पण अच्युतरावांनी त्याची खरड काढून त्याला हाकलून लावला.

अखेर साडेअकराला सुरू झालेला खेळ (अर्थात ' आग्र्याहून सुटका ' हाच) पहाटे पावणेपाचच्या सुमारास संपला ! प्रयोगाचा प्रत्येक प्रवेश रंगला. प्रेक्षक एकदम खूष आणि नटवर्गही !

या सगळ्या घटनेत, अच्युतरावांच्या पाठीशी होती परळ–लालबागची आखाडेवाली मंडळी. हॉलवर तर त्यांनी बंदोबस्त केला होताच; पण गिरगावपासून दादर ट्रामटर्मिनस (दादर टी. टी) पर्यंत आपले आखाड्यातले पैलवान लोक पहाऱ्यावर ठेवले होते. नाटक आटोपल्यानंतर नटमंडळींसुद्धा लॉरीतून आपल्या घरोघरी पोचते केले. दाते म्हणतात, ' इथे अच्युतरावांचे खरे पाणी दिसले. ते लिहितात, ' पाश्चिम महाराष्ट्रात, संदेशकार दे. भ. अच्युतराव कोल्हटकराशिवाय कोणीही मोठा माणूस, आमच्यामागे खंबीरपणे उभा राहिला नाही ! '

❋ गावरान भुईमुगाची शेंग

' महाराष्ट्र नाटक मंडळी ' हे खऱ्या अर्थाने नाट्यविद्यापीठच होते. या संस्थेत नामवंत नटांची परंपराच निर्माण झाली. गणपतराव भागवत, टिपणीस बंधू, प्रधान, पोतनीस, केशवराव दाते, औंधकर, शाळिग्राम, वैशंपायन अशी किती म्हणून नावे सांगावी ? नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर सुद्धा, व्यावसायिक रंगभूमीवर प्रथम रंगले ते इथेच. त्यातही दाते–औंधकर–शाळिग्राम, वैशंपायन हे समकालीन नि बरोबरीचे. केशवरावांनी आपल्या नटमित्रांचे गुणविशेष मोठ्या आदराने नोंदविले आहेत. त्यांच्या विशेष मर्जीतले, त्यातलेच एक परशरामपंत

शाळिग्राम.

नटात कामाची चुरस असणे वेगळे नि वैर असणे वेगळे. शाळिग्राम हे सरळ साधे नट होते. मनाने रसिक नि भूमिकेशी लवकर समरस होणारे. 'महाराष्ट्र मंडळी'त जसजशी त्यांना कामे मिळत गेली, तसतसे त्यांच्या कलागुणांचे दर्शन घडत गेले. 'महाराष्ट्र मंडळी'ची प्रभावळ गुणवंताची असूनही ते आपल्या गुणांनी चमकले. जसे मनाने सरळ नि भोळे तसे बोलण्यातही गावरान. 'गावाबरोबर गाढव खावे लागते, चावडीवर बोंब मारायला पाटलाची परवानगी लागत नाही' असले वाक्प्रयोग ते सहजी करीत, असा हा मोकळा माणूस सर्वांचा आवडता होता. म्हणूनच दाते त्यांचा उल्लेख 'गावरान भुईमुगाची शेंग' असा करतात. दाते लिहितात, 'मला वाटते नाटकात सर्व तऱ्हेच्या भूमिका करू इच्छिणाऱ्या नटाच्या मनाची पाटी कोरी असावी लागते. त्या पाटीवर त्याच्या प्रकृतिधर्माचे ओरखडे नसावे आणि असे असेल तरच तो निरनिराळ्या भूमिकांत निरनिराळा दिसतो. ही गोष्ट शाळिग्राम यांच्यात होती. म्हणूनच त्यांनी भिन्न प्रकृतीच्या नि वेगवेगळ्या ढंगांच्या भूमिका सारख्याच यशस्वी केल्या. कंकण–पुण्यप्रभाव, कमालखान–शिवसंभव, संभाजी–बेबंदशाही, अशा अनेक; पण त्यातही ते जणू संभाजीच्या भूमिकेसाठीच जन्माला आले होते. असा संभाजी आजपर्यंत मराठी रंगभूमीवर दिसला नाही. कंपनीच्या चालकांच्या विशिष्ट धोरणाशी त्यांचे पटले नाही म्हणून त्यांनी अखेर कंपनी सोडली. त्यांनी 'महाराष्ट्र' सोडून जाताना केशवरावांचा जीव खालीवर होत होता. आपला आवडता सहकारी संस्था सोडून जाणार म्हणून त्यांना चैन पडत नव्हते; पण ते काय करणार? तरीही 'महाराष्ट्र मंडळी'च्या प्रथेच्या विरुद्ध जाऊन शाळिग्रामाचा निरोपसमारंभ घडवून आणला. 'बेबंदशाही'चा प्रयोग करून डॉ. भडकमकर यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला. पाचशे रुपयांची थैली दिली. मित्राने मित्राचा, नटाने नटाचा केलेला सत्कार-फुलाने फुलाचा घेतलेला सुगंध!

इतकेच नव्हे तर कीचकवधावरची बंदी उठल्यानंतर ते नाटक बसविताना दात्यांना त्यांची सारखी आठवण येत होती. ते म्हणतात, 'कीचकवध' पुन्हा सुरू होऊन त्याच्या झालेल्या प्रयोगात, मी कीचकाच्या कामी शाळिग्रामचीच योजना केली असती. माझी खात्री आहे. ही भूमिका त्यांनी अधिक गाजविली असती. त्यांच्या पगडीत आणखी एक मानाचा तुरा झळकला असता!

❋ 'खास लोकाश्रयाखालील'

एक काळ असा होता की, या मराठी मुलखात पंधरा–वीस नाटकमंडळ्यांचा संसार सुखाने चालला होता. त्यात गंधर्व, ललितकला, बलवंत, यशवंत अशा बड्या कंपन्या होत्या, तशाच 'आनंदविलास', 'भारतभुषण'

'देशबंधू' 'प्रभात संगीत' यासारख्या छोट्या कंपन्याही अनेक होत्या; शिवाय 'शाहू नगरवासी' नि 'महाराष्ट्र' या प्रोज कंपन्याही होत्या. या काळात बहुतेक सर्व नाटकमंडळ्यांना संस्थानिकांकडून काही ना काही मदत मिळतच असे. संस्थानात मुक्काम असला की, सरकारी शिधा, कपडालत्ता कार्यकारणाने आर्थिक मदतही होत असे.

बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड, यांनी वर्षासन देऊन एखाद्या नामवंत कंपनीचे खेळ दरवर्षी बडोद्यात करण्याची एक योजना आखली. या योजनेनुसार गंधर्व, ललितकला आदी कंपन्यांकडे विचारणा झाली. गंधर्व मंडळीने पाच हजार रुपयांची मागणी केली. केशवरावांनी दहा हजार रुपये मानधनाची मागणी केली. महाराजांकडून मागणीचा तपशील मागविण्यात आला. तेव्हा केशवरावांनी कळविले की, कंपनीला आपला दर्जा आणि श्रीमंतांचा लौकिक संभाळण्यासाठी कमीत कमी इतके मानधन हवेच! अर्थातच केशवरावांची मागणी मान्य झाली नाही नि गंधर्व मंडळीला राजाश्रय लाभला. 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या आश्रयाखालील' असा तिचा उल्लेख होऊ लागला.

बादशाही थाटाच्या गंधर्व नाटक मंडळीने अवघ्या पाचच हजारांची मागणी केली. यामागे सुद्धा एक विशिष्ट हेतु होता असे म्हणतात. कारण 'किर्लोस्कर' सारख्या श्रेष्ठ नि मान्यवर संस्थेतून बाहेर पडल्यावर आपण कितीही गुणी असलो तरी आपल्यावर लोकांची टीका होणारच याची गंधर्व-टेंबे-बोडस यांना कल्पना असावी. म्हणूनच 'मातृसंस्थेशी बेइमान झालेले' असे लोकांनी बोट दाखवून सांगताना, त्यांचा हात खाली जावा नि तोंड बंद व्हावे, म्हणूनच सयाजीरावांसारख्या लोकप्रिय राजाने जवळ केलेल्या संस्थेवर कोण टीका करणार?

यानंतर ग्वाल्हेरच्या शिंदेसरकारांनी 'ललितकलादर्श'ला आश्रय देण्याची इच्छा व्यक्त केली. त्या वेळी आमची कंपनी 'लोकाश्रयाखालील' आहे असे मॅनेजर शितूत म्हणाले, पुढे ही योजना केशवरावांना कळवून काही खेळ करण्यासाठी ग्वाल्हेरदरबारचे रीतसर निमंत्रणही आले. केशवरावांनी आपली कंपनी 'खास लोकाश्रयाखालील' आहे असे नम्रपणे दरबारला कळविले. मात्र तितक्याच आदराने महाराजांच्या वाढदिवसानिमित्त खेळ करण्याचे मानाचे आमंत्रण त्यांनी स्वीकारले. या वेळेपासून 'लोकाश्रयाखालील ललितकलादर्श मंडळी' अशी आवर्जून जाहिरात करण्याचा पायंडा पडला!

असे सांगतात की, केशवराव अशा राजाश्रयाच्या विरुद्धच होते. कारण केशवराव स्वतः कोल्हापूरचे. श्रीमंत शाहूमहाराज रसिक नि आश्रयदाते म्हणून त्यांचा लौकिक पण केशवरावांचे व्हावे तसे कौतुक महाराजांकडून सुरुवातीला झाले नाही, याची केशवरावांच्या मनी अढी होती.... म्हणूनच त्यांच्या मनाने पक्के घेतले होते की, पैसे देऊन खेळ बघायला येणारे प्रेक्षक हेच आपले खरे चहाते

ग्रंथालय

आश्रयदाते ! (बालगंधर्वांच्या भाषेत–मायबाप !) म्हणूनच ' खास लोकाश्रया-खालील ' हे बिरुद त्यांनी भुषविले.

बरोबर रात्री ९ वाजता !

नाट्यव्यवसाय सर्वतोपरी उत्तम चालावा, नाटक यशस्वी नि लोकप्रिय होण्याच्या दृष्टीने नित्य नूतन गोष्टी कराव्या अशी केशवराव भोसल्यांची दृष्टी होती. नाटकाचा प्रयोगसुद्धा जाहीर केलेल्या वेळेवरच सुरू झाला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. तो काळ वेळेचे भान न राखता सर्वच व्यवहार थंडाईने चालण्याचा होता. त्यामुळे नाटक दिलेल्या वेळी सुरू होणे हे सुद्धा नवल समजले जाई. कधी कधी ते अडचणीचे सुद्धा होई. ' ललितकलादर्श 'चा मुक्काम सांगली संस्थानात होता. दिवाणांकरवी आज महाराज नाटकाला येणार, असा गिरोप आला. नाटकाची वेळ होत आली तरी श्रीमंताची स्वारी येण्याची चिन्हे दिसेनात. आता काय करायचे, हा केशवरावांपुढे प्रश्न होता. नाटक सुरू केले नाही तर आपला नियम मोडणार, केले तर महाराजांचा अपमान होणार ! केशवराव स्टेजवर येरझारा घालीत होते. पडदेपटाच्या माणसाला वाटले, की महाराज येईपर्यंत काही नाटक सुरू होत नाही. तो थोडा ढिला राहिला तोच केशवराव कडाडले, ' बेल दे !' पडदा वर गेला. नांदीचे सूर निनादले. खुद्द केशवरावच नांदी म्हणत होते. केशवरावच असल्याने प्रश्नच नव्हता. नांदी लावली हे प्रेक्षकांच्या लक्षातच आले नाही. तोच सरकारस्वारी आपल्या लवाजम्यानिशी थिएटरात आली. नांदी आवरती घेतली नि खेळ सुरू झाला. पडदा वेळेवर उघडला म्हणून प्रेक्षक खूष नि खेळ आपण आल्यावर सुरू झाला म्हणून महाराज संतुष्ट !

नाटक वेळेवर सुरू करण्याचे व्रत स्वतः केशवरावांनी तर पाळलेच; पण त्यांच्यानंतर बापूसाहेब पेंढारकरांनीही आपल्या कारकीर्दीत कसोशीने पाळले ! आजही त्यांचे चिरंजीव भालचंद्र पेंढारकर ते व्रतपालन अगदी निष्ठेने करीत आहेत. पेंढारकरांचे नाटक ना, ते नऊ म्हणजे नऊच्या ठोक्यालाच सुरू होणार !' हे गृहीत धरून प्रेक्षक त्यांच्या नाटकाला जातात.

सहज आठवलं की, ' नटसम्राट ' ची सुरुवात ज्या स्वगताने होते, त्याची सुरुवातीची वाक्ये, केशवराव – बापूराव यांच्या वक्तशीरपणाचे कौतुक करण्यासाठी कविवर्य शिरवाडकरांनी लिहिली असावीत.

... खरं म्हणजे वक्तशीरपणा आमच्या अंगात अगदी नाटकाइतकाच भिनलेला आहे. आपल्याला ठाऊक असेल, आमच्या कंपनीची शिस्त अशी की, तिसरी घंटा नऊ वाजता म्हणजे बरोबर नऊ वाजता ! एकवीस वर्षं कंपनीच्या नाटकाचा पडदा वर गेला, तो बरोबर आठ वाजून साठ मिनिटांनीच !

एकसाष्टावं मिनिट पडद्याने वर जाताना कधी घड्याळात बघितलंच नाही !...'

❋ हे यश माझ्या गुरूंचे !

केशवराव भोसले म्हणजे 'स्वयमेवमृगेंद्रता !' सारं यश संपादलं ते स्वपराक्रमाने आणि या पराक्रमाला अवधी किती ? अवघे तीस-एकतीस वर्षांचे आयुष्य. इथे आठव येतो राम गणेशांचा. त्यांचे एक साजरे सुभाषितही डोळ्यांसमोर दिसू लागते. 'उमर फत्तराला असते. फुलाला नसते' (सावाजी-राजसंन्यास) केशवरावांना 'शारदे'ची संधी मिळाली नि त्यांच्या यशाचा मार्ग मोकळा झाला; पण तोही निष्कंटक नव्हता. कारण लवकरच पितृतुल्य जनुभाऊ निमकरांचा आसरा तोडावा लागला. वयाच्या अठराव्या वर्षी मोठ्या हिमतीने संस्था (ललितकलादर्श) स्थापन केली; पण मित्रांची हवी तशी साथ मिळाली नाही. एक एक करीत सर्वजण सोडून गेले. कंपनीची आर्थिक दुरवस्था पाहून प्रत्यक्ष वडीलबंधूंनीही संगत सोडली; पण केशवराव पहिल्यापासूनच जिद्दी ! माघार हा शब्दच त्यांच्या कोशात नव्हता. त्यांची प्रत्येक गोष्ट आखीव-रेखीव असे. हाताशी होता त्या नटवर्गात ते उभे राहिले. सुरुवातीस त्यांच्या शारदेने हात दिला. मग 'मंथरा' गाजली. मग वीर वामनराव जोशी (वामन गोपाळ जोशी) यांचे 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे नाटक त्यांच्या हाती पडले नि खरोखरच त्यांची ललाटरेषा उजळली ? त्यांच्या 'मृणालिनी'च्या भूमिकेचे अपार कौतुक झाले. पैशाचा पाऊस पडला. लागोपाठ या नाटकाचे खेळ सुरू होते. 'राक्षसी'चे शंभर प्रयोग करून मुंबईचा मुक्काम हलवा, असा त्यांच्या मित्रांनी नि रसिकांनी हट्ट धरला होता;पण पूर्वनियोजित दौऱ्याप्रमाणे मुक्काम हलविणे भाग होते. मुक्काम सपताना मुंबईकरांनी त्यांचा भव्य सत्कार केला. व्यासपीठावर केशवरावांबरोबर त्यांचे पहिले गानगुरु श्री. जांभेकरबुवाही होते.

केशवरावांनी अगदी थोडक्यात सत्काराला हृद्य उत्तर दिले. बोलताना ते म्हणाले, रसिक-मित्रहो, माझ्या यशाचे सारे श्रेय माझे गायनगुरुजी, पूज्य जांभेकरबुवा यांनाच आहे' असे नम्र शब्दात सांगून त्यांनी सत्कारप्रसंगी मिळालेल्या हजारो रुपयांच्या देणग्या नि अनेक भेटवस्तू आपल्या गुरुजींच्या चरणी अर्पण केल्या !

पुढे त्यांनी डॉ. गुलाब (हाच मुलाचा बाप) डेव्हिड (संन्याशाचा संसार) शिवाजी (शहा शिवाजी) धैर्यधर (मानापमान) अशा अनेक भूमिका अति सुरेख सजविल्या.

❋ मी उगाच भांडलो !

महाराष्ट्र नाटक मंडळीत 'नटांचे नाटककार' म्हणून कारखानीस,

टिपणीस, औंधकर, बोडस (ग. कृ.) अशी एक परंपराच होऊन गेली. त्यात आज विष्णुपंत औंधकर (विष्णु हरी) हे त्यांच्या 'बेबंदशाही', 'आग्ऱ्याहून सुटका' या नाटकांमुळे रसिकांना परिचित आहेत. शिवाय त्यांचे चित्रपटसृष्टीतले कर्तृत्वही फार मोठे आहे. सावकारी पाश, रामराज्य, भरतभेट या अमर चित्रकथा औंधकरांच्या आहेत. नट म्हणून (स्त्रीपार्टी म्हणूनसुद्धा) तर ते प्रसिद्ध होतेच; पण नाटक नि चित्रपटलेखक म्हणून त्यांचा अधिक लौकिक झाला. केशवराव दाते या सगळ्यांबरोबर होतेच; पण समवयस्क म्हणून दाते–औंधकर–वैशंपायन अधिक जवळचे.

'महाराष्ट्र' मधून बाहेर पडल्यावर औंधकर–वैशंपायन आदींनी 'समर्थ नाटक मंडळी' काढली. थोड्या दिवसांनी दातेही आले. तेव्हाच 'आग्ऱ्याहून सुटका' रंगभूमीवर आले; पण काही काळानंतर नागपूर मुक्कामात कंपनी सोडून पुण्याला येण्याचे दात्यांनी ठरविले. म्हणून एक दिवस औंधराकडे पैशाची मागणी केली. त्यावर औंधकर 'नाही' म्हणाले. पुष्कळ चर्चा झाल्यावर केशवराव म्हणाले,

'अहो, पुण्यापर्यंतच्या तिकिटापुरते तरी पैसे द्या!' त्यावरही औंधकरांनी चक्क नकार दिला. मग दोघांच्यात खूप हमरी–तुमरी झाली. (संबंध अतिशय चांगले असूनही) दाते आपली ट्रंक–वळकटी घेऊन कंपनीच्या बिऱ्हाडातून बाहेर पडले, ते थेट आपले स्नेही शंकरराव फाटक यांच्या घरी गेले. त्यांना सर्व हकिगत सांगितली; पण केशवरावांना चैन पडत नव्हते. त्यांना सारखे वाटत होते, रात्री औंधकर आपल्याकडे येतील नि म्हणतील, 'दाते किती रागावलात? पैसे नाहीत हे तुम्हाला माहीत आहे ना?' बस, दात्यांना इतकेच हवे होते. ते सारखी आपल्या मित्राची–औंधकरांची–वाट पहात होते, पण ते घडले नाही. त्यांनी रागाच्या भरात दुसऱ्या दिवशी वकिलाकडून औंधकरावर फिर्याद सुद्धा ठोकली! पुढे जामीन दिला गेला. तो दाते औंधकर दोघांचाही दोस्त! अखेर ते प्रकरण मिटले.

त्याची आठवण होऊन, दाते गहिवराने लिहितात, 'एका नाटक कंपनीतल्या स्नेह्यावर फिर्याद केली हे अजूनही मनाला बोचते, खंत वाटते. ते हातून व्हायला नको होते. पुढे वर्षभर औंधकरांशी बोलणे नव्हते. मी पुण्यास वरेच दिवस रिकामाच राहिलो. 'समर्थ' पुण्यात आली. अगोदर निरोप पाठवून भेटीची परवानगी घेऊन, औंधकर आपले नवे नाटक 'महारथी कर्ण' वाचायला घेऊन आले. भांडणानंतर आमची ही पहिली भेट. औंधकरांचे माझ्यावरचे प्रेम, विश्वास (त्यांचा मोठेपणाच मानतो मी) यामुळे जुन्या गोष्टी दूर सारून तो जवळ आला. मने साफ आहेत ही दोघांचीही मनोमन खात्री होती. विवक्षित वेळ वाईट म्हणून गरमागरमी होऊन स्फोट झाला...

पुढेही औंधकरांशी माझे संबंध चांगले राहिले. मी त्यांना 'राजकमल' मध्ये 'सावतामाळी'साठी नेले होते; पण 'राजकमल' बरोबर त्यांचा करार होण्यापूर्वीच ते वारले.

❋ अर्जुन लाजला !

श्रीमती हिराबाई बडोदेकर यांच्या रूपाने एका कुलीन नि शालीन स्त्रीचे मराठी रंगभूमीवर आगमन झाले. रंगभूमीवर येण्याआधी गोड गळ्याची गुणी गायिका– 'गायनहिरा' म्हणून त्यांनी लौकिक संपादला होता; पण त्यांच्या लोकप्रियतेत त्यांच्या गाण्याइतकाच त्यांच्या सौजन्यशील साध्या वागणुकीचा वाटा होता. थिएटरमध्ये जाहीर जलसे करून त्यांनी जलशाचे रूपांतर निखळ गाण्याच्या मैफलीत करून जलसा या प्रकाराची उंची वाढविली. त्यापूर्वी जलशाला– विशेषतः स्त्रियांच्या जलशाला– एक वेगळाच अर्थ अभिप्रेत होता.

हिराबाई रंगभूमीवर येण्यापूर्वी स्त्रिया रंगभूमीवर नव्हत्या असे नाही. 'मनोहर स्त्री संगीत मंडळी' नावाची स्त्रियांचीच एक स्वतंत्र नाट्यसंस्था होती. त्यात स्त्रियांच्या भूमिका तर स्त्रियाच करीत; पण पुरुषांच्या भूमिकाही स्त्रियाच करीत. तरी पण स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्या असा समंजस नि सुशिक्षित आग्रहाचा तो काळ होता. बालगंधर्वांच्या तोडीस तोड नाही, तरी त्यांच्या बऱ्याचशा बरोबरीने गाणारी स्त्री– कलाकार रंगभूमीवर नव्हती. हिराबाईंनी ती उणीव भरून काढली, म्हणूनच त्यांचे अपूर्व स्वागत झाले. त्या प्रथम नाटकात दिसल्या त्यासुद्धा 'संशयकल्लोळ'मध्ये जलशाच्या प्रवेशातच. नूतन संगीत विद्यालयाच्या (म्हणजे त्यांच्याच) नाटकात; पण खऱ्या अर्थाने नाटकात भूमिका करायला त्या फारशा राजी नव्हत्या; पण जशी 'धैर्यधरा'ची मोहिनी अनेक गवयांना पडली होती, तसेच 'सुभद्रे'चे वेड अनेक गायक–गायिकांनी घेतले होते. हिराबाई रंगभुमीवर आल्या त्या सुभद्रेच्या भूमिकेत आणि त्यांनी आपले युग निर्माण केले ते त्या भूमिकेनेच. सुरेल गाणे हाच त्यांच्या भूमिकेचा आत्मा !

नाट्यव्यवसायाच्या उतरत्या काळात संयुक्त प्रयोगांना सुरुवात झाली. अशाच एका संयुक्त सौभद्रात हिराबाई होत्या– सुभद्रा. विनायकराव पटवर्धन होते– अर्जुन, पटवर्धनबुवा नेहमीच आधी एक सद्गृहस्थ नि नंतर नट. म्हणजे ते चारुदत्त, अश्विनशेठ झाले, तरी कलाप्रेमी रसिक वाटले नाहीत. काम चोख करीत; पण त्या भूमिकेच्या रंगात तसे रंगून जात नसत. सौभद्राच्या पहिल्या अंकात राक्षसाने सुभद्रेला अरण्यात आणून सोडल्यावर, तीर्थयात्रेस निघालेल्या अर्जुनाची भेट होते. घरच्या आठवणीने नि ऐन लग्नमुहूर्ताच्या प्रसंगी आपण इथे आलो, आता वडील माणसे काय म्हणतील या भीतीने सुभद्रा मूर्च्छित होते.

तोल जाऊन ती खाली पडणार तोच अर्जुन तिला सावरतो असा सीन आहे. बालगंधर्वांबरोबर बुवा नेहमीच अर्जुनाचे काम करीत. त्या सीनमध्ये ते नारायणरावांना (सुभद्रेला) चटकन सावरीत. हिराबाईंनी नाटक सुरू होण्यापूर्वीच बुवांना विचारले होते, 'बुवा, मला सावराल ना त्या मूर्च्छेच्या सीनमध्ये?' बुवाही त्यावर म्हणाले होते, 'हो सावरीन ना, तुम्ही काय काळजी करता चंपूताई? (हे हिराबाईंचे घरातले नाव) नारायणरावांना नाही का नेहमी पडताना सावरीत? मग तुमचा काय प्रश्न आहे?' (नारायणरावांच्या मानाने हिराबाई अंगाने फारच बारीक होत्या)

खेळ सुरू होऊन तो सीन आला. हिराबाईंची खात्रीच होती की, बुवा आपल्याला सावरणार– त्यांनी 'हाय हाय! जातो माझा प्राण!!' हे सुभद्रेचे शेवटचे शब्द उच्चारून एकदम अंग सोडून देण्याचा अभिनय केला; पण काय झाले कुणास ठाऊक, प्रत्यक्षात बुवा हिराबाईंच्या जवळ आलेच नाहीत नि हिराबाई जमिनीवर आपटल्या! अर्जुन (बुवा) सुभद्रेपासून दहा फूट अंतरावर उभा होता! सुभद्रा मात्र पुढे आठ दिवस कंबर धरून होती!

❋ अर्जुन रागावला?

अशाच संयुक्त प्रयोगांच्या जमान्यात हिराबाई होत्या सुभद्रा नि बालगंधर्व झाले होते अर्जुन. बालगंधर्वांना पुरुषभूमिकेत पहाणे हासुद्धा त्या वेळी एक कौतुकाचा विषय होता. अर्जुन म्हणून ते फार सुरेख दिसत. एंट्रिलाच त्यांना कडकडून टाळी पडे; पण बोलायला लागले की, त्यांच्यातली (इतकी वर्षे मुरलेली) सुभद्रा डोकावू लागे. हिराबाई नि नारायणरावांची पदे फार सुरेख होत. तेच त्यांच्या संयुक्त सौभद्राचं खरं आकर्षण! पाचव्या अंकाची सुरुवात यतिवेषधारी अर्जुन नि जवळ सुभद्रा अशी होते. अर्जुनाची ध्यानधारणा संपते. दासींची बोळवण होते नि अर्जुन--सुभद्रेचा (लव्ह--सीन) सुरू होतो. थोडेसे संभाषण झाल्यावर सुभद्रेचे 'पुष्पपराग सुगंधित....' हे पद येते. हिराबाईंचे ते पेटंट पद, त्यांचा षड्जच असा सुरेख लागला की वा रे वा! सुरुवातीलाच कडकडून टाळी पडली. सारे पदच सुरेख रंगले. दोन वन्समोअर मिळाले. मग हिराबाई थांबल्या; पण प्रेक्षक ऐकेनात. वन्समोअरचा ओरडा सुरू झाला. नाइलाज म्हणून त्यांनी गाणे सुरू केले; पण ते गाताना त्यांना ताण पडत आहे हे शेजारी उभ्या असलेल्या बालगंधर्वांच्या लक्षात आले आणि ते सहन न झाल्याने, आपण अर्जुन आहो, हे विसरून ते चटकन म्हणाले, 'ताई, आता पुरे. नका म्हणू!'

जणू सुभद्रेला लोक त्रास देत आहेत म्हणून अर्जुन रागावला!

वास्तविक काटकसर हा शब्द बालगंधर्वांच्या कोषात कधीच नव्हता; पण गंधर्वांचे वाढते वय नि कंपनीचे चढते कर्ज यावर तोडगा म्हणून त्यांच्या हितचिंतकांनीच अनेक वेळा कपातयोजना समित्या स्थापन केल्या; पण मी मी म्हणणाऱ्या कपातयोजना समितीच्या सभासदांना महिना शे–दोनशे रुपयांचीसुद्धा कपात सुचविता आली नाही. 'देवा, हा इतका खर्च यायचाच!' असे बालगंधर्वांनी म्हटले की, सभासदांना नाही म्हणताच येत नसे, इतके लाघवी नि आर्जवी नारायणरावांचे बोलणे होते. लाडसाहेब हे बालगंधर्वांचे रसिक सावकार. त्यांनी नारायणरावांना न दुखावता जी काही काटकसर सहज करता येईल ती करावी या हेतूने दादासाहेब काटदरे यांना कंपनीत कारभारी म्हणून नेमले. दादा काटदरे म्हणजे एक आध्यात्मिक वृत्तीचे सद्गृहस्थ. नारायणरावांचे त्यांच्यावर मनापासून प्रेम. एकमेकांनी एकमेकांना कधीही दुखवले नाही. दादांनी पत्र्यातल्या बंगल्यांची पाने, बंगला न कोसळू देता लहान मुले जशी अलगद काढतात इतक्या हळुवारपणे नारायणरावांचा अवाजवी खर्च कमी केला. जमलेली पुंजी कर्जफेडीकडे वळवून त्यांचा भार कमी केला. दादांच्या या कामगिरीने लाडसाहेबही सुखावले.

एक दिवस बालगंधर्व खुशीत आहेत असे पाहून, कंपनीतले काही जादा आचारी कमी करण्याची कल्पना दादांनी सुचविली. महिना शंभर–दोनशे रुपयांची ठोक बचत होत आहे, हे पाहून नारायणरावांनीही होकार दिला; पण लगेच थोडासा विचार करून म्हणाले, 'देवा, आपण काढल्यावर ही मंडळी कुठे जाणार? आज इतकी वर्षे आपल्याबरोबर आहेतही!' तरीही दादांनी समजूत घातल्यावर नारायणराव मोठ्या कष्टाने कबूल झाले. शेवटी खर्चपाण्यासाठी त्यांना पैसे देऊन त्यांची पाठवणी केली.

त्याच दिवशी संध्याकाळी त्यांच्या ओळखीचा कनोजी अत्तरवाला त्यांच्याकडे आला. त्याच्याकडून सुमारे दोन हजार रुपयांची अत्तरे, बालगंधर्वांनी बसल्या बैठकीत खरेदी केली. दादा काटदऱ्यांनी हे जेव्हा पाहिले तेव्हा मनात म्हणाले, 'एक पाल पाच फूट वर जाते नि सहा फूट खाली येते यासारखेच हे गणित आहे. आचारी, काढले नि अत्तरे घेतली.' दादा सहज म्हणाले, नारायणराव, इतकी अत्तरे कशाला?' 'वा देवा, अहो आपल्या प्रेक्षकांसाठी एन्ट्री झाली की, अत्तराच्या घमघाटाने थिएटर नुसते भरून गेले पाहिजे!' या नारायणरावांच्या उत्तरावर दादा काय बोलणार? खरोखरच अठ्ठावीस-एकोणतीस सालापासून, गंधर्वांच्या एन्ट्रीला थिएटर-अत्तराच्या सुगंधाने भरून जाई; पण या अत्तर उधळण्यातही नारायणरावांचा एक गुणविशेष होता. जे करायचं ते

रंगभूमीसाठी, रसिकांसाठीच !' हे व्रत त्यांनी कधीही मोडले नाही. नाटका-व्यतिरिक्त अत्तराचा छोटासा फायासुद्धा ते कधी जवळ बाळगीत नसत.

❋ 'मौजे'ची निवडणूक !

त्या काळात भागवतबंधूंचे 'मौज' हे आपल्या गुणविशेषांनी लोकप्रिय झालेले साप्ताहिक होते. काही काळ अनंत हरि गद्रे (झुणका-भाकर फेम नि नंतरचे समतानंद) हे त्याचे संपादक होते. त्यांचा वारसा अच्युतराव कोल्हटकरांचा. अनंतराव नुसतेच संपादक नव्हते तर एक जाहिरातपटुही होते. वृत्तपत्रव्यवसायात नेहमीच काही तरी नवीन, सनसनाटी करून दाखविण्याची त्यांना हौस. मौजेत 'रंगभूमीचा रागरंग' हे एक सदरच त्यांनी टाकले होते. त्यात नाटकांच्या पुस्तकांचे नि प्रयोगांचे परीक्षण, कंपन्यांच्या मुक्कामांची माहिती, नव्या नाटक-मंडळ्यांची स्थापना, जुन्यांची फाटाफूट, नट-नाटककारांविषयी खुसखुशीत बातम्या असा भरगच्च मजकूर असे. मराठी रंगभूमीचा तो बाजता-गाजता काळ होता. बालगंधर्व, दीनानाथ, पेंढारकर, बोडस, पोतनीस, टिपणीस, दाते, फाटक, कोल्हटकर, शाळिग्राम आदी अनेक नामवंत नटमंडळी, (गायक नि गद्य) आप-आपल्या भूमिकांनी रंगभूमी गाजवीत होती.

या वेळी अनंतरावांनी एक नवीन टूम काढली. मौजेत एक आवाहन केले की, वाचकांनी आपल्या आवडीच्या पहिल्या पाच संगीत नि प्रोज नटांची नावे, गुणाक्रमाने लिहून आमच्याकडे पाठवावी. स्पर्धेचा निकाल 'मौज' च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध केला जाईल. त्याबरोबरच आपण सुचविल्याप्रमाणे स्पर्धेचा निकाल लागल्यास आपलीही नावे दिली जातील. झालं ! दहा-पंधरा दिवसांत पत्रांचा पाऊस पडला ! दिवाळी अंकात निकाल जाहीर झाला. गायकनटात साहजिकच अग्रपूजेचा मान बालगंधर्वांचा होता. ते पहिले आले ! प्रोज नटात नटवर्य दाते हे पहिल्या नंबराने निवडून आले. गायक नट प्रथम क्रमांक-नारायणराव बालगंधर्व ! प्रोज नट प्रथम क्रमांक-केशवराव दाते !

❋ द्रौपदीची कर्णफुले तारामतीला

बालगंधर्व हे लाड-कुटुंबीयच समजले जात. (सॉलिसिटर लाडसाहेब दुर्गाबाई खोटे यांचे वडील) गंधर्वमंडळींचा मुक्काम मुंबईत असला की, मग काही विचारायलाच नको; पण लाडकुटुंब उन्हाळ्याच्या सुटीत महाबळेश्वरला गेलं की, लाडसाहेब नारायणरावांना आवर्जून बोलावून घेत, इतके घरोब्याचे संबंध होते त्यांचे. दुर्गाबाईच्या आईला ते अक्का म्हणत. द्रौपदी-नाटकाच्या वेळी अक्कांपासून जुन्या पद्धतीची सोन्याची कर्णफुले नि जयपुरी लांब लोंबते डूल त्यांनी घेतले होते. अक्कांनी मोठ्या प्रेमाने ते त्यांना दिले होते. द्रौपदीच्या भूमिकेत ते त्यांना फार

सुरेख दिसत. पुष्कळ वर्षे ते बालगंधर्वांकडेच होते. अक्कांनीही कधी मागितले नाहीत. दुर्गाबाईंनी पुढे 'अयोध्येचा राजा' या चित्रपटात काम स्वीकारले. तारामतीचा मेकअप झाल्यावर त्यांना द्रौपदीच्या– बालगधर्वांच्या त्या सुंदर कर्णफुलांची साहजिकच आठवण झाली. त्यांनीही तेवढ्याच लाडिक दृष्टीने नारायणरावांजवळ ते मागितले. त्यांनी आपल्या बानूताईला (दुर्गा खोटे) तितक्याच प्रेमाने दिले. दुर्गाबाईंनाही तारामतीच्या भूमिकेत ते फार शोभून दिसले. इतक्या वर्षांनी आईचे डूल लेकीकडे आले. द्रौपदीचे डूल तारामतीला मिळाले!

⁂ पृथ्वीराज नि हिराबाई

पृथ्वीराज कपूर हे चित्रपटसृष्टीचे ज्येष्ठ नि श्रेष्ठ कलावंत म्हणून जरी प्रसिद्ध असले तरी ते मूळचे रंगभूमीचे अभिनेते. हिंदी रंगभूमी त्यांनी गाजविली होती. इंग्रजी नाटकांतूनही त्यांनी समर्थ भूमिका केल्या होत्या. 'पृथ्वी थिएटर्स' ही त्यांची स्वतःचीच नाट्यसंस्था होती. दीवार, गद्दार, पठाण, पैसा अशी दर्जेदार नाटके त्यांनी सादर केली होती. त्यांना मराठी नाटकांचीही खूप आवड होती.

एकदा कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्ये (आताचे केशवराव भोसले नाट्यगृह) ते सौभद्र पहायला आले होते. पहिल्या रांगेत मधल्या सीटवर त्यांना बसविले होते. नटसंच सुरेख होता. बालगंधर्व–अर्जुन, हिराबाई बडोदेकर–सुभद्रा, मा. कृष्णराव–नारद, लोंढे–कृष्ण. प्रयोग छान रंगत होता दुसऱ्या अंकातील हिराबाईंचे 'व्यर्थ मी जन्मले' सुरू झाले नि पृथ्वीराज सारखे आपल्या घड्याळात पहात होते. मग 'वद जाऊ कुणाला', 'अरसिक किती हा शेला' ही पदे होताच वन्समोअर पडत होते. इकडे पृथ्वीराज अधिकच अस्वस्थ होत होते. पडदा पडताच पृथ्वीराज धावतच आत गेले. हिराबाईंचे खूप कौतुक केले नि म्हणाले, 'ताई, तुम्ही इतका वेळ, उभ्या राहून गाता कशा याचे खरेच मोठे आश्चर्य वाटते! नाही तर आमच्या सिनेमात तीन मिनिटांच्या गाण्यासाठी नट्यांचे कोण नखरे! त्यांनी पुढे हिराबाईंनी गायलेली मीराबाईंची हिंदी भजने टेप करून घेतली होती. विश्रांतीच्या वेळात ते आवर्जून ती भजने ऐकत असत.

⁂ आधी नाटक मग सीन!

कुबेराचे वैभव नि कर्णाचे औदार्य एकत्र नांदले ते बालगंधर्वांच्या रूपाने! रंगदेवतेच्या पूजेअर्चेत कधी काही कमी पडू दिले नाही. रसिकांना अवमानिले नाही. जे जे काही केले, ते ते रंगदेवतेच्या नि रसिकांच्या सेवेसाठीच. 'आनंद भरीन–' अशी जणू शपथ घेऊनच, त्यांनी 'आनंद' लुटला, नि ती लूट असंख्य रसिकांना अखेरपर्यंत पुरली. मग त्या कुबेराला कर्ज झाले म्हणून आम्ही मामुली

माणसांनी का कुरकुर करायची ? नाही नाही; ते पाप आहे. त्याची टीकाटिप्पणी आम्ही काय करायची !

गंधर्व कंपनीने ना. वि. कुलकर्णी यांचे 'कान्होपात्रा' नाटक बसवायचे ठरविले. पंढरपूरचा देखावा अगदी हुबेहुब पंढरपूरसारखा झाला पाहिजे हे नारायणरावांचे पहिल्यापासूनचे मत. मग खर्च किती का येईना ! स्वयंवरासाठी खऱ्या जरीने जडविलेले गालीचे आले, द्रौपदीत डोळे दिपवणारी मयसभा उभी केली. त्याला काय थोडा खर्च झाला होता ? मग 'कान्होपात्रा' ला विठोबाचे देऊळ का नको ? हवेच ! पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरावरहुकूम सेट तयार करण्याचे काम सुरू झाले. नाटकाचा प्रयोग लागण्याची वेळ आली, तरी मंदीर तयार होतच होते. तुळया, कमानी घडत होत्या. अखेर एका जुजबी सीनवर प्रयोग करावा लागला. प्रेक्षकांना तो सीन पसंतही पडला; पण मनासारखे विठ्ठलमंदीर प्रेक्षकांना दाखविल्याखेरीज नारायणरावांना कसे चैन पडणार ? नाटकाचे किती तरी प्रयोग झाल्यावर, ते मंदिर एकदा उभे राहिले. खरे म्हणजे लोक येत होते ते बालगंधर्वांचा अभिनय पहायला, त्यांचे गाणे ऐकायला का सीन पहायला ? पण नाही. सगळं कसं अगदी जिथल्या तिथं हवं ! अखेर पंधरा-सोळा हजार रुपयांचा चुराडा होऊन ते मंदिर रंगमंचावर मांडले गेले, तेव्हा बालगंधर्वांचा जीव भांड्यात पडला. याचेच नाव बालगंधर्व !

❋ प्रभाव अभिनयाचा !

एक काळ असा होता की, प्रेक्षक गायक नटांच्या गोड गळ्यावर नि बहारदार गाण्यावर लुब्ध असत. त्यांच्या अभिनयाकडे बारकाईने पाहिले जात नसे. साहजिकच गाणे ही ज्यांची ढाल होती त्या नटांचे अभिनयाकडे दुर्लक्ष होत असे. याचा अर्थ असा नाही की, सगळेच गायक नट हे अभिनयात कच्चे होते. संगीताभिनयाचा सुवर्णसंगम असणारे अनेक गुणी गायक नट आपल्या मराठी रंगभूमीवर होते, म्हणूनच तर संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग निर्माण झाले !

पण गद्य नटांची वाणी नि मुद्रा हीच त्यांच्या अभिनयाची ढाल–तलवार ! सारी लढाई जिंकायची, मैदान गाजवायचे, ते या दोन्हींच्या जिवावर. या संदर्भात केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर नि नानासाहेब फाटक ही तीन नावे (तरुण पिढीला ऐकून तरी माहीत आहेत म्हणून) पुरेशी बोलकी आहेत. इतरही अनेक आहेत; पण ती सारी याच गोलातली आहेत.

दात्यांची वाणी पल्लेदार नव्हती. 'महाराष्ट्र नाटक मंडळी'त, ते उभे राहिले, तेव्हा टिपणीस, प्रधान, परांजपे ही सारी आवाज लावणारी नटमंडळी होती. म्हणूनच दाते मुद्राभिनयावर अधिक केंद्रित (concentrate) झाले. त्यांचा आदर्श होता नटश्रेष्ठ गणपतराव भागवत. आवाजाची उणीव त्यांनी

मुद्राभिनयाने भरून काढली, केशवरावांच्या अनेक भूमिका गाजल्या. जयंत–प्रेम–संन्यास, कवीश्वर–खडाष्टक, गणोजी–बेबंदशाही, औरंगजेब–आग्ऱ्याहून सुटका, राम–सवतीमत्सर, मनोहर–आंधळ्यांची शाळा अशा किती तरी.त्यांचा 'कवीश्वर' पाहून त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा बालगंधर्वांनी मोकळेपणाने बोलून दाखविली होती; पण त्यांचे विशेष कौतुक झाले ते त्यांच्या सवतीमत्सर नाटकातल्या 'राम' या व्यक्तिरेखेचे ! दाते त्या धीरोदात्त भूमिकेच्या साऱ्या छटा इतक्या विलक्षण दाखवीत, की ते साक्षात् रामच (रामाचा अवतार) वाटत. बालगंधर्वांनी त्यांचा राम पाहिला नि त्यांना अगदी भरून आलं ! प्रवेश संपताच ते आत गेले नि दात्यांना (रामाला) अगदी वाकून नमस्कार केला. (केशवा लोटांगण नारायणाचे) त्यांचा रामाच्या भूमिकेतला फोटो बालगंधर्व नेहमी जवळ ठेवीत. इतकेच काय दात्यांचा तो फोटो 'राम' म्हणून पूजेसाठी अनेकांच्या घरी देव्हाऱ्यात जाऊन बसला.

❋ पतिव्रतेची अब्रू घेतोस काय ?

राम गणेश गडकऱ्यांचे 'पुण्यप्रभाव' नाटक खूप गाजले. त्या नाटकाचा, विशेषतः 'वृंदांवन'च्या भूमिकेचा मोह भल्या भल्या नटांना पडला. पाच–सहा नाटकमंडळ्या (गद्य नि संगीत) या नाटकाचे सातत्याने प्रयोग करीत असत. मूळचे हे नाटक किर्लोस्कर संगीत मंडळीचे. नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर हे पहिले (Original) वृंदावन ! किंबहुना गडकऱ्यांनी तो त्यांच्यासाठीच लिहिला होता. त्या भूमिकेचे मर्म खुद्द गडकऱ्यांनी त्यांना समजावून दिले होते. त्यांनी सादर केलेला वृंदावन गडकऱ्यांना एकदम आवडला. पुण्यात पुण्यप्रभावचे अपूर्व स्वागत झाले.

नागपूरच्या मुक्कामात ओळीने दहा-बारा खेळ झाले. नागपूरकर प्रेक्षक नाटकावर निहायत खूष होते. (नाही तर जरा काही खटकले, कमी पडले की, थिएटरात 'सीताकांत स्मरण जय जय राम'च्या आरोळ्या आल्याच) उलट गडकऱ्यांना एकदा नागपूरला आणा, आम्हाला त्यांना पहायचंय' म्हणून प्रेक्षक हट्ट धरून बसले होते. असाच एक दिवस पुण्यप्रभावचा प्रयोग सुरू होता. नाटक नेहमीसारखेच रंगले होते. शेवटी सहाव्या अंकातला वसुंधरा–वृंदावनचा प्रवेश सुरू झाला. हा प्रवेश म्हणजे या नाटकाची परिसीमा ! पातिव्रत्याचा पुण्यप्रभाव. वसुंधरेच्या पातिव्रत्यभंगासाठी नि तिच्या हातातला हार स्वीकारण्यासाठी 'हा पहा तुझा हात धरून या हाराचा स्वीकार करतो–' असे म्हणत वृंदावन एक पाऊल पुढे टाकणार तोच प्रेक्षकात एकदम आरडाओरडा सुरू झाला. एक तगडा भय्या हातात काठी घेऊन स्टेजकडे धावत चालला होता. तोंडाने मोठ्यामोठ्याने बडबडत होता. लोक

त्याला समजावीत होते, 'भय्या ठैरो सुनो तो सही!' क्या सुनो क्या? इतने लोगोंके सामने वो साला (वृंदावन) एक पतिवरताकी अब्रू लेगा? उसे धमकाएगा!' या भय्याला सात्त्विक संताप आला होता. याला म्हणतात अभिनय! चिंतामणरावांचा 'घनःश्याम' (भावबंधन) पाहून, त्यांच्या एका मित्राने इतकी भीती घेतली होती की, तो स्वतः तर चिंतामणरावांच्या थाऱ्याला उभा रहात नसे; पण त्यांनी मा. दीनानाथ नि कोल्हापुरे यांना सुद्धा आपल्या सहकाऱ्यापासून (कोल्हटकर, दीनानाथ, नि कोल्हापुरे हे तिघे 'बलवंत संगीत मंडळी'चे मालक होते) जपून रहा असे बजावले होते.

रसिकहो, ही आपल्या रंगभूमीची परंपरा. आजच्या मंदिराच्या कळसाखालचे पायाचे दगड. मंदिराच्या 'नामदेव' पायऱ्या!

❋ गडकऱ्यांची गुरुभक्ती!

किर्लोस्कर – देवल, कोल्हटकर – गडकरी या नाटककार गुरुशिष्यांच्या अमर जोड्या! देवल स्वतःला 'बलवत्पदनत' म्हणवून घेतात, तर गडकरी 'वंदुनि त्या श्रीपादपदांप्रति' म्हणून नतमस्तक होतात. देवल अण्णासाहेबांच्यापुढे चार पाऊले चालले, तर गडकरी तात्यासाहेबांच्या पुढे इतके गेले की, मागे वळून पाहिले तर तात्या दिसेचनात! तरीही गडकरी एक गोष्ट कधीही विसरले नाहीत की, ज्या वाटेने आपण चालतो, त्या वाटेवर पाऊलखुणा आहेत त्या श्रीपादपदांच्याच, नि त्या वाटेचे नाव आहे – श्रीपादकृष्ण!

खुद्द त्यांचे गुरू लिहितात, 'त्यांना (गडकऱ्यांना) काही कारणाने वैराग्य उत्पन्न झाले असून ते वेडे होण्याच्या मार्गाला लागले होते; परंतु माझ्या लेखांनी त्यांच्या मनाला खाद्य पुरवून त्यांचे वेडापासून रक्षण केले, असे ते पुढे पुढे म्हणत असत. त्यांच्या भक्तीचे कारण कोणतेही असले तरी तिच्याइतकी उत्कट व अकृतिम भक्ति या काळात फारच विरळा दिसून येते!'

गडकऱ्यांनी आपल्या साऱ्या श्रद्धा श्रीपादकृष्णांच्या चरणी वाहिल्या असल्या, त्यांचेच शिष्यत्व सांगत असले, तरी ते किर्लोस्कर, देवल नि खाडीलकर-चरणीही विनम्र होते. 'वंदन नाट्य – मिलिंदा गोविंदा तव पदारविंदांना' असा 'देवल' या त्यांच्या कवितेत त्यांचा नम्र उल्लेख आहे. खाडिलकरांनी त्यांच्या 'प्रेससंन्यास' नाटकाच्या पहिल्या विस्कळित प्रयोगाच्या आपणहून तालमी घेतल्या, तेव्हा त्यांच्या मनाचा मोठेपणा पाहून गडकरी भारून गेले. त्या क्षणापासून खऱ्या अर्थाने ते खाडिलकरांना 'काका' म्हणू लागले.

तात्यांच्या (श्रीपाद कृष्ण) बाबतीत तर ते नेहमी म्हणत, 'तात्या, ती तलवार एक तुमची बाकी विळे-कोयते.'

कोल्हटकरांच्या 'सहचारिणी' नाटकाचे 'गंधर्व नाटक मंडळी'त वाचन

झाले. गडकरीही तिथे होतेच. वाचन संपल्यावर या गुरुशिष्यात त्या नाटकाविषयी चर्चा सुरू झाली. गडकऱ्यांनीही काही मुद्द्यांवर आक्षेप घेतले. सुधारणाही सुचविल्या. तात्यांनी त्या मान्य केल्या; पण चर्चेच्या ओघात फेऱ्या मारीत गडकरी बोलत होते, तात्या लिहून घेत होते. मधेच तात्या म्हणाले, 'हं बोला.' मास्तर सांगत होते, तोच त्यांचे तात्यांकडे लक्ष गेले नि एकदम ओशाळले. आपण सांगतो आहोत नि ते लिहीत आहेत! ते बोलायचे थांबले. मोठ्या विनम्रपणे म्हणाले, 'मी चुकलो, तुम्ही सांगायचे, मी लिहून घ्यायचे असे आपले नाते. जे काही बदल करायचे ते तुमचे तुम्ही करा. मी कोण सांगणार? तुमच्या लिखनात फेरफार करण्याचा माझा अधिकार नाही. तात्या, चुकलो मी. मला क्षमा करा!'

खाजगी गप्पांत कधी कुणी तात्यांच्या नाटकांवर, साहित्यावर टीका केली, अनुदार उद्‌गार काढले तर, ताबडतोब सुनवीत– 'कोल्हटकरांनी एक गडकरी घडविला आहे. तात्यांच्यावर बोलण्याआधी, तुम्हाला या गडकऱ्यांशी चार गोष्टी कराव्या लागतील! आपल्या गुरूंचा केवढा जाज्वल्य अभिमान! तात्यांच्या लेखणीचे कौतुक करताना आपल्या 'श्रीमहाराष्ट्रगीत' या काव्यात लिहितात,

'जिथे रंगली साधीभोळी जनाइची गाणी
तिथेच खेळे श्रीपादांची कलावती वाणी'

आपल्या पहिल्याच 'प्रेमसंन्यास' नाटकाच्या अर्पणपत्रिकेत 'कृतज्ञतेचे अश्रू' म्हणून आपल्या गुरूंविषयी म्हणतात.

'गुरुवर्य तात्यासाहेब,

माझ्यासारख्या विषम स्थितीतल्या आणि असदृश योग्यतेच्या मनुष्याला आपण आज इतकी वर्षे उदार हृदयाने, बरोबरीच्या मित्रपणाचा थोर मान देत आला. वेळोवेळी माझ्या चुकल्या बालबुद्धीला वडीलपणाने सदुपदेश करीत आला; कधीकधी उच्छृंखलपणाने माझ्याकडून आपला उपमर्द झाला असता त्याचीही बंधुप्रेमाने क्षमाच करीत आला, आजवर मी लिहिलेल्या वेड्यावाकड्या शब्दांचे पितृतुल्य प्रेमाने प्रोत्साहनपर कौतुकच करीत आला, याप्रमाणे एक ना दोन हजारो उपकारांचे आज एकसमयावच्छेदेकरून स्मरण होऊन अंतःकरण कृतज्ञतेने उचंबळून येत आहे आणि त्या कृतज्ञतेचे अश्रूच आज सानंद भक्तिभावाने आपल्या परमपूज्य चरणी वाहत आहे!'

'भावबंधन' पुरे करताना गडकरी मृत्युशय्येवर होते. अखेरचे क्षण मोजीत होते. तरी पण आपल्या गुरुभक्तीचा महिमा गायला ते विसरले नाहीत. आत्यंतिक भक्तिभावाने नमनाच्या साकीतच सांगून जातात,

कृपाच ज्यांची कारण केवळ मम पामर वचनाते।
वंदुनि त्या श्रीपादपदांप्रति या या यशकार्याते।

नवनाटकरचना, सादर करितो रसिक जना ॥

धन्य तो गुरू नि धन्य तो शिष्य ! मराठी रंगभूमीच्या भाग्यविधात्या गुरु-शिष्यांना सादर प्रणाम !

❋ ही ठेव केशवरावांची !

८ जुलै १९२१ रोजी टिळक स्वराज्यफंडासाठी 'केशव-नारायण' (केशवराव भोसले नि नारायणराव बालगंधर्व) यांचे संयुक्त 'मानापमान' झाले नि जणू केशवरावांना दृष्टच लागली. ते लगेचच चार ऑक्टोबरला गेले ! 'ललितकलादर्श'समोर अंधार पसरला. आता कंपनीचे काय होणार याची सर्वांनाच काळजी वाटू लागली; पण केशवरावांना जणू आपले विधिलिखित कळले होते. त्यांनी मृत्युपत्र करून ठेवले होते. वास्तविक मृत्युपत्र म्हणजे आपल्या इस्टेटीची, कुटुंबियांत केलेली कायदेशीर वाटणी; पण तुम्हाला आश्चर्य वाटेल, केशवरावांचे धन म्हणजे त्यांची कंपनी. मालकीची नाट्यसंस्था—ललितकलादर्श ! ती त्यांनी रक्ताच्या नातेवाइकांच्या नावे केली नव्हती, तर कलेच्या कुटुंबियांच्या आपल्या सच्च्या सहकाऱ्यांच्या स्वाधीन केली होती. ते होते बापूसाहेब पेंढारकर नि नानासाहेब चापेकर !

दोघांनीही एकदिलाने संस्था चालू ठेवली. पाठीशी केशवरावांची पुण्याई होतीच. मामा वरेरकरांचे 'सत्तेचे गुलाम' हे सर्वतोपरी नाविन्याने नटलेले नवे नाटक रंगभूमीवर आणले. बापूंचा 'वैकुंठ' सर्वोत्कृष्ट ठरला. नाना चापेकरांची 'नलिनी' प्रेक्षकांना एकदम आवडली. नानासाहेब फाटकांच्या रूपाने (केरोपंत) एका समर्थ गद्यनटाची जोड मिळाली. नाना चापेकर मात्र लवकरच दूर झाले. संस्थेची सगळी जबाबदारी एकट्या बापूंच्यावर पडली. बापू नव्याचे भोक्ते होते. आपल्या प्रेक्षकांना सतत काही तरी नवीन द्यावे अशी त्यांची धारणा होती; पण 'तुरुंगाच्या दारात' हे मामांचे नवे नाटक त्यांना पार नामोहरम करून गेले. बापू धडाडीचे होते. जिद्दी होते. नवी-जुनी नाटके बसवून कंपनीचा तोल संभाळला होता. पुण्यप्रभाव नि कृष्णार्जुनयुद्ध यांसारख्या नाटकांनी त्यांना हातही दिला; पण 'सत्तेचे गुलाम'च्या वेळचे उत्साही नि आनंदी वातावरण कंपनीत पुन्हा कधीच निर्माण झाले नाही. गुरव, माशेलकर, भार्गवराम, दामले अशा अनेक गुणी कलावंताची साथ लाभली. तरी पण म्हणावे तसे यश पदरी पडत नव्हते. ऊन पावसाचा खेळ चालू होता; पण ऊनच अधिक होते.

मग बापूंनी सिनेमाचे वेड घेतले नि जे साऱ्या नाटकवाल्यांचे झाले, तेच ललितकलादर्शचे झाले. बापू कर्जाने पार खचले. सहकाऱ्यांनी पाठ फिरवली. अखेर बापू आजारी असता ग्वाल्हेर मुक्कामी कंपनीवर सावकाराची टाच आली. कंपनीची होती नव्हती ती चिजवस्तू जप्त झाली. नाही म्हणायला बापूंचे दोन

तंबोरे, हे आपल्या मालकीचे आहेत असे दामले–भार्गवरामांनी सांगितल्याने वाचले तेवढेच ! या सगळ्या विपरीत परिस्थितीत बापूंना कायद्याचा सल्ला देण्यात आला की, त्यांनी संस्थेचे नाव बदलावे. नादारीचा अर्ज करावा. अर्थात या मागेही कंपनी वाचावी हीच त्यांच्याजवळ असणाऱ्या मंडळींची इच्छा होती; पण बापूंच्या स्वाभिमानी स्वभावाला ते मान्य कसे होणार ? तशाही परिस्थितीत त्यांनी स्वच्छ सांगितले, ' नाही, हे होणार नाही ! काय व्हायचे असेल ते होवो. मी कंपनीचे नाव बदलणार नाही. नाव बदलणारा मी कोण ? केशवरावांनी मोठ्या विश्वासाने माझ्यापाशी ठेवलेली ठेव आहे ती ! ते त्यांचे धन आहे !

रसिकहो, नाव बदलले असते तर ? पण हे जर तर हवे कशाला ? ' ललितकलादर्श 'चा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे नि तो डोळे भरून पहाण्याचे भाग्य आपल्याला लाभले असते का ? १९०८ ते १९८४ असा वारसा सांगता आला असता का ? खचित नाही ! बापूंनी नाव बदलले नाही. निष्ठा सोडली नाही. म्हणूनच एकमेव अमृतमहोत्सवी नाट्यसंस्था म्हणून अभिमानाने तिचा उल्लेख होत आहे. भालचंद्र पेंढारकर ती पताका आज त्याच निष्ठेने सांभाळीत आहेत. फडकवीत आहेत. केशवराव–बापू–भालचंद्र त्या एकाच संस्थेचे सेक्रेटरी. त्या एकाच श्रद्धेचे, एकाच दिंडीचे वारकरी.

मला वाटते सूर संपत नाहीत म्हणूनच बापूंचे तंबोरे वाचले. भार्गवराम दामले या त्यांच्या सद्‌शिष्यांनी वाचविले, म्हणूनच ते या क्षणापर्यंत झंकारत राहिले आहेत. ही वारकऱ्यांची वीणा सदैव अशीच झंकारत राहो ! ' ललितकलादर्श 'चे नाव दुमदुमत राहो. रसिकांच्या तोंडी घोळत राहो !

❋ आता सारे संपले !

केशवराव भोसले यांचे जीवलग स्नेही नि 'ललितकलादर्श'चे कर्तबगार मॅनेजर शितूतमामा (केशवराव शितूत) यांच्या मित्रप्रेमाला तर रंगभूमीच्या इतिहासात तोड नाही ! केशवराव भोसले गेले, त्या दिवशी स्मशानभूमीवर त्यांना श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी शपथ घेतली की ' यापुढे नाटकाशी वा नाट्यव्यवसायाशी माझा रतिमात्र संबंध राहणार नाही ! मी थिएटरची पायरी चढणार नाही ! ' खरोखरच ही प्रतिज्ञा त्यांनी अखेरपर्यंत पाळली.

बापूसाहेब पेंढारकर नि नाना चापेकरांना वाटे की, शितूतमामाच व्यवस्था पहायला हवे; पण नाही त्यांनी पुढे नाटकाचे नाव घेतले नाही. त्यांचे उत्तरीय आयुष्य बाळासाहेब पेंडसे, कुटुंबातील एक वडीलधारे कुटुंबीय (पेंडसे स्पोर्टस–पुणे) म्हणून गेले !

❋ नटाची कदर !

नटवर्य नानासाहेब फाटकांच्या अमदानीत त्यांच्या इतका देखणा गद्य नट, मराठी रंगभूमीवर झाला नाही असे म्हणायला हरकत नाही. नटाला जे जे म्हणून हवे, ते ते सारे परमेश्वराने त्यांना मुक्त हस्ताने बहाल केले होते. गायक नटात जसे नारायणराव बालगंधर्व, तसे गद्य (Prose) नटात नानासाहेब फाटक. त्यांची रुबाबदार देहयष्टी–रूप–रंग नि जराही न चिरकता हवा तसा फिरणारा टिपेचा बुलंद आवाज. हे सारे लक्षात घेऊन, 'महाराष्ट्र नाटक मंडळी 'तले नटवर्य परशुरामपंत शाळिग्राम (संभाजी–बेबंदशाही, कमालखान–शिवसंभव) म्हणाले होते की, 'देव गद्य नटांना रूप वाटायला निघाला. तेव्हा त्याला आधी नानासाहेब फाटक भेटले. रूपगुणांची पुंजी त्यांना देऊन देव मोकळा झाला. आम्ही इतर गद्य नट ओबडधोबड राहिलो.' मला वाटते याच आठवणीच्या आधारावर तात्यासाहेब शिरवाडकरांनी, 'नटसम्राट 'च्या सुरुवातीच्याच स्वगतात म्हाताऱ्याच्या तोंडी (गणपतराव बेलवलकर) एक वाक्य घातले आहे; 'पण आमच्यासारखे नट म्हणजे खडकासारखे ओबडधोबड आणि पावसाळी ढगांप्रमाणे गडगडणारे.' यात खोटे काय आहे ? केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर यांना देवाने काय दिले होते ? पण कौतुक नि अपूर्वाई हीच आहे की ही माणसे प्रवाहाविरुद्ध पोहून पैलतीरी पोचली. आपल्या कर्तृत्वाने अभिनयश्रेष्ठ म्हणून गाजली नि गौरवली गेली.

नानासाहेब फाटकांचे सुमारे एक तप बापूसाहेब पेंढारकरांबरोबर 'ललितकलादर्श 'त गेले. केरोपंत (सत्तेचे गुलाम) विक्रांत (राक्षसी महत्त्वाकांक्षा) वसंत (हाच मुलाचा बाप) कुसुमाकर (श्री) बाबा शिगवण (सोन्याचा कळस) अशा अनेक प्रमुख भूमिका गाजविल्या; पण बाहेर पडले ते बरोबर एकमेव 'वृंदावन' (पुण्यप्रभाव) घेऊन. वृंदावन अनेकांनी केला; पण वृंदावन म्हटले की नानांचीच आठवण येते. मग संयुक्त नट संचात त्यांनी हॅम्लेट, सुधाकर, घनःश्याम, झुंजारराव उभे केले. काही काळ 'शाहू नगरवासी 'त राहिल्याने नटसम्राट गणपतराव जोश्यांचा परीस स्पर्श त्यांना झाला होता. त्यांची पुण्याई म्हणजेच त्यांचा हॅम्लेट !

नाना सुशिक्षित होते, रसिक होते, दिलदार होते; पण म्हणतात की कुणाला न जुमानणारे होते. नाही म्हणायला केशवराव दात्यांना मात्र मानीत. पंढरीच्या पांडुरंगासमोर सगळेच जसे हात जोडले जाऊन नतमस्तक होतात, तसेच डॉ. भालेरावांना सारेच कलावंत मानीत. आज मराठी नाटक पुन्हा ताठ उभे आहे, ते केवळ त्या माणसाच्या भगीरथ प्रयत्नांवर. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अनेक नव्या जुन्या नाटकांतून नानासाहेबांनी कामे केली; पण लोक त्यांना वचकून

असत. संघासाठी केशवरावांनी 'भाऊबंदकी' बसवायला घेतले. नानांची 'राघोबा' साठी निवड झाली नि नाना एखाद्या विद्यार्थ्यासारखे तालमीला उभे राहिले. इतर कुणालाही नाही; पण केशवरावांना ते मनोमनी मानीत.

१९५४ च्या राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात दिल्लीला 'भाऊबंदकी'चा प्रयोग सादर केला. सगळ्या बहुभाषी नाटकात, सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून 'भाऊबंदकी'ला पहिले पारितोषिक मिळाले, पुन्हा एकदा अटकेवर झेंडे फडकले.

कलावंताना एकत्र सांभाळणे महाकठीण. पण ते अवघड काम डॉ. भालेरावांनी अखेरपर्यंत केले. नानासाहेबांना मद्य घेण्याची लटक होती. डॉक्टरांनी त्यांना बजावले होते, 'नाना, दिल्लीच्या प्रयोगात काही वेडेवाकडे होता कामा नये.' नानांनी ते वचन, तो शब्द पाळला. प्रयोग दृष्ट लागण्यासारखा सुरेख झाला. दुर्गा खोटे (आनंदीबाई) मा. दत्ताराम (रामशास्त्री) नि नानासाहेब (राघोबा) अशी मातब्बर माणसं होती प्रयोगात.

नानासाहेबांना आपण त्यांच्या स्वभावाविरुद्ध डांबून ठेवले आहे. त्यांची मोठी अवघड अवस्था केली आहे हे डॉक्टरसाहेबांना सतत जाणवत होते. खेळ संपताच नानांसाठी थिएटरच्या बाहेर एक टॅक्सी बोलावून घेतली. नानासाहेबांना हाक मारली. पाठीवर शाबासकीची थाप दिली. त्यांच्या खिशात नोटा कोंबल्या नि म्हणाले. 'शाबास नाना! आज जिंकलीत. आजवरच्या आपल्या कीर्तीवर कळस चढविलात. जा, टॅक्सीत बसा नि आता जरा मजा करून या!' नानांनाही तेच हवे होते. त्यांनी डॉक्टरांकडे खुशीत लुक (Look) दिला नि ते टॅक्सीकडे वळले.

कलावंताला खुलवावा लागतो, फुलवावा लागतो, त्याची कदर करावी लागते ती अशी! याचा अर्थ त्याच्या व्यसनाला उत्तेजन द्यावे असा नाही. व्यसन ते व्यसनच; पण नानासाहेबांना त्या व्यसनापासून परावृत्त करायची का ती वेळ होती? त्यांचे ते वय का होते?

❋ जशी आपली आज्ञा

१९३२-३३ च्या सुमारास मराठी रंगभूमीचे सुवर्णयुग संपुष्टात आले. वैभवपर्वाला ओहोटी लागली. गंधर्व, बलवंत, ललितकलादर्श, महाराष्ट्र यांसारख्या नामांकित नाट्यसंस्था, कर्जाच्या डिगाऱ्याखाली चेंगरून गेल्या. बालगंधर्व, बोडस, दाते, कोल्हटकर, फाटक यांसारखे रंगभूमीचे राजाधिराज संन्यासी होऊन सिनेसृष्टीत दाखल झाले होते. जन्मकुंडलीने दिलेला न्याय निमूट स्वीकारीत होते. त्यांच्यापाठोपाठ, इतर नटमंडळी चित्रपटात मिळतील ती कामे स्वीकारीत होती. काय करणार? जिथे फुले वेचली तिथे....! किर्सन लाइटच्या प्रकाशात रंगमंचावर मिळविलेल्या टाळ्या, वन्समोअर मध्यान्हीला-उदरभरणाला उपयोगी पडत

नव्हत्या !

रंगभूमीचे सम्राट बालगंधर्वही बोलपटासाठी करारबद्ध होऊन, 'प्रभात'च्या कुंपणात अडकले होते. 'धर्मात्मा' चित्रपटात प्रमुख भूमिका करत होते. बालगंधर्व पुरुष वेषात, हो, हो ! भरजरी शालूऐवजी, चक्क पंचा नेसून–एकनाथ म्हणून रुपेरी पडद्यावर दिसणार हेही एक मोठे आकर्षण होते. कौतुक होते; पण क्षणाक्षणाला रसिकांची दाद घेत, वन्समोअरच्या खैरातीत नाटकात फुलणारे, रंगणारे बालगंधर्व, सिनेमाच्या त्या एकाकी यंत्रसंचात गुदमरले, बावरले, गहिवरले. डोळ्यांसमोर दिसू लागली आपली नाटक-मंडळी नि प्रेक्षकांच्या तुफान गर्दीत रंगणारी नाटके–सौभद्र, मानापमान, स्वयंवर, एकच प्याला ! त्यांना राहवेना, त्यांनी पंतांना (गंधर्व हिरो–गंगाधरपत लोंढे) लिहिले. 'पंत, मी प्रभातच्या करारात गुंतून पडलो आहे. आपली कंपनी बंद पडली आहे; पण कसेही करून ती उभी राहिलीच पाहिजे ती सुद्धा मी करारातून मोकळा होण्यापूर्वी ! हे पुन्हा नव्याने कंपनी उभारण्याचे काम, देवा, तुमच्यावाचून कोणा खारीच्या हातून होणार नाही. माझ्यासाठी एवढे काम तुम्ही करायलाच हवे !'

लोंढ्यासारख्या उमद्या नटाच्या हृदयाला हात घालायला, नारायणरावांचे भावनेने भिजलेले हे चार शब्द पुरेसे होते. लोंढे त्या वेळी 'ओडियन रेकॉर्ड'-मध्ये, संगीत विभागात मोठ्या हुद्द्यावर होते. बस, पत्र हाती पडले मात्र, ती जणू आपल्या मालकांची आज्ञा समजून पंत कामाला लागले. आधी ओडियन कंपनीला रामराम ठोकला. पुण्यात येऊन दाखल झाले. मास्तर कृष्णराव, हरिभाऊ देशपांडे, अभ्यंकर, मा. दुर्गाराम आदि अनेक 'गंधर्व' कलावंतांना नारायणरावांची–आपल्या मालकांची इच्छा सांगितली. त्यांची हळहळ, त्यांचे दुःख समजावून दिले. स्वतः विनावेतन काम करण्याची तयारी दाखविली. साहजिकच मग इतर कोणी कलाकारांनी, कुठेच अडविले नाही. मास्तरांनी 'स्वयंवर' च्या पहिल्या प्रयोगात काहीही न मागता 'रुक्मिणी' करण्याचे कबूल केले. झाले. विजयानंद नाट्यगृहावर गंधर्व नाटक मंडळीचा बोर्ड झळकला ! दिवस होता ४ जून १९३५ खेळ स्वयंवर ! प्रमुख भूमिका – रुक्मिणी–मा. कृष्णराव. कृष्ण–लोंढे !

योग असा की, आशीर्वाद द्यायला होती एक थोर व्यक्ती ती म्हणजे–शंकरराव मुजुमदार ! किर्लोस्कर संगीत मंडळींचे एक काळचे मालक. मराठी रंगभूमीचे कर्तुम् अकर्तुम् ! अण्णासाहेबांची पहिली शकुंतला ! पहिली सुंदर रुक्मिणी (सौभद्र) प्रयोगाला स्वतः बालगंधर्व हजर ! प्रयोग रंगायला आणखी काय हवे ? बालगंधर्वांना अगदी भरून येऊन ते म्हणाले, 'आज माझी दुसरी आईच (शंकरराव) आशीर्वाद द्यायला आली आहे !

याला म्हणतात हाडाचा कलावंत ! दोष कुणात नसतात ? गंगाधरपंतांतही होते; पण त्यांच्यातल्या कलावंताचे मोठेपण त्या नटसम्राटांनी – बालगंधर्वांनी –

अचूक हेरले होते. म्हणून त्यांनी हाक मारली ती लोंढ्यांना नि दाद दिली ती लोंढ्यानीच ! केवळ बाळगंधर्वांची इच्छा म्हणून पंतांनी हे धाडस केले नि यशस्वी करून दाखविले. गंधर्वांशिवाय ' गंधर्व मंडळी ' म्हणजे हॅम्लेटविना हॅम्लेट, चंद्रा विना चांदणी रात्र अशीच स्थिती होती. हे यश गंधर्वपुण्याईचे, गंधर्व–कलावंताचे होते; पण हेही कबूल केले पाहिजे की, त्यात ' सिंहाचा वाटा ' (Lion Stare) गंगाधरपंत लोंढ्यांचाच होता !

गंधर्व-हिरो म्हणून लोंढे बालगंधर्वांबरोबर बरीच वर्षे उभे राहिले. कृष्ण, चारुदत्त, कोदंड, कच, धैर्यधर, आश्विनशेट अशा अनेक भूमिकांत सुरेख साथ दिली. पुढे त्यांनी गंधर्व रंगभूमीचे पुन्हा दर्शन घडवावे या हेतूने स्वतःची ' राजाराम संगीत मंडळी ' स्थापन केली होती. त्याच संस्थेत चिंतोबा गुरव, शंकरराव सरनाईक, बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, कामण्णा (दिनकर ढेरे) आदि अनेक जुन्या गुणवंतांचे नव्या पिढीला दर्शन झाले. कंपनी ऐन भरात असता लोंढे हृदयविकाराने अकाली गेले ! जाणकार असे सांगतात की, नटवर्य कृष्णराव गोरे यांच्यानंतर त्यांच्या जवळपास येणारा स्वच्छ वाणीचा नि भरदार सुरेल आवाजाचा नायक नट म्हणून गंगाधरपंत लोंढ्यांचेच नाव घ्यावे लागते !

❋ किमया कामण्णाची !

कामण्णा हा मराठी रंगभूमीवरचा एक चमत्कार होता. कामण्णा कसा तर कामण्णासारखाच. विनोदी नटांचा शहेनशहा ! राजराजेश्वर ! इतर विनोदी नटांविषयी लिहिताना वा बोलताना, त्यांची नकळत कामण्णाशी तुलना होतेच. तो त्या भूमिकेत कामण्णाच्या जवळपास आल्यासारखा वाटला, ' त्याने आपल्या भूमिकेत काल कामण्णाची आठवण करून दिली.' असे उल्लेख वरच्यावर अवश्य येतात. कै. शंकर घाणेकर, श्री. वसंत शिंदे, शरद तळवलकर, बाळ कोल्हटकर राजा गोसावी, चित्तरंजन कोल्हटकर, (आता ' कामण्णा ' फारसा करीत नाहीत) हे सारे विनोदवीर कामण्णा या नावाशी नतमस्तक होणारे. ' कामण्णा ' ही त्यांची ' नामदेवपायरी ! ' तिला पाय नाही लागायचा कधी, अर्थात या प्रत्येकाजवळ आपआपली अभिनयाची वेगळी पुरचुंडी आहेच.

हो, पण ' कामण्णा ' हा सुद्धा मुखवटाच ! दिनकर ढेरे, या नटाने आपल्या चेहऱ्यावर चढविला नि तो चिरजीव झाला. १८ ऑक्टोबर १९१९ ला, महेश्वराचा— कामण्णाचा जन्म झाला. (' बलवंत संगीत मंडळी 'च्या पहिल्या वाढदिवशी ' भावबंधन ' रंगभूमीवर आले.) आज तो साठी उलटून सत्तरीची वाटचाल करीत आहे; पण कसा अगदी ताजा टवटवीत आहे. सदा सतेज ! ही किमया त्याच्या जन्मदात्याची—राम गणेशांची तर आहेच; पण त्या शब्दकलेत जीवकळा ओतली ती दिनकर कामण्णांनीच ! ' बलवंत संगीत 'चे मा.

दीनानाथ, कोल्हटकर, कोल्हापुरे हे मालक तर तिचे प्राणच होते; दिनकर हा तर त्यांच्या प्राणांचा प्राण होता. चिंतामणरावांसारखे श्रेष्ठ नट नि मालक, दिनकर कामण्णांविषयी मोठ्या मोकळेपणाने नि आदराने लिहितात. 'नाटकाच्या (वीरविडंबन) यशाचे श्रेय लेखननैपुण्याप्रमाणेच दिनकरच्या (उत्तराच्या) अभिनयकौशल्यालाही द्यावे लागेल... त्याचे अलौकिक नाट्य या उत्तराच्या भूमिकेतच पहायला मिळे... त्याच्यासारख्या असामान्य नटाची मूर्ति, त्याला एकदा पाहिलेला प्रेक्षक कधीच विसरणार नाही, विसरू शकणार नाही.' आणखी एका प्रसंगी तेच लिहितात, 'रंगलेल्या दिनकररावांच्या (कामण्णा) शरिराचा रोम अन् रोम, बोलण्याच्या स्वराचा कणन् कण, ही प्रेक्षकांवर हास्यरसाचे फवारे उडविण्याची कारंजीच होती. ईश्वराने रंगदेवतेला बहाल केलेली ती एक हास्यरसाची देणगी होती.'

'बलवंत'च्या वाजत्या-गाजत्या नाटकातले दिनकर हे एक चलनी नाणे होते. हुकुमाचा एक्का होता. वीरविडंबन (उत्तर) उग्रमंगल (विद्याधर) भावबंधन (महेश्वर– कामण्णा) राजसंन्यास (जिवाजी) सहजता हा जसा दिनकररावांचा विशेष, तसेच समयसूचकता ही त्यांची खास जमेची बाजू. खेळ चालू असता, प्रसंग विरोधी भूमिकेशी नि नाटकाशी चपखळ बसणारी वाक्ये ते सहज बोलत नि प्रेक्षकात खसखस पिके. ब्लॅक आउटच्या (Black out) काळात ते भावबंधनाचा खेळ चालू असता, इंदूविंदूच्या प्रवेशात, तो वचन देत नाही, तेव्हा इंदु 'काका' असे म्हणत जाऊ लागते. तोच कामण्णा म्हणत, 'इंदा, बाहेर जाऊ नको. काळोखात सापडायची नाहीस!' तिच्या काळेपणाची अशी आणखी टर चिंतामणरावांच्या गैरहजेरीत कुणी तरी दुसऱ्या कलावंताने (मला वाटते बहुतेक नटवर्य मामा पेंडसे असावे) भावबंधनमध्ये घनःश्याम केला. त्याला सिगरेट ओढण्याची सवय नसल्याने, घनःश्याम–कामण्णाच्या प्रवेशात, चिंतामणरावांची सिगरेट पेटविण्याची स्टायलिश ॲक्शन त्याला जमेना नि सिगरेट पेटेना! साहजिकच तो गांगरला. त्याला सावरून घेण्यासाठी कामण्णा लगेच म्हणाला, 'घनःश्यामा, अरे एवढे प्लॅनिंग (कारस्थान) रचतोस, नि साधी सिगरेट तुला पेटेना? थांब मी लावतो काडी!' झाले, प्रवेश सुरळीत पुढे गेला.

चित्रपटात नामांकित नट बावरले; पण दिनकर कामण्णा तिथेही सराइतासारखे वावरले, 'माझी लाडकी', 'नारदनारदी', 'पहिला पाळणा' असे त्यांचे अनेक बोलपट गाजले. ते जिथे गेले तिथे पैशाचा पाऊस पडला. अगदी अखेर अखेर 'राजाराम संगीत' गाजविली. लोंढ्यांनी गंधर्वथाटात 'राजाराम'ची स्थापना केली. ती कोसळण्याच्या अवस्थेत असता, 'दिनकर कामण्णा' ही संजीवनी लाभली. कर्जाच्या खाईत सापडलेली राजाराम संगीत मंडळी, लोंढे बंद करण्याच्या विचारात होते; पण केवळ दिनकर कामण्णांमुळे, सतत चार–

चार महिने भावबंधनाच्या, तुफान उत्पन्नाच्या खेळांनी कंपनीचे लाखा-दोन लाखाचे कर्ज तर फिटलेच; पण कंपनीही नव्या जोमाने उभी राहिली; शेवटी दिनकर कामण्णांनीच जगाच्या रंगभूमीवरून अखेरची एक्झिट (Exit) घेतली नि सारे संपले ! दिनकर गेला कामण्णा अमर झाला !

एका विनोदी नटाने आपल्या अभिनयसामर्थ्याने नाट्यसंस्थेचा गोवर्धनपर्वत पेलून धरल्याचे रंगभूमीच्या इतिहासातले हे एकमेव उदाहरण असावे !

❋ मामा आणि मामा ?

एक काळ असा होता की, नाटकमंडळ्यांतून लहान मुलांचा एक ताफाच्या ताफाच असे. कारण संगीत नाटकात नाच-गाण्याचे प्रस्थ होते. या देखण्या मुलांचा नाच-गाण्यासाठी उपयोग केला जाई. मग यातूनच पुढे चांगले स्त्रीपार्टी नट आपोआप निवडले जात. आवाज फुटलेल्या काही मुलांची अवस्था मोठी दयनीय होई. म्हणूनच गडकऱ्यांनी आपल्या नाटकात नाच-गाण्याला थारा दिला नाही. ही अशी खूप मुले कंपनीत असल्याने, नाच-गाण्याबरोबरच त्यांना थोडे फार शालेय शिक्षण देण्याचीही गरज असे. त्यासाठी खास मास्तरांची (आताचे-गुरुजी) नेमणूक होई. राम गणेश गडकरी यांची अशीच, मास्तर म्हणून किर्लोस्कर नाटक मंडळीत योजना झाली होती. म्हणूनच पुढे गडकऱ्यांचा उल्लेख गडकरीमास्तर किंवा नुसता मास्तर म्हणूनही होऊ लागला. नाटकांच्या संबंधात मास्तर म्हटले की, गडकरीच. नशीब की त्यांचा ' डोअरकीपर ' म्हणून उल्लेख होत नाही. कारण मास्तर काही काळ ' किर्लोस्कर 'चे डोअरकीपरही होते. आपल्या नाटकांनी रसिकांचे लोंढेच्या लोंढे, नाटकगृहात खेचून आणणारा, दारात प्रेक्षकांची गर्दी सतत सांभाळणारा (प्रेक्षकांच्या अभावी थिएटरचे दरवाजे बंद करण्याची पाळी येऊ न देणारा) थिएटर ओसंडून, भरून काढणारा, राम गणेश नावाचा महान डोअरकीपर होता ! रंगभूमी नेकीने सांभाळणारा ' गडकरी ' होता. अवघ्या मराठी रंगभूमीचा द्वारपाल नव्हे पालनदार होता !

गडकरी आठवले म्हणून मामा मागे पडले. हो, तर काय सांगत होतो, मामा नि मामा ! नाटकमंडळ्यातल्या मुलांना, कुणाशी कसे वागावे, अदबीने कसे बोलावे, हे वारंवार मालकमंडळी पढवीत. कंपनीतल्या मोठ्या माणसांना, आलेल्या पाहुण्यांना ' काका ' हाक मारावी ' मामा ' म्हणावे वगैरे. यातूनच पुढे नाटकमंडळ्यांतून मामांचे पेव फुटले. जनूमामा (जनुभाऊ निमकर) कोल्हटकरमामा, सानेमामा, शितूतमामा, पेंडसेमामा, सगळीकडे मामाच मामा ! या शिकवणीमुळे अनेकांचा नाटककंपनीत ' मामा ' होई. एकदा शिमग्याच्या

दिवसात पोस्त मागायला, 'स्वदेशहितचिंतक' नाटक मंडळींच्या बिऱ्हाडी एक भंगी आला. मुले बाहेर खेळत होती. त्यातला एक चुणचुणीत मुलगा धावत धावत आत गेला नि जनुभाऊंना म्हणाला, 'जनुमामा, जनुमामा, बाहेर भंगीमामा आलाय. त्याला पोस्त हवाय, झाला त्याचा मामा !

रंगभूमीच्या संदर्भात सर्व मामांत वरेरकरमामा, भा. वि. ऊर्फ मामा वरेरकर हे सर्वात अधिक प्रसिद्ध नाव ! ललितकलादर्शमध्ये तर मामांचे खूपच वर्चस्व होते. मामा ही केशवराव भोसल्यांची निवड होती. बापूंचे (बापूसाहेब पेंढारकर) ते दैवत होते. कवीच्या, नाटककाराच्या गादीवर मामांची स्थापना झाली होती. त्यांचे 'हाच मुलाचा बाप', 'संन्याशाचा संसार', 'सत्तेचे गुलाम' ही नाटके गाजत होती. त्यांच्या प्रयोगांचा उल्लेख कंपनीत मोठा मजेशीर होई. स्टेज-मॅनेजर जोशी यांना कुठल्या नाटकाचे किती प्रयोग झाले असे विचारले की ताडकन् सांगत, 'बाप' बारा. 'संसार' सोळा !

पूर्वी नाटककारांचा मुक्काम कंपनीतच असे. त्यामुळे त्यांच्या बोलण्या-चालण्याच्या तऱ्हा, लबकी बहुतेक नटवर्गाला पाठ होत. मग त्याच्या नकलासुद्धा होत. मामा वरेरकर बोलण्यात तसे निर्भीड, विनोदी नि थोडेसे फटकळ होते. पेंढारकरांनी त्यांची वसंत शांताराम देसाई यांच्याशी ओळख करून दिली. वसंतरावांनी तो प्रसंग सुरेख टिपला आहे. मामा म्हणाले, 'आताच हेडमास्तरच्या तावडीतून सुटलो !' बापूंनी खुलासा केला, 'वसंतराव head-master म्हणजे न्हावी हं ! विडीची राख टाकण्याच्या डबड्याला (ash-tray) मामा म्युनिसिपालटी म्हणत. विल्सन कॉलेजचा उल्लेख डब्ल्यू. सी. म्हणून करीत. आपल्या नावात आपण डबल एम. ए. आहोत. (MAMA-मामा) असे गंमतीने सांगत !

एक गोष्ट खरी मामा लेखनावर जगले. 'सत्तेचे गुलाम' रंगभूमीवर आले नि मामांनी पोस्टाची नोकरी सोडली. मामांनी जवळजवळ चाळीस-बेचाळीस नाटके लिहिली. दुर्दैवाने आज मात्र त्यातले एकही नाटक रंगभूमीवर नाही ! कुंजविहारी, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार, सत्तेचे गुलाम, सोन्याचा कळस, अ-पूर्वबंगाल, अशी काही नाटके कालानुरूप खूप गाजली. मामांच्या लेखणीचा चौफेर संचार होता. नाटके, कादंबऱ्या, कथा, रहस्यकथा, अनुवाद असे त्यांनी विपुल लेखन केले. सारे मानसन्मान त्यांना प्राप्त झाले. नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद, संगीत नाटक अकादमीचा सन्मान, पद्मभूषणकिताब, अखिल भारतीय कीर्ति संपादन केलेले नि दिल्लीत स्थायिक झालेले एकमेव मराठी नाटककार म्हणजे-मामा वरेरकर !पण काय असेल ते असो, मामांचे नाव निघाले की आधी विषय निघतो तो त्यांची थाप नि विडी !

❋ नशा अभिनेत्याची !

कलावंत हा समाजाचा कौतुकाचा विषय असतो. त्याच्याविषयी रसिकांना प्रेम असते. एक प्रकारची आपुलकी वाटते, म्हणूनच त्याच्याविषयी बरेवाईट कानावर आले की खटकते. कधीकधी रागही येतो. तो आपल्या मर्जीतूनही उतरतो. हे सगळे घडते, तेव्हा परिचय तर राहोच पण त्या कलाकाराशी आपली तोंडओळखसुद्धा नसते. पण तशी गरजही नसते. कारण आपली ओळख असते ती त्याच्या मुखवट्याशी. त्याने रंगविलेल्या भूमिकांशी. त्याच्या बत्तीस फुटातल्या रंगमंचावरच्या करामतीशी. खरं म्हणजे, त्याच्याशी–चेहऱ्याशी, त्या व्यक्तीशी आपल्याला काहीही कर्तव्य नसते, आपण म्हणतोही. आपल्याला त्याच्याशी काय करायचंय? त्याच्या फक्त भूमिका पहाव्या, बस! पण तसे घडत नाही.

त्याचे कोणत्या नटीशी सूत आहे! तो आपल्या पत्नीला कसे वागवितो? सिगरेटस फार ओढतो का? मद्य घेतो का? घरी गेलो तर भेटतो, बोलतो का? का शिष्ट आहे? असे अनेक विषय आपण मोठ्या चवीने चघळीत असतो. कला-क्षेत्रात दारूची कीर्ती इतकी पसरली आहे की एखादा गुणी प्रामाणिक कलाकार खरोखरच काही अन्य कारणाने नाटकाच्या प्रयोगाला उपस्थित होऊ शकला नाही तर लोक लगेच म्हणतात 'पडला असेल पिऊन कुठे तरी!' याचा अर्थ इतकाच की कलावंत हा सतत लोकांसमोर असतो नि नकळत त्याचे नि प्रेक्षकांचे एक अतूट नाते जडते. जवळीक होते. म्हणूनच त्याचे कौतुकही होते नि त्याच्या-वर टीकाही होते. नाही तर समाजात दारू पिणारे शालशिष्ट काय थोडे आहेत?

तसं म्हटलं, तर आपले अनेक कलाकार व्यसनी होते; पण ज्यांचे व्यसन कलेच्या आड आले नाही, त्याचे समाजाने अपार कौतुक केले; पण व्यसन जेव्हा कलेला अडसर घालते, कलेवर कुरघोडी करते, तेव्हा तो कलावंत मर्जीतून उतरतो. व्यवसायातून बाजूला फेकला जातो. मा. नरेश, अगदी अलीकडचा स्त्रीपार्टी कलावंत. मी मी म्हणणाऱ्यांनी तोंडात बोटं घालावी असा तोलामोलाचा कलाकार! पनवेलला एकदा 'संशयकल्लोळ'चा प्रयोग होता. अर्थातच मा. नरेश होते–रेवती नि मा. दामले– (नूतन पेंढारकर) अश्विनशेट! पण दोन अंक होईपर्यंत मा. नरेश इतकी प्यायला (किंवा पाजली म्हणा, कारण आपल्या आवडत्या नटावर असले प्रेम करणारे गुलहौशी लोक असतात) की त्याला धड उभे राहवेना की तोंडातून शब्द फुटेना! अखेर दामले रेवती झाले (अश्विनशेटची रेवती झाली) नि नाटक ओढून काढले. हा नटाच्या नशेचा प्रताप!

❋ नशा अभिनयाची !

हो हो, नशा अभिनयाचीही! अभिनयाची नशा चढते. कैफ येतो. इथे

फक्त जागा वेगळ्या, अर्थ वेगळा, आशय वेगळा. गुंगी येते, कैफ चढतो, तो प्रेक्षकांना ! नारायणराव बालगंधर्वांनी नाही रसिकांना बर्षों वर्षं आपल्या शंभर नंबरी रूप-गान–अभिनयाने गुंगवून ठेवले ? इतकेच काय, इथे कलावंत गेला, तरी त्याच्या अभिनयाची भूल, गोड गुंगी उतरत नाही. गणपतराव जोशी, भागवत, दाते, कोल्हटकर, फाटक किती किती म्हणून नावं सांगावी ? मा. नरेशसुद्धा, हीच जातकुळी सांगणारा ! मा. नरेशची रंगमंचावरची हालचाल म्हणजे नागिणीची सळसळ ! त्याच्या वाटणीला फारशा नव्या भूमिका आल्या नाहीत; पण जुन्यांचे त्याने सोने केले. कुठल्याही भूमिकेत कुठेच कमी पडला नाही. लीला (प्रेमसंन्यास), लतिका (भावबंधन), कालिंदी (पुण्यप्रभाव), मल्लिका (हॅम्लेट), शिवांगी (राजसंन्यास) शिवाय सुभद्रा, भामिनी, रेवती, सिंधू, वसंतसेना या सगळ्याच वेगवेगळ्या ढंगांच्या भूमिकांना त्यांनी पुरेपूर न्याय दिला. जुन्या मंडळींना बालगंधर्व, दीनानाथांच्या आठवणीचा आनंद दिला. मा. नरेशचा गुणविशेष म्हणजे स्त्रिया रंगभूमीवर आल्यावरसुद्धा त्यांच्याबरोबर स्त्री भूमिका केल्या (सुभद्रा–मा. नरेश. रुक्मिणी–विमल पटवर्धन इत्यादि अनेक)

मा. नरेशच्या ' कालिंदी 'चं कौतुक नाही असा एकही प्रेक्षक नाही ! १९४५ सालची गोष्ट. बेळगायला शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सव होता. त्यात ' पुण्यप्रभाव 'चा प्रयोग होता. नरेश ' कालिंदी ' करणार होता; पण त्या दिवशी दुपारी मद्यपान करून, त्याने जेवणाच्या वेळी गोंधळ केला. भालचंद्र पेंढारकर प्रोग्रॅम-सेक्रेटरी होते. अशा स्थितीत त्याला कामाला उभे राहू द्यायचे नाही असेच त्यांच्या मनाने घेतले होते; पण योग असा, संध्याकाळी शुचिर्भूत होऊन नरेश थिएटरवर आला. पेंढारकरांनाही तेच हवे होते. त्या रात्री नरेशने अशी कालिंदी उभी केली की, त्याला तोड नाही ! त्याची कालिंदी पाहून, भारावलेले पेंढारकर लिहितात, ' ह्या कलाकाराच्या जवळपासही आपण पोचू शकत नाही. धावत धावत जावं आणि नरेशच्या पायावर डोकं ठेवावं ! हा नरेश नाही–गडकरीमास्तरांना कालिंदीची व्यक्तिरेखा उभी करताना ज्या प्रतिभेचा स्पर्श झाला असेल तीच ती प्रतिभा आता रंगभूमीवर जड स्वरूप घेऊन कालिंदी होऊन वावरते आहे. सकाळी नशापान करून ज्या बेहोष अवस्थेत नरेश भांडत होता, ती ' नशा ' ती बेहोशी त्याच्यापासून हजारो कोसांवर होती. आता जी नशा होती, ती शुद्ध स्वरूपाची, ब्रह्मानंदाची नशा होती... ही बेहोशी तुझ्या-इतकीच आम्हाला चढवलीस. मग नरेश, अरे तुला त्या तसल्या नशेची काय गरज आहे रे !' रसिकहो, ही नशा अभिनयाची !

❀ मी गहाण राहीन !

शंकरराव मुजुमदार हे मराठी नाट्यसृष्टीतले एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व !

रंगभूमीचा किमान पन्नास वर्षांचा इतिहास त्यांचे नाव न घेता लिहिताच येणार नाही ! १८८० ते रूपसुंदर 'शकुंतला' म्हणूजे रंगभूमीवर आले. मग रुक्मिणी (सौभद्र) त्यांच्या नावावर जमा झाली. गंमत अशी की, त्यांना गाता येत नसूनही त्यांनी या भूमिका सर्वांगसुंदर वठविल्या. पुढे भाऊराव कोल्हटकर आल्यावर शकुंतला गाती झाली; पण रुक्मिणी मात्र आजतागायत तशीच्या तशीच– शंकररावांसारखीच स्वरूपगर्वा राहिली ! नट म्हणून शंकरराव पडद्याआड लवकर गेले; पण 'किर्लोस्कर संगीत मंडळी 'चे मालक म्हणून त्यांची कारकीर्द दीर्घकाळ गाजली. शंकरराव मोठे कल्पक नि कर्तबगार होते, 'रंग-भूमी' मासिक त्यांनीच सुरू केले. नाटकांचे नांदते घर किर्लोस्कर थिएटर (आताचे वसंत टॉकीज) त्यांच्याच कर्तबगारीने उभारले गेले ! त्यांचा सर्वत्र दबदबा नि दरारा असे. बोडस, बालगंधर्व, मा. दीनानाथ आदी सर्व कलावंत त्यांना भिऊन असत. (हे सर्व कलाकार आधी किर्लोस्कर कंपनीचेच.) गडकरी तर त्यांना फारच भीत असत. कदाचित शंकरराव मालक असताना ते डोअर-कीपर होते म्हणून असेल ! गडकरी त्यांना पितृस्थानी मानीत. गडकरी विडी-बहादर, पण नानांपुढे (शंकरराव) चुकूनसुद्धा कधी बिडी ओढीत नसत ! गडकऱ्यांचे लेखनगुण अचूक हेरून शंकररावांनी ते फुलविले त्यांना लेखन प्रवृत्त केले. रंगभूमी मासिकात ते लिहू लागले.

गडकरी किर्लोस्कर कंपनीसाठी 'पुण्यप्रभाव' लिहीत होते, तेव्हा तर खूपच गंमत होई. नाटकमंडळीच्या बिऱ्हाडी गडकरी आपल्या मित्रमंडळीत गप्पा मारीत असता, 'काय गडकरी, कुठपर्यंत आलंय ?' असा दुरून शंकररावांचा आवाज आला की, गडकरी थंडी वाजत असल्याचे सोंग करून तोंडावर पांघरूण घेऊन झोपून जात ! शंकरराव निघून गेले की, पुन्हा त्यांच्या गप्पा रंगात येत. शंकररावांना त्यांची ही क्लृप्ति माहीत होती. त्यांचा हेतू त्यांना लिहिते करणे एवढाच असे.

पण पुढे पुढे शंकररावांकडून गडकऱ्यांची कळत न कळत हेळसांड होऊ लागली. गडकऱ्यांनी पाच–दहा रुपये खर्चाला मागितले, तरी ते चालढकल करीत. इतकेच काय एकदा रागारागाने, गडकऱ्यांनी विड्यांसाठी एक आणा मागितला, त्यावर काहीही न बोलता, मस्खपणे ते एवढेच म्हणाले, कोण आहे रे तिकडे, गडकऱ्यांच्या खोलीत एक शंभर विड्यांचं बंडल नेऊन ठेव !' सहाजिकच गडकऱ्यांना तो अपमान वाटला.

गडकऱ्यांना 'किर्लोस्कर' मंडळीचा जाज्वल्य अभिमान ! बालगंधर्व, बोडस, टेंबे निघून गेले, तरी किर्लोस्कर कंपनी त्याच थाटात चालली पाहिजे, याच ईर्षेने त्यांनी 'पुण्यप्रभाव' ल्याहायला घेतले होते. ते सदैव 'किर्लोस्कर' चीच बाजू घेत; पण शंकररावांकडून, आपल्या नानांकडून मिळणाऱ्या विचित्र

वागणुकीमुळे ते बिथरून गेले होते. त्यांनी पुण्यप्रभावाच्या लेखनापोटी, कंपनीकडून काही रक्कम उचलली होती; पण नाटक लिहून होईना म्हणून शंकररावांनी तगादा लावला, तेव्हा गडकरी रागाच्याभरात म्हणाले, 'माझी लहर लागेल तेव्हा लिहीन, तुम्हाला धीर नसेल तर पैसे परत करीन!' शंकरराव पक्के व्यवहारी. ते लगेच म्हणाले, 'करा पैसे परत!' पण गडकऱ्यांजवळ पैसे कुठे होते? तरी तिरमिरीत म्हणाले, 'गहाण राहीन नि पैसे परत करीन!' खिशात पैसे नसले की, गहाण रहाण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात अनेकदा येई. या वेळी मात्र ते रागाने कंपनी सोडून गोव्याहून निघाले ते मालवणला मामा वरेरकरांकडे गेले. मामांना सर्व हकीगत सांगितली; पण इथे एकादशीच्या घरी शिवरात्र पाहुणी अशातली गत! तरी पण मामांनी आपल्या मित्रांकडून पैसे घेऊन मास्तरांना कर्जाऊ दिले नि गरज भागविली. मास्तरांनी कागद लिहून दिला तो असा --

'मी राम गणेश गडकरी, रहाणार पुणे, हल्ली मुक्काम मालवण, रा. रा. भार्गव विठ्ठल वरेरकर, रहाणार मालवण यांस लिहून देतो की, आपणाकडून आज तारीख १, माहे मे १९१४ रोजी माझ्या अडचणीकरिता (शंकरराव मुजुमदार यांस देण्याकरिता) १२० अक्षरी एकशेवीस रुपये एक महिन्याचे कराराने घेत आहे. ते एक महिन्याने, शेकडा चार टक्केप्रमाणे पोचते करीन. तारीख १ मे, १९१४.'

साक्ष– महादेव गोपाळ डांगी दस्तुर खुद्द
राम गणेश गडकरी दस्तुर खुद्द.

या सर्व प्रकरणात, 'भारत नाटक मंडळी' सोडून 'किर्लोस्कर'मध्ये आलेल्या चिंतामणराव कोल्हटकरांचा जीव खालीवर होत होता. गडकऱ्यांच्या सहवासाच्या लोभानेच ते 'किर्लोस्कर'मध्ये दाखल झाले होते; पण त्याच वेळी मास्तर कंपनी सोडून नेमके बाहेर पडलेले! पुण्याच्या वास्तव्यात लिहून झालेले पुण्यप्रभाव त्यांनी वाचले होते. मास्तरांच्या तोंडून ऐकले होते. त्यावर त्यांचा जीव जडला होता; पण आता हे नाटक आपल्याला मिळणार नाही, म्हणून त्यांचा जीव हळहळत होता. ते सारखे शंकररावांच्या पाठीशी लकडा लावीत होते. 'मास्तरांची समजूत घाला; पण ते नाटक आपल्याकडे आणा!' त्यावर शंकरराव त्यांना एक दिवस म्हणाले, कोल्हटकर, तुम्ही बिलकुल काळजी करू नका. अहो, मास्तर आपल्याशिवाय दुसऱ्या कुणाला नाटक देणारच नाहीत. अहो, आपले ऋणानुबंधच तसे आहेत. किर्लोस्कर कंपनी हे मास्तरांचे दैवत आहे!'

अखेर शंकररावांचे व्यवहारी भविष्य नि अनुभवाचे बोल खरे ठरले. गडकऱ्यांचे नाटक किर्लोस्कर कंपनीकडेच आले. मास्तर स्वतः 'किर्लोस्कर'चे

कैवारी म्हणून भांडण विसरले. शंकरराव सुखावले. चिंतामणराव आनंदात न्हाऊन निघाले. असा हा ' पुण्यप्रभाव 'चा पुण्यप्रभाव !

⁂ कौतुक खुद्द गडकऱ्यांकडून

माणूस सुखाचे क्षण, मनाच्या साक्षीत अगदी जिवाभावाने जपून ठेवतो. दुःखाचे विसरायचे म्हटले तरी विसरता येत नाहीत. ते जिव्हारीचे बसलेले असतात. दुःखाची लक्तरे दडवून, सुखाची शालजोडी मिरविण्याची किमया माणसाला साधली आहे, म्हणूनच तो हसतो. नाही तर जन्मभर रडतच राहिला असता ! कलावंतांच्या जीवनात तर असे अनेक प्रसंग येतात. कारण त्यांचे भावविश्व मोठे हळवे असते.

नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकरांनी असे अनेक हळुवार क्षण आपल्या ' बहूरुपी 'त अचूक टिपले आहेत. अखेर गडकऱ्यांचे ' पुण्यप्रभाव ' किर्लोस्कर संगीत मंडळींकडेच आले, म्हणून चिंतामणरावांना खूप आनंद झाला. नाटक बसविण्याची जबाबदारी त्यांच्याकडेच आली; पण भूमिका वाटताना मात्र खुल्या दिलाने ' वृंदावन ' त्यांच्या वाटणीला येईना. ' किर्लोस्कर ' ही संगीतमंडळी ना, मग प्रमुख भूमिका गायक नटांनीच करायला हव्यात. चिंतामणराव गद्य नट ! नटवर्य कृष्णराव गोरे यांनी ती भूमिका करावी, असाही एक सूर होता. ते उत्तम गायक नट होते; पण त्यांचे वय नि शरीरयष्टी वृंदावनाच्या भूमिकेला साजेशी नाही, असे खुद्द गडकऱ्यांचे मत होते. शिवाय त्यांना दम्याचाही विकार होता. ' माझे मनोगत वाणीने नि अभिनयाने समर्थपणे व्यक्त करणारा नट हवा, तरच मी नाटक देईन ! असा नाटककारांचा हट्ट असल्याने नि त्यांनीच चिंतामणरावांचे नाव सांगितल्याने, ती भूमिका त्यांच्या वाटणीला आली.

चिंतामणरावांनी नाटक बसविण्यासाठी अपार कष्ट केले. पुण्यप्रभाव खूप गाजले. त्यांची वृंदावनाची भूमिका उत्तम झाली. तरीही कौतुक झाले ते गायक कलाकारांचे ! त्यांचे सत्कार झाले. त्यांच्या छातीवर सुवर्णपदके लटकली; पण पुण्यप्रभावच्या यशात सिंहाचा वाटा असूनही आपले कोल्हटकर उपेक्षित राहिले, हे गडकऱ्यांना खटकले. संगीत नाटक मंडळीत गद्यनटाविषयी असलेला सापत्नभाव त्यांना जाणवला. त्यांनी शंकरराव मुजुमदारांची (मालक) परवानगी घेऊन चिंतामणरावांचा सत्कार केला. मुंबईत पुण्यप्रभावाच्या प्रयोगाच्या वेळी, त्यावेळचे मुंबईचे पोलिसकमिशनर एडवर्डस यांच्या हस्ते चिंतामणरावांना सोन्याचे घड्याळ दिले. गडकऱ्यांच्या रोजनिशीत त्याची नोंद आहेच.

(presented a watch (Rs. 40) to Kolhatkar through Mr. Vincent The Police Suptd of Bombay)

पण चिंतामणराव नम्रपणे नमूद करतात, ' पुण्यप्रभाव 'च्या प्रयोगाचे वेळी

हातातील एक सोन्याचे घड्याळ देऊन माझा सत्कार केला. पुढील आयुष्यात माझे लहान-मोठे अनेक सत्कार झाले; पण गडकऱ्यांसारख्या नाटककाराने स्वतःच्या खर्चाने माझा केलेला रंगभूमीवरील सत्कार, म्हणजे माझ्याकडून रंगभूमीची सेवा घडत होती, तिचे अधिकारी माणसाकडून झालेले कौतुक ! जे मला पुढील आयुष्यात मार्गदर्शक, प्रोत्साहनपर असेच झाले.'

गडकऱ्यांची समृद्ध शब्दकला वाणीवर चढविण्याचे भाग्य लाभलेले अनेक नट होते नि आजही आहेत; पण त्यांचा पाच नाटकांचे पंचायतन प्रमुख भूमिकात पूजण्याचे भाग्य चिंतामणरावांना लाभले. (वृंदावन, घनःश्याम, साबाजी या तर त्यांच्या ओरिजनल भूमिका. मग सुधाकर नि कमलाकर साकार केले)

नानासाहेब फाटक, परशुरामपंत सामंत, श्री. जोगळेकर, मा. दत्ताराम, जयराम शिलेदार, गोपाळ बकरे अशा काही गुणवंतांनाही गडकऱ्यांच्या सर्व नाटकांत प्रमुख भूमिकात उभे राहण्याचे भाग्य लाभले असण्याची शक्यता आहे. असे आणखीही काही थोर कलाकार असतील; पण मला आवर्जून आठवण येते, ती श्री. वसंतराव शिंदे नि मा. नरेश यांची. वसंत शिंदे यांनी गोकुळ, कामण्णा, तळीराम, नुपूर नि जिवाजी हे गडकऱ्यांचे सर्व विनोदवीर आपल्या अभिनयचातुर्याने गाजविले आहेत. मा. नरेश तर असा भाग्यवान की गडकऱ्यांच्या पाचही नायिका (लीला, लतिका, कालिंदी नि वसुंधरा, शिवांगी, सिंधू) आपल्या अभिजात अभिनयाने संपन्न करण्याचे सौभाग्य त्याला लाभले. काही भूमिकात तर तो पूर्वसूरींच्या एक पाऊल पुढे गेला असे म्हटले तरी चालेल. गडकऱ्यांच्या नाटकांची पुण्याई पदरी असणारे कलावंत खरंच भाग्यवान !

❋ रसिकते, तू धन्य आहेस !

खरं म्हणजे 'बलवंत संगीत मंडळी'च्या स्थापनेपासून गडकरी तिचे पाठीराखे होते. त्यांच्याच जिवावर चिंतामणराव नि मा. दीनानाथ यांनी हे धाडस केले होते. 'बलवंत संगीत मंडळी' हे नावसुद्धा त्यांनीच दिले. त्याआधी त्यांनी 'साहित्य संगीत मंडळी' हे नाव सुचविले होते. 'श्रीसरस्वती-लक्ष्मी' भेटीच्या दर्शनी पडद्यावरच्या चित्राची कल्पना त्यांचीच ! इतकंच काय, बलवंत (लोकमान्य टिळकांचे नाव) या नावामुळे कंपनीवर सरकारी रोष होऊ नये म्हणून त्या दर्शनी पडद्यावर संगीत नाटकाचे कुलगुरु अण्णासाहेब किर्लोस्कर (कारण तेही बलवंतच !) यांचेही एका बाजूला चित्र रेखाटण्यात आले.

दोन कलावंतांच्या आशीर्वादाने कंपनी सुरू झाली. गडकरी 'भावबंधन' लिहीत होते. आधी त्यांचेच 'राजसंन्यास' रंगभूमीवर आणण्याचा मानस होता; पण राजसंन्यासला त्या काळचे शिवशाहीचे शेल्यापागोट्याचे नि जिरेटोपाचे जरतारी वातावरण उभे करणे आवश्यक होते. कंपनीची तर नुकतीच

सुरुवात होती. इतके भांडवल आणणार कोठून ? म्हणून राजसंन्यास बाजूला सारले; पण ते पुढे अपुरे राहिले, ते कायमचेच ! अगदी नेसत्या कपड्यावर उभे रहाता येईल, असे ' भावबंधन ' त्यांनी हाती घेतले; पण दुर्दैव असे की, पुढे ' बलवंत 'ची कामधेनू ठरलेल हे नाटक रंगभूमीवर येण्याआधीच, या जगाचे भावबंध तोडून गडकरी देवाघरी गेले.

अखेर १८ ऑक्टोबर १९१९ ला अकोला मुक्कामी भावबंधनचा पहिला प्रयोग झाला. तुम्हाला आश्चर्य वाटेल, हे अगदी घरगुती कपड्यातले नाटक असूनही ' घनःश्याम 'साठी एक चांगलासा सूट शिवता आला नाही. (शिवला तो बारा आणे वार कापडाचा !) ' लतिके 'ला हवा असलेला ओव्हरकोट विकत घेता आला नाही. मा. दीनानाथ (लतिका) त्या वेळी बायका वापरीत तशी लोकरीची सार्धा बंडी वापरीत.

अमरावतीला ' भावबंधन 'चा प्रयोग सुरू झाला होता. तिसऱ्या अंकातल्या तिसऱ्या प्रवेशात धनेश्वर मालतीशी लग्न करण्याचा विचार सोडून देतो, तसेच लतिकेला मोरेश्वरला न देण्याचा निश्चय करतो. लतिकेच्या मनासारखे होते. आपल्याबरोबर आपली जिवाभावाची मैत्रिण संकटातून सुटली, म्हणून तिच्या आनंदाला आकाश ठेंगणे होते. आपल्या प्रियकराला– प्रभाकरांना ही आनंदाची बातमी सांगायला तो अगदी उत्सुक असते. त्या प्रसंगात ती आपल्या वडलांना (धनेश्वर) विचारते, ' बाबा, मी ओव्हरकोट घालून जाऊ का ? नाही तर म्हणाल, लतिका थिल्लरच आहे.' त्यांनी होकार देताच ती आनंदाने बेहोश होते. ' यू आर व्हेरी काइंड, यू आर व्हेरी गुड, यू आर व्हेरी व्हेरी बॅड ' असे म्हणत वडलांच्या नाकाचा शेंडा किंचित ओढून ती पळत पळत जाऊ लागते. पुढचे पदही असेच नाचरे. द्रुतलयीत ' पद सुखी स्थलि या न जरा ठरे.' हा सारा सीन नि गाणे मा. दीनानाथ इतके अप्रतिम वठवीत, की या अश्राप आनंदी फुलपाखरासारख्या मुलीच्या अंगावर ओव्हरकोट नाही, हे समोर नाटक पहात प्रेक्षकात बसलेल्या तरुण रसिक मुलीला इतके लागले की, प्रवेश संपताच त्या मुलीने आपला गरम ओव्हरकोट, धावत जाऊन लतिकेला– मा. दीनानाथांना बहाल केला. याचे नाव रसिकता ! सुजनहो, त्या भगिनी कोण होत्या माहीत आहे ? पुढे बालशिक्षणतज्ज्ञ म्हणून नावलौकिक संपादलेल्या श्रीमती ताराबाई मोडक !

※ गडकरी खूष !

गडकरी हे अतिशय भावनाप्रधान होते. त्यांच्या गुरुभक्तीला तोड नाही मित्रप्रेमाला जोड नाही. लोकमान्य लंडनला जायला निघाले, त्या वेळी ' लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद ' या आपल्या कवितेत, मागितले

काय तर—

एक सांगणे एक मागणे ते लाखवार
मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानी तलवार.

'एकच प्याला'त टिळक—आगरकर यांच्याविषयी आदर व्यक्त करताना 'रामलाल'च्या तोंडून ते म्हणतात, 'आगरकर आणखी टिळक या महात्म्यांचा परस्पर विरोध म्हणजे आकाशातल्या नक्षत्रांच्या शर्यती ! तुमच्या-आमच्यासारख्या पामरांनी भूलोकावरून त्यांच्याकडे पहावं आणि त्यांच्या तेजाने आपला मार्ग शोधून काढावा. शुचिर्भूत ब्राह्मणांनीसुद्धा संध्येच्या चोवीस नावांबरोबरच टिळक--आगरकर यांची नावं भरतीला घालावी !'

मुंबईच्या मुक्कामात, गडकरी काही कामासाठी, 'पूनामेल'वर व्ही. टी. स्टेशनवर गेले होते. त्याच गाडीने नामदार गोपाळ कृष्ण गोखले हेही पुण्याला जायला निघाले होते. कोणी तरी गडकऱ्यांचा गोखल्यांशी परिचय करून दिला. गोपाळ कृष्णांनी त्यांच्याशी हस्तांदोलन केले. झालं, मास्तर आनंदात न्हाऊन निघाले. कारण काय, तर गोखल्यांनी आपल्याशी हस्तांदोलन केले ! पुढे कित्येक दिवस मास्तर त्याच आनंदात होते. मला वाटतं, त्यांना चार हात असते तर तो एक हस्तांदोलनाचा हात म्हणून त्यांनी जीवे-भावे जपला असता ! इतका टिळक, आगरकर, गोखले या मोठ्या माणसांविषयी त्यांना आदर होता !

❋ नाटकी मरण

जीवन मरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या तत्त्वज्ञानाचा उलगडा नाटकात चटकन् होतो. कारण नाटकात मेलेला माणूस जीवंतही असतो. बेबंदशाही नाटकात हालहाल करून मारलेला संभाजी दुसऱ्या दिवशीच्या प्रयोगात दिसतोच. इतकेच काय, लागोपाठ दोन खेळ असले, तर संध्याकाळी मेलेला संभाजी रात्रीच्या प्रयोगात वाक्या-वाक्याला टाळ्या घेत असतो. कालच्या 'एकच प्याला'तला सिंधू-सुधाकराचा मृत्यू प्रेक्षकांना आसवं गाळायला लावतो हे खरे ! पण तीच सिंधू दुसऱ्या दिवशी स्वयंवरात रुक्मिणी म्हणून 'दादा ते आले ना ?' या चार शब्दानी प्रेक्षकांना मोहवून टाकीत असते.

गडकऱ्यांना मृत्यूचे भयंकर आकर्षण. (म्हणूनच तर मृत्यूने त्यांना अवचित गाठले नाही ना ?) त्यांच्या प्रत्येक नाटकात दोन-तीन तरी मृत्यू आहेतच. भावबंधनातच फक्त स्मशानावर भागले आहे. मरण सोपे नाही असे आपण सर्वत्र म्हणतो; पण नाटकात मरण ही फार कठीण गोष्ट आहे अहो, एक पात्र मरून पडल्यावर, दुसऱ्या पात्राची भाषणे चालू असतात. कधी गाणेही असते. (म्हणजे मरून पडलेल्या पात्राचे मरणच !) प्रदीर्घ स्वगत असते. इतका सारा वेळ गुपचुप पडून राहायचं म्हणजे साक्षात् मरणच नाही का ? अशात

चुकून खोकला आला, तर मरणाचं हसं व्हायला कितीसा वेळ लागणार ? आणि नाटकात काम करताना खरे मरण आलं तर ? अहो, ते सुद्धा या मराठी रंगभूमीवर घडले आहे !

'राजापूरकर नाटक मंडळी'चे तुकाराम हे पेटन्ट नाटक. हातखंडा खेळ. त्यांच्यासारखे तुकाराम कुणालाच जमले नाही. या नाटकाची अपूर्वाई अशी की, या नाटकाच्या उत्पन्नावर कंपनीचे मालक बाबाजीराव राणे यांनी कल्याणला तुकाराम नावाचे थिएटर बांधले; पण योग पहा कसा विचित्र. बाबाजीरावांचा मृत्यू त्याच नाटकात झाला ! प्रसंग असा की, शिवाजीराजांकडून तुकाराम महाराजांकडे नजराणा येतो. त्यात दाग-दागिने, उंची वस्त्रे असतात. बाबाजीराव त्या नाटकात तुकारामांच्या पत्नीचे—जिजाऊचे काम करीत असत. ती भेट पाहून जिजाऊ हर्षभरीत होते. बाबाजीराव तो प्रसंग फारच सुरेख रंगवीत असत. एक दिवस, ते त्या प्रसंगात रंगले असता-हसता हसताच त्यांना मृत्यूने गाठले नि ते क्षणात स्टेजवरच कोलमडले. (१९१३)

भाऊराव जाधव हे एक गुणी गद्य नट. वृंदावन, विक्रांत, शहाजी या भूमिका ते करीत असत. शेवटी ते नानासाहेब चापेकरांच्या कंपनीत होते. खामगाव मुक्कामी कंपनीचा 'शहा शिवाजी' खेळ चालू असताच, त्यांच्या मेंदूत कळ येऊन ते कोसळले ते कायमचे. 'शहाजी'च्या वेशभूषेतच ते गेले.

श्रीमती बाळाबाई पेडणेकर या मो. ग. रांगणेकर यांच्या 'नाट्यनिकेतन'च्या कलावंत. कोल्हापूरला 'माझे घर' नाटक काम करीत असता हृदय विकाराचा झटका येऊन गेल्या.

नागेश जोशी, ज्याला जोड नाही असा गुणी नट. सहजता (Ease) हा त्यांच्या अभिनयाचा प्राण !' 'बालमोहन' तर त्यांनी गाजविलीच; पण 'अवधूत' (लग्नाची बेडी) ते बरोबरच घेऊन गेले. धुमाळ—गोकर्ण नि नागेश—अवधूत, दृष्ट लागावी, अशी विनोदी जोडी ! नागेश गेल्यावर धुमाळांनी 'गोकर्ण' कायमचा सोडून दिला. जणू नागेशबरोबरच 'गोकर्णाला' तिलांजलि दिली ! व्यंकटेश माडगूळकरांच्या 'कुणाचा कुणाला मेळ नाही.' मधला त्यांनी उभा केलेला 'नामा परीट' लाजबाबच ! नागेश जोशी गेले नि 'मेळ' पुन्हा जमला नाही. त्यांची विशेषत्वाने आठवण उरली आहे ती 'देवमाणूस'चे कर्ते म्हणून 'आता छोटा गंधर्व गात आहेत, नागेश जोशीलिखित, देवमाणूस या नाटकातले गाणे— 'चांद माझा हा हासरा' असे रेडिओवरचे निवेदन ऐकले की, त्या गाण्याबरोबर 'कलाविकास'चे देवमाणूस डोळ्यांपुढे दिसू लागते. ते नागेश जोशी गेले तेही असेच नाटकात काम करीत असताना या पुण्यात ! आचार्य अत्रे यांच्या 'पाणिग्रहण'मध्ये 'घोडके'च्या भूमिकेत, लोकांना हसविता हसविता डोळ्यात कायमचे अश्रू ठेवून गेले. (१९५८)

शंकर घाणेकर या अत्यंत लोकप्रिय विनोदी नटाची अखेर रंगमंचावरच झाली. " वरून कीर्तन आणि आतून तमाशा " या नाटकात, आपल्या जन्मगावी काम करीत असताना त्यांना अचानक मृत्यू आला.

तसेच कविवर्य शिरवाडकरांच्या " नटसम्राट "मध्ये " विठोबा "ची भूमिका करीत असताना बाबुराव सावंत एकाएकी निधन पावले. नाशिकच्या " लोकहितवादी " या संस्थेचे ते प्राण होते. शिरवाडकरांची अनेक नाटके त्यांनी बसविली होती. शिरवाडकरांचा त्यांच्यावर विशेष लोभ होता. त्यांनी आपले नटसम्राट नाटक कै. बाबुरावांच्या स्मृतिस अर्पण केले आहे.

❋ शास्त्रीबुवांची समई !

' शिवसंभव ' कर्ते वासुदेवशास्त्री खरे हे उत्तम शिक्षक, इतिहाससंशोधक नि व्युत्पन्न विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. ' महाराष्ट्र नाटक मंडळीने ' रंगभूमीवर आणलेले त्यांचे शिवसंभव नाटक खूपच गाजले. बलवंत संगीत मंडळीसाठी ते ' उग्रमंगल ' नाटक लिहित होते. त्या काळात चिंतामणराव कोल्हटकर नि मा. दीनानाथ यांच्यावर त्यांचा लोभ जडला. या दोघांनाही शास्त्रीबुवांविषयी अत्यंत आदर होता. शास्त्रीबुवा कंपनीतून घरी मिरजेस जायला निघाले, तेव्हा ' बलवंत ' च्या सर्व कलाकारांनी त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. शास्त्रीबुवा जसे विद्वान होते, मायाळू होते तसे थोडे विक्षिप्तही होते.

शास्त्रीबुवांची मंडळी (कुटुंब) माहेरी जाणार होती. शास्त्रीबुवांचे सर्व हवे–नको पाहून त्या गेल्या. जाताना, आपल्या यजमानांना लागतात, म्हणून समईच्या वातीसुद्धा भरपूर करून ठेवल्या होत्या त्यांनी. शास्त्रीबुवा लेखन–वाचन समईच्या प्रकाशात करीत असत. काही कारणामुळे त्यांच्या कुटुंबाचे येणे लांबले. वाती संपल्या. शास्त्रीबुवा रोज म्हणत, ' वाती आणायला हव्यात ' पण मग विसरून जात. रात्र झाली की, त्यांना आठवण येई. त्यांना लेखन–वाचनाशिवाय चैनच पडत नसे. मग ते बैठकीच्या सतरंजीचे दोरे काढून समईत वाती म्हणून वापरीत. काही दिवसांनी त्यांचे कुटुंब परत आले. त्यांनी पाहिले तर, सतरंजीच्या दशा काढून, तिची दशा करून टाकली होती ! ती पाहून त्या म्हणाल्या, ' हे काय ? ' त्यावर शास्त्रीबुवा नुसते हसले नि म्हणाले, ' तुम्हाला काय वाटलं, फावल्या वेळात मी वाती वळीत बसावे, होती सतरंजी हाताशी, भागलं ! '

त्यांच्या कुटुंबाला त्यांचा छांदिष्टपणा पाठ होता. कारण ते लिहा–वाचायला बसले की, त्यांना कशाचेच भान राहात नसे. फाटक्या सतरंजीची घडी करीत त्याही ' बरं ' म्हणून नुसत्या हसल्या !

❋ नटांचे नाटककार !

मराठी रंगभूमीवर नट नि नाटककार यांची थोर परंपरा आहे. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी यांसारखे नाटककार नि गणपतराव जोशी, गणपतराव भागवत, भाऊराव कोल्हटकर, केशवराव भोसले, नारायणराव बालगंधर्व यांसारखे अनेक अग्रेसर थोर कलाकार आपली नावे अजरामर करून गेले आहेत. नावं तरी किती सांगावी ? खरेशास्त्री, केळकर, अप्पा टिपणीस, वरेरकर, वीर वामनराव जोशी (नाटककार) टिपणीस, पोतनीस, दाते, कोल्हटकर, बोडस, फाटक, मा. दीनानाथ, पेंढारकर. (असे अनेक कलावंत) या प्रत्येकाच्या नावाचा दीप, रंगभूमीच्या दीपमाळेवर आपापल्या तेजाने उजळत आहे. मागिलांनी उभारलेली नि उंचावलेली दीपमाळ, पुढिलांनी तेजस्वी नि समृद्ध केली आहे. नटेश्वराची पूजा अखंड चालू आहे.

नट-नाटककारांची अशी थोर परंपरा आहेच. पण नटाचा–नाटककार (नटांचे नाटककार) हा एक आपल्या रंगभूमीचा फार मोठा वारसा आहे. नट हा नाटककार झाला, तर नाटकाची, खेळाची, रंगत तो अधिक वाढवितो असा अनुभव आहे. कारण रंगभूमीचे बारकावे नि आडाखे त्यांच्या अंगवळणी पडलेले असतात. याचा अर्थ असा नाही की, सगळेच नटाचे नाटककार हे यशस्वी झाले आहेत पण त्याबरोबर हेही खरे की, त्यांची रंगभूमीवरची कामगिरी (Contribution) मोलाची आहे.

अहो, संगीत नाटकाचे कुलगुरु आपले अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा नट नि नाटककार म्हणून रंगमंचावर (शाकुंतल) एकदमच प्रवेश झाला. देवल आपल्या झुंजारराव नाटकात, 'झुंजारराव' म्हणूनच रंगभूमीवर आले. उगाच का आजही उत्तम नाट्यशिक्षक (तालीममास्तर) म्हणून त्यांच्या नावाचा कौतुकाने उल्लेख होतो ? पाटणकर (सत्यविजय) बाबाजीराव राणे (तुकाराम) हे नट–नाटककारच ! यांच्या नाटकमंडळ्यांची भिस्त यांच्याच नाटकांवर होती....

'महाराष्ट्र नाटक मंडळी' ही तर सुशिक्षितांची नाट्यसंस्था ! यातच यशवंत नारायण ऊर्फ अप्पा टिपणीस (शहा शिवाजी) वि. ह. औंधकर (बेबंदशाही), अण्णा कारखानीस (राजाचे बंड), ग. कृ. बोडस (झाशीची राणी) महाराष्ट्र नाटक मंडळीचाच वारसा घेऊन आलेले वि. ग. देशपांडे (उमाजी नाईक) ही मंडळी होती.

मग कोसळणाऱ्या रंगभूमीला सावरणाऱ्या अत्रे–रांगणेकरांचे युग सुरू झाले. याच काळात गिरणगावातल्या अनेक हौशी नटांनी लेखणी हाती घेतली नि नट–नाटककार झाले. अगदी पडत्या काळात रंगभूमी जगविण्याचे फार मोठे श्रेय गिरणगावातल्या मंडळींनाच द्यायला हवे. किंबहुना मराठी रंगभूमी, दामोदरहॉल

(परळ) इथेच जिवंत होती म्हणा ना ! १९४३ साली रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव झाला नि रंगभूमीच्या शिडात नवी हवा भरली गेली. (डॉ. अ. ना. भालेरावांनीच ती भरली असे म्हणणे योग्य.) मग शिरवाडकर (कुसुमाग्रज), काणेकर, कुलकर्णी, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, कोल्हटकर, कालेलकर, गोखले, खरे, पेंडसे, नवरे, दळवी, मतकरी असे नाटककार गाजले.

पण पु. ल. हे आधी नट, मग नाटककार. (तुझे आहे तुजपाशी) खऱ्या अर्थाने अत्यंत आदराने त्यांना बहु-रूपीच (Versatile) म्हणायला हवे.

नागेश जोशी (देवमाणूस), बबन प्रभू (झोपी गेलेला जागा झाला), बाळ कोल्हटकर (दुर्वांची जुडी), मधुकर तोरडमल (तरुण तुर्क), शरद तळवलकर (नाटक झाले जन्माचे) हो, आपले बाबुराव गोखले (करायला गेलो एक) असे अनेक गुणवंत नट-नाटककार म्हणून गाजले आहेत. आणखीही किती तरी नट-नाटककार असतील.

नट-नाटककार हा एक समृद्ध वारसा आहे नि तो अधिक समृद्ध होत आहे.

❋ 'राज्यसंन्यास'चे सौभाग्य ?

गडकऱ्यांचे राजसंन्यास हे त्यांच्या प्रतिभेचे कैलासलेणे ! अपुरे, अपूर्ण, अधुरे ! नि मला वाटते रसिकांचे अधिक लाडके. नाही तरी चंद्रापेक्षा चंद्रकोरीचेच कौतुक अधिक ! हे नाटक गडकऱ्यांच्या हयातीत रंगभूमीवर आले असते तर ? पण 'जर तर'ने प्रश्न थोडेच सुटतात ? त्यांची गाजलेली एकच प्याला, भावबंधन ही देखील पित्याच्या मृत्यूनंतरच रसिकांना वेड लावून गेली. राजसंन्यास मात्र अपुरेच राहिले !

हे नाटक उभे करायला खूप खर्च येणार, म्हणून मागे पडून राहिले होते. शिवाय अपूर्ण, इंदूर नरेश, तुकोजीराव होळकर यांनी 'बलवंत संगीत मंडळी'चे भावबंधन पाहिले नि ते एकदम खूष झाले. गडकऱ्यांच्या प्रतिभेने दिपून गेले ! 'या लेखकाची तुम्ही आणखी कोणती नाटके करता ?' म्हणून त्यांनी विचारले. चिंतामणरावांनी पुण्यप्रभाव नि एकच प्याला करतो म्हणून सांगितले. त्याबरोबरच 'राजसंन्यास'चे सूतोवाच करण्याची संधी घेतली. 'राजसंन्यास' हे संभाजीराजांच्या जीवनावरचे नाटक आहे. त्याची सजावट करणं आमच्या कुवतीच्या बाहेरचं आहे, म्हणून इतके दिवस पडून आहे. आपली आज्ञा होत असेल तर... ? 'करा, जरूर करा' म्हणून महाराजांनी आज्ञा दिली. मास्तरांचे नाटक रंगभूमीवर येणार म्हणून 'बलवंत'ची कलाकारमंडळी आनंदून गेली. चिंतामणराव, मा. दीनानाथ आनंदात न्हाऊन निघाले !

महाराजांनी मदत केल्याने महिना-दीड महिन्यात राजसंन्यास दरबारी थाटात रंगभूमीवर आले. साहजिकच प्रयोग महाराजांसाठी असल्याने,

निमंत्रितांसाठीच होता. दर्शनी पडद्याच्या दोन्ही बाजूंच्या विंगजना, मोठ्या सूचकतेने जरीपटका नि भगव्या ध्वजाची छोटी छोटी निशाणे लावली होती. थिएटरमध्ये येता येता ती महाराजांच्या दृष्टीस पडली. ते लगेच थांबले नि त्यांनी ध्वजाला वंदन केले. प्रयोग अतिसुरेख झाला. नाटक प्रेक्षकांना त्या ऐतिहासिक काळातच घेऊन गेले.

मुंबईत कंपनीने 'राजसंन्यास'चे सकाळी प्रयोग सुरू केले. वेळ गैरसोयीची असूनही मुंबईकरांनी उस्फूर्त स्वागत केले. प्रत्येक प्रयोग 'हाउसफुल्ल' होता. मग अवघ्या महाराष्ट्रात नाटकाचे खूप कौतुक झाले. 'टाइम्स ऑफ इंडिया' सारख्या पत्राने त्याचे कौतुक केले. नाटकाला जाताना 'डोळे पुसायला एक रुमाल पुरणार नाही' म्हणूनही सुचवले. मॅटिनी (Matinee) या शब्दाची फोड करताना विनोदाने लिहिले की, मॅटिनी म्हणजे सकाळ. कारण त्या वेळी दुपारच्या प्रयोगांनाही मॅटिनीच म्हणत असत. राजसंन्यासाचे जे सध्या प्रयोग होत आहेत, ते खऱ्या अर्थाने 'मॅटिनी शो' होत. तुम्हाला आश्चर्य वाटेल, नाटकाचे सकाळचे खेळ करण्याची सुरुवात 'राजसंन्यास' नाटकानेच झाली. गडकरी हे 'बलवंत'चे दैवत. प्रत्येक गावी मोठ्या भक्तिभावाने कंपनी प्रयोग करीत असे.

❋ चोख व्यवहार !

एक काळ मराठी रंगभूमी ऐनवैभवात होती. तो काळ मराठी रंगभूमीचे 'वैभवपर्व', 'सुवर्णयुग' म्हणून मोठ्या कौतुकाने उल्लेखिला जातो. गंधर्व, ललितकलादर्श, बलवंत अशा मातब्बर नाट्यसंस्था, नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे, तर महाराष्ट्राबाहेर बडोदा, ग्वाल्हेर, इंदूर, हैद्राबाद अशा परक्या मुलाखातही मोठ्या दिमाखाने दौरे करीत होत्या. आपल्या नाट्यप्रयोगांनी रसिकांना मोहून टाकीत होत्या; पण भरती आहे तेथे ओहोटी आहेच, या न्यायाने या नाटकमंडळ्यांची सद्दी संपली. कारणे काहीही असोत; पण त्या कोलमडल्या, अगदी पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या एवढे मात्र खरे !

या कंपन्यांच्या मालकांचे नि नटवर्गाचे अतोनात हाल झाले, मानहानी झाली, जप्त्या आल्या, सिनसिनेरी, सामान-सुमान गहाण पडले. ज्यांच्या एंट्रीला, नुसत्या दर्शनाला टाळी पडत असे, अशा थोर कलावंताना, सावकारांची तोंडे चुकविण्याची पाळी आली, कोसळत्या रंगभूमीच्या या दुर्दैवी व दुःखद पार्श्वभूमीवर काही बिचारी मालकमंडळींची आवर्जून आठवण येते.

पहिले कै. केशवराव भोसले. हे तर नाट्यव्यवसायातल्या प्रत्येक गोष्टीत जातीने लक्ष घालणारे. अति दूरदृष्टीचे. त्यांनी आपल्या मृत्युपत्राने संस्था नावावर केली ती बापूसाहेब पेंढारकर नि नानासाहेब चापेकरांच्या; आपल्या कुटुंबियांच्या

नावे नाही. शिवाय संस्था कशी, तर एक पैचेही कर्ज नसलेली. दहा–वीस हजारांचे सामान-सुमान (Property) असलेली, आपली चालती 'ललितकला-दर्श' बापू-नानांच्या हवाली केली !

दुसरी कै. बाबाजीराव राणे यांच्या राजापूरकर नाटक मंडळीची ! बाबाजीराव तर फार चतुर. भावभोळ्या प्रेक्षकांची नाडी अचूक ओळखून पौराणिक नाटकांचा प्रपंच मांडला. तुकाराम, पुंडलीक, दामाजी ही त्यांची पेटंट नाटके. त्यांची ही भक्तिरसात डुंबवून टाकणारी नाटके गडकरी मोठ्या आवडीने पहात. त्यांच्या तुकाराम नाटकाने अक्षरशः पैशाचा पाऊस पाडला ! नाटक-वाल्यांना हक्काचे घर हवे, म्हणून त्यांनी त्या पैशातून कल्याणला 'तुकाराम' थिएटर उभारले. बाबाजीरावांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या चिरंजीवांनी वडिलांचा कित्ता गिरवला; पण बोलपटांचा जमाना सुरू होऊन नाटकांची गर्दी आता ओसरत आहे हे पाहून कंपनी सुस्थितीत असतानाच व्यवस्थित बंद करण्याचा निर्णय घेतला. देण्याघेण्याचे सर्व व्यवहार उत्तम पार पाडले.

तिसरी कै. शंकरराव सरनाईक यांची 'यशवंत संगीत मंडळी.' या कंपनीची वाटचाल तर मखमलीच्या पायघड्यांवरून झाली. इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर यांनी शंकररावांना मोठ्या कौतुकाने बोलावून घेऊन, लाख-दीड लाख रुपये खर्चून दरबारी थाटात कंपनीची स्थापना केली. बालगंधर्वांच्या तोडीस तोड, अशी आपली संस्था झाली पाहिजे, ही मनीषा शंकररावांचीही होती. सवाईगंधर्व, कृष्णराव गोरे असे ख्यातनाम गायक नट जोडले होते. त्यांची स्वतःची 'सुभद्रा' (सौभद्र) बालगंधर्वांसारखी काही काळ गाजलीही होती; पण पुढे होळकरांनी कंपनीचा संबंध तोडला. तरीही शंकररावांनी नेकीने संस्था चालविली होती; पण बोलपटाचा जमाना आला. इतर कंपन्यांचे हाल त्यांनी पाहिले नि ठरविले की आता आपले दिवस राहिले नाहीत. त्यांनी 'यशवंत संगीत'ची सांगता केली. अखेरचा पडदा ओढला. असे सांगतात की सर्व मंडळींना एक महिन्याचा पगार नि घरापर्यंतचे गाडी–भाडे देऊन निरोप दिला !

मराठी रंगभूमीच्या इतिहासात केशवराव, बाबाजीराव, शंकरराव अशी माणसे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच !

❋ 'हाऊसफुल्ल'

१९३४ च्या ऑक्टोबरमध्ये, आचार्य अत्र्यांचे 'घराबाहेर' पुण्यात 'बालमोहन संगीत मंडळी' च्या रंगभूमीवर आले. १८३५ च्या जून महिन्यात त्याचे मुंबईच्या 'रॉयल ऑपेरा हाऊस'मध्ये धूमधडाक्यात प्रयोग सुरू झाले. त्याच दिवशी 'बालमोहन'च्या रंगभूमीवर मखमली पडदा झळकला ! खरं म्हणजे तो मराठी रंगभूमीचा पडझडीचा काळ. नाटकमंडळ्या धडाधड कोसळत होत्या;

पण दामुअण्णा जोश्यांची 'बालमोहन' एक युग निर्माण करीत होती. आचार्य अत्रे यांची समर्थ नि सिद्धहस्त लेखणी, बापू माने, (आता नटवर्य बापूराव माने) सौदागर (छोटा गंधर्व) आपटे, नागेश जोशी, जाधव यांसारखी तरुण गुणी नटमंडळी, नि अनंत हरि गद्रे यांची कलात्मक जाहिरात या त्रिवेणी संगमावर 'घराबाहेर' गाजत होते. 'रेकॉर्डब्रेकर घराबाहेर' 'घराबाहेर पहाण्यासाठी आज सारी मुंबई घराबाहेर' अशी खुमासदार (त्या काळात हं!) जाहिरात गद्रे करीत असत. याच मुक्कामात, मुंबई रेडिओस्टेशनवरून, रविवारी सकाळी ऑपेरा हाऊसमध्ये; चालू असलेल्या 'घरांबाहेर'चा प्रयोग प्रसारित (Broad cast) होण्याचा मान 'बालमोहन'ला मिळाला. प्रेक्षकांच्या नाटकावर नुसत्या उड्या पडू लागल्या. एका रविवारच्या खेळाची सर्व तिकिटे संपली. अनंदराव गद्रे यांनी 'हाऊसफुल्ल' असा एक बोर्ड लिहवून तो थिएटरवर झळकविला. त्या वेळेपासूनच 'हाऊसफुल्ल' हा शब्द प्रचारात आला. आता तर किती तरी नाटकांच्या वेळी, हार घातलेली 'हाऊसफुल्ल' पाटीच थिएटरच्या प्रवेशद्वाराशी प्रेक्षकांचे स्वागत करीत असते!

❋ पुण्याई

कलावंतही अखेर म्हातारा होतोच. त्याचा निवृत्तीचा काळ ठरला नसल्याने तो रंगभूमीवर उभा रहातो. अनेकांना परिस्थितीमुळे, केवळ पोटासाठी उभे रहाणे भाग पडते; तो कसा निवृत्त होणार? त्याला कुठे असते पेन्शन नि प्रॉव्हिडंट फंड ग्रॅच्युएटी? खरेच नसते. रंग उतरला की तो उघडा पडतो– अगदी सर्वार्थाने!

तरीही त्याने थांबायला हवे. कलेचे महावस्त्र विटल्यावर, कलेची कवचकुंडले गळून पडल्यावर त्याने थांबायला हवे. नाही तर वर्षानुवर्ष रसिकांनी मनोमनी पुजलेल्या त्या कलाकाराच्या भूमिका, भंगलेल्या अवस्थेत पहाण्याचे नशिबी येते. ज्यांनी त्यांच्या त्याच भूमिका, उत्तम स्थितीत पाहिलेल्या असतात ती मंडळी त्या आठवणीच्या चष्म्यातून त्यातले सुंदर क्षण टिपीत असतात. मनाचे कसे तरी समाधान करीत असतात; पण नव्या पिढीचे काय? जे सुंदर म्हणून आम्ही त्यांना दाखवायला न्यावे ते कुरूप म्हणून मुलांनी नाक मुरडावे, अशी स्थिती निर्माण होते आणि यात त्या कलाकारांना तरी आनंद वाटतो काय? नाही खचित नाही. उलट वेदनाच होत असतात; आता काळ बदलत आहे. नाट्य परिषद, शासन, सामाजिक संस्था कलावंतांना मदतीचा हात देत आहेत. फुल ना फुलाची पाकळी त्यांच्या पदरी पडत आहे. कलाकारही आता जागरुक झाले आहेत. 'चिमणीचं घर मेणाचं' याचे मर्म त्यांनी ओळखले आहे.

बालगंधर्व, नानासाहेब फाटक यांचे अखेरच्या काळातले रंगभूमीवरचे

दर्शन नि होणारे हाल डोळ्यात टिपे आणीत. अहो, केवढी मोठी माणसे ही ! नानासाहेब तर शेवटी बोलून दाखवीत, 'आम्ही पोटार्थी नट' पण ते खरे नव्हे. ती त्या परिस्थितीची शरणागती होती इतकेच.

मुंबईच्या एका नाट्यमहोत्सवात 'एकच-प्याला'चा प्रयोग होता. बालगंधर्व होते--सिंधू, गंगाधरपंत लोंढे--सुधाकर, नारायणरावांच्या त्या उतार-वयातही प्रयोग रंगत होता; पण मधेच सुधाकर–सिंधूच्या एका प्रवेशात बालगंधर्व स्तब्ध (Blank) झाले. त्यांना एक शब्द सुचेना ! जणू आपले रंगभूमीवरचे अस्तित्वच ते विसरले. लोंढे त्यांना त्यांचे भाषण पुनः पुन्हा सांगत होते. पण बालगंधर्व ते बोलू (Pick up) शकत नव्हते. नटाच्या आयुष्यात रंगभूमीवर असा क्षण येतो कधीकधी ! तो क्षण गेला नि नाटक मार्गी लागले; पण तिथे नटसम्राट बालगंधर्वच होते म्हणून प्रेक्षकांनी ते सहन केले. जर दुसरा कुणी कलाकार असता, तर प्रेक्षक हुटाउट केल्याशिवाय राहिले असते का ? पण अशा थोर कलावंतावर पुण्याई पणास लावण्याची पाळी यावी का ?

❋ तपःश्चर्या

अभिनयश्रेष्ठ केशवराव दाते; म्हणजे रंगभूमीचे भीष्माचार्यच ! गणपतराव भागवतांचे शिष्यत्व लाभलेले 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चे मुरब्बी नट. त्यांचे नुसते नाव उच्चारले, तर त्यांच्या किती तरी भूमिका चटकन नजरेसमोर उभ्या राहतात. भीम (कीचकवध) जयंत (प्रेमसंन्यास) औरंगजेब (आग्ऱ्याहून सुटका) कवीश्वर (खडाष्टक) मनोहर (आंधळ्यांची शाळा) केशवशास्त्री (सवाई माधवराव यांचा मृत्यू) अशा किती म्हणून सांगाव्या ?

पुढे 'राजकमल'मध्ये चित्रपटात गुंतल्यामुळे नि त्यांच्या दम्याच्या विकारामुळे ते नाटकातून दिसेनासे झाले; पण रंगभूमीच्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने डॉ. भालेरावांनी बोडस, कोल्हटकर, दाते, फाटक या नटश्रेष्ठांना साहित्यसंघात एकत्र आणले. अनेक नवी-जुनी नाटके पुन्हा उभी केली. केशवराव संघाशी एकरूप झाले. त्यांनी अनेक नाटके दिग्दर्शित केली नि भूमिकाही केल्या. त्यात 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' हे एके काळी खूप गाजलेले नाट्याचार्य खाडिलकरांचेही नाटक होते.

पुण्यात 'बहुरूपी' नावाचे ओपन एअर थिएटर नूतन मराठी शाळेच्या मोकळ्या जागेत उभारले होते. तेथे संघाच्या 'सवाई माधवराव'चा प्रयोग होता. अर्थातच दाते होते– केशवशास्त्री. मा. दत्ताराम– सवाई माधवराव. नाटकाचा सूत्रधार पाताळयंत्री केशवरावशास्त्री. नाटकाची सारी मदार होती त्याच्यावरच. दाते या भूमिकेत आपल्या अभिनयाचे सारे पैलू, पायरीपायरीने खुलवीत. नाटक सुरेख रंगले होते. पाचव्या अंकातला आवडा नायकीण– गोंधळी नि केशवशास्त्री

यांचा दुसरा प्रवेश सुरू होता. आवडीला केशवशास्त्र्याने आपल्या कारस्थानातले खेळणे बनविले होते. तिला खूष करण्याकरता तो तिच्या गळ्यात सोन्याचा कंठा घालतो. त्यावर गोंधळ्याचे भाषण आहे, 'नारायणरावाच्या रक्ताचा टिळा लावून, सुमेरसिंगाने राघोबादादाला मुजरा केल्यावर आपल्या हातातील ही हिऱ्याची पोची राघोबादादांनी सुमेरसिंगाच्या हातात बांधली.' त्यावर केशवशास्त्री म्हणतो, 'जडावाचे काम तर फारच विलक्षण आहे' पण या वेळी दात्यांच्या तोंडून 'पोंचीचे नक्षीकाम फर्स्टक्लास झाले आहे' असे शब्द नकळत निघून गेले. रंगल्या अभिनयाच्या आविर्भावात प्रेक्षकही वाहून गेले; पण दात्यांच्या मनाला ती गोष्ट फार लागली. प्रवेश संपवून आत आले नि कुणाशी काहीही न बोलता मुकाट एका कोपऱ्यात उभे राहिले. चहासुद्धा घेतला नाही ! चित्तरंजन कोल्हटकरांच्या हे लक्षात आले. केशवरावांना तशा विचित्र मनःस्थितीत पाहून त्यांना चैन पडेना ! ते काही तरी बहाणा करून केशवरावांकडे गेले नि म्हणाले, 'नाना, आज मला नाटकात काम नाही म्हणून चहासुद्धा नाही ?' 'अरे, कोण आहे तिकडे, याला चहा दे' म्हणून त्यांनी सांगितले. चित्तरंजनच्या हातात चहाचा कप पडला. त्याने बशीत ओतून केशवरावांच्या पुढे केला, 'घ्या नाना, एक घोट !' 'नको, तूच घे'– केशवराव. 'मग मला नको'– चित्तरंजन. चित्तरंजन कप खाली ठेवू लागले, तोच दाते म्हणाले, 'घे !' चहा संपवून केशवराव म्हणाले, ' 'गुलामा, मी चहा घ्यावा म्हणून हे नाटक केलंस खरं ना ?' आपल्या जिभेच्या शेंड्याकडे बोट करीत म्हणाले, 'या टवळीने आज खाडिलकरांची संहिता बिघडविली. वाक्य चुकलं माझं !'

याला म्हणतात भूमिकेवरची श्रद्धा ! नटाच्या मनाचे मोठेपण !

❋ नटसम्राट

नटसम्राट म्हटल्याबरोबर आज आधी डोळ्यांसमोर उभे रहाते ते कविवर्य कुसुमाग्रजांचे चिरंजीव नाटक– नटसम्राट ! मग त्याच्या अनुषंगाने आठवण होते ते नाटक गाजवणारे रथीमहारथी, डॉ. श्रीराम लागू, दत्ता भट, सतीश दुभाषी, चंद्रकांत गोखले नि आज नटसम्राट गाजवीत असलेले तरुण अभिनेते यशवंत दत्त यांची. नकळत डोळे पाणावतात ते सतीशच्या अकाली नि शांताबाई जोग (सरकार, कावेरी) यांच्या अपघाती निधनाच्या स्मृतीने.

एक काळ असा होता की, नटसम्राट म्हटले की– गणपतराव जोशीच ! (हॅम्लेट) अन्य कुणीही नाही; पण नटसम्राट हेसुद्धा अखेर काळाच्या हातातले खेळणेच. गणपतराव गेले. मग त्या मावळत्या सूर्याची किरणे घेऊन उगवतीवर आले, नारायण श्रीपाद राजहंस– नटसम्राट बालगंधर्व ! त्यांची कारकीर्द प्रदीर्घ काळ जवळजवळ पन्नास वर्षे गाजली. रसिकांना उदंड आनंद देऊन गेली. त्यांच्या

पराक्रमाच्या खुणा मराठी रंगभूमीवर-विशेषतः संगीत रंगभूमीवर ठायी ठायी दिसतातच; पण मराठी मनात गंधर्वप्रेमाला, भक्तीला अढळपद प्राप्त झाले आहे.

पण याच काळात नटसम्राट गणपतराव जोश्यांचा वारसा घेऊन एक गद्य नटसम्राट रंगभूमीवर अधिराज्य गाजवीत होता. त्याचे नाव–नटवर्य नानासाहेब फाटक ! शिरवाडकरांनी नटसम्राट बेतले, रचले– ते नानासाहेबांकडे पाहूनच. नानांसाठीच. मुळात नानांसाठी ' किंगलियर 'चे रूपांतर करण्याची कल्पना; पण विचार करताना नि प्रत्यक्ष लिहिताना शिरवाडकरांना काही निराळेच भावले. ते सांगतात– ' लियरच्या तीरावर रेंगाळत असतानाच केव्हा तरी एक वेगळा विचार मनात आला. नानासाहेब फाटकांसारखा रंगभूमीवरचा एक राजा घेऊनच आपण एका नव्या नाटकाची उभारणी का करू नये ? शिरवाडकरांच्या मनाने असे घेणे, हाच नानांच्या अभिनयश्रेष्ठत्वाच्या गुणविशेषांचा गौरव होय. शिरवाडकर इतकेच सांगून थांबत नाहीत. तर अगदी मनमोकळेपणाने लिहितात, ' नानासाहेबांविषयी, नट म्हणून त्यांच्या सामर्थ्याविषयी मला अतिशय आदर होता. आजही आहे. नानासाहेबांसारखा महान नट माझ्या मनात उभा रहात होता आणि लियरचे नायकत्व स्वतःसाठी मागत होता.... नानासाहेबांनी बेलवलकरला (नटसम्राट) पुष्कळसे दिले. गद्य नटातील अग्रेसर स्थान. तिन्ही सप्तकात चित्त्यासारखा धावणारा आवाज, स्वभावातील ताठरपणा, गणपतराव जोश्यांचे शिष्यत्व, झटकन उसळणारा अभिमान आणि संताप आणि एकूण बाह्य रेषा. ठमीदेखील त्यांच्या बाबत ऐकलेल्या कथेत मिळाली.

नानासाहेबांच्या स्वगतांवर तर कुसुमाग्रज निहायत खूष! हॅम्लेट,झुंजारराव, राघोबा, मॅकबेथ (राजमुकुट) या भूमिकांत नानासाहेबांना पहाणे नि ऐकणे हा एक अपूर्व आनंद होता. नानासाहेबांचे हे सारे गुणसौंदर्य लक्षात घेऊनच 'नटसम्राट' उभा होता. त्यात स्वगतांची रेलचेल केली. आवाज लावायची संधी दिली; पण दुर्दैव असे की, नानांच्या कारकीर्दीवर ज्याने राजमुकुट चढणार होता, तो हा ' नटसम्राट ' त्यांच्या वाटणीला आला नाही. नाना तेव्हा थकले होते. वाकले होते. त्यांच्या वाणीचे वैभव हरपले होते. शिरवाडकरांनी मनीमानसी पूजलेला नटसम्राट, नानांच्या दिमाखदार रूपात पहाण्याचे भाग्य रसिकांच्या भाळी लिहिले नव्हते हेच खरे !

नानासाहेबांचे शेक्सपियरशी अतूट नाते. उत्तरायुष्यात त्यांनी हॅम्लेट, झुंजारराव, (अथेल्लो) राजमुकुट (मॅकबेथ) गाजविले. पण शायलॉक, ब्रूटस करण्याची त्यांची इच्छा अपुरी राहिली. खाडिलकरांचा ' राघोबा ' (भाऊबंदकी) उभा केला तसाच ' प्रतापराव ' (कांचनगडची मोहना) साकार करण्याची त्यांची फार इच्छा होती.

नानासाहेबांवर एके ठिकाणी लिहिताना कुसुमाग्रज मोठ्या आदराने

लिहितात, 'सम्राटपद हे एकच असते. त्याचा किरीट केवळ असामान्य अशा गुणवत्तेच्या मस्तकावर चढविला जातो हे गृहीत धरले तर या पदाचे अधिकारी नानासाहेब फाटक हेच आहेत, याबद्दल मला वाटते दुमत होणार नाही. नानासाहेब फाटक म्हणजे गेल्या तीसचाळीस वर्षांतील मराठी रंगभूमीचे सर्वोच्च ऐश्वर्य होय. बालगंधर्वांनंतर मराठी रंगभूमीवर गौरीशंकरासारखे आकाश व्यापून उभे राहिले ते नानासाहेब फाटक. कित्येक कलावंताचे मोठेपण हे प्रयत्नसिद्ध असते, तर कित्येकांचे जन्मजात असते, नानासाहेब या दुसऱ्या वर्गातील आहेत. माणसे घडविणारी जी कोणती दैवी शक्ती असेल, तिने देखणे रूप, भव्य चेहरा, तिन्ही सप्तकात दांडपट्ट्यासारखा लीलेने फिरणारा स्वर आणि नाट्यानुकूल प्रतिमा याचे एक अपूर्व मिश्रण तयार केले. आणि ते नानासाहेब फाटक या नावाने मराठी नाट्यक्षेत्रात अवतरले, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही.'

❋ गडकऱ्यांची अखेरची इच्छा !

यावज्जीवही 'काय मी' न कळले आप्ताप्रती नीटसे
मिलातेही कळे न गूढ– न कळे माझें मलाही तसे
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट ते होईल तूंते कसे
कोठे आणि कधी तरी जगति मी होऊन गेलो असे ॥

गडकऱ्यांनी 'माझा मृत्यूलेख' ही कविता १ एप्रिल १९१८ रोजी An April Fool's Work म्हणून लिहिली–नि त्यांचा जीवनग्रंथ २३ जानेवारी १९१९ ला आटोपला, खरोखरच गडकरी हे एक गूढ होते. महाराष्ट्रसारस्वताचे एक स्वप्न होते. त्यांनाच आपण कोण आहो ते कळले नाही मग दुसऱ्यांना कसे कळणार ?

पण गडकरी अतिशय भावनावश होते. जसे चिंतामणराव कोल्हटकरांना 'राजसंन्यास'चे प्रवेशाच्या प्रवेश देहभान विसरून सांगत, तसेच कधी दुःखी-कष्टी झाले, की अगदी मनातली गोष्ट मित्रांना सांगत. त्यांना तो उमाळा अनावर होत असे. १९१८ च्या डिसेंबरात त्यांची प्रकृती एकाएकी फारच खालावली होती. पायावर सूज आली होती. चिंतामणराव म्हणाले, 'या डॉक्टरांचे औषधाने तुम्ही खात्रीने बरे व्हाल, मास्तर.' पण त्या सरस्वतीच्या लाडक्या पुत्राला, बुद्धीच्या बृहस्पतीला जणू आपली अखेर समोर दिसत होती. मृत्यूचे 'स्वगत' ऐकू येत होते. ते गहिवरून चिंतामणरावांना म्हणाले, कोल्हटकर, ट्रंकेच्या तळाशी एका कागदाच्या पुडीत, माझा जिथे जन्म झाला त्या नवसारीच्या घरातली थोडी माती आहे, ती माती माझ्या मृत्यूनंतर दहनसमयी...' त्यांना हुंदका आवरेना. तोंडून शब्द फुटेनात. चिंतामणरावांना अश्रू आवरेनात.

⁂ स्मारक

गडकऱ्यांची आपल्या स्मारकासंबंधीची कल्पनाही अगदी आगळी वेगळी; पण त्यांच्या बालसदृश वृत्तीशी मिळतीजुळतीच होती. त्यात कर्तबगारीचा अभिनिवेश नव्हता. मोठेपणाची महती नव्हती. होती ती केवळ गंगाजळासारखी निखळ कृतज्ञता ! आपल्या गुरुजनांविषयी नितांत आदर. ते म्हणाले होते, 'फर्ग्युसन कॉलेजसमोरच्या एका बाजूला माझ्या नावाचे वृंदावन असावे आणि सकाळ–संध्याकाळ कॉलेजमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची नि गुरुजनांची धूळ माझ्या मस्तकी–माझ्या वृंदावनावर पडावी एवढीच माझी इच्छा आहे.'

त्यांची गुरुभक्ति नि मित्रप्रेम सर्वश्रुत आहे. त्यांच्या पहिल्या नाटकाला– प्रेमसंन्यासला, गुरुवर्य गो. चि. भाटे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तर ते अर्पण केले आहे, आपल्या पितृतुल्य गुरूंना– आपल्या तात्यांना श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना ! आपल्या लाडक्या शिष्यांच्या अखेरच्या इच्छेनुसार 'भावबंधन'ची पदे रचली आहेत तात्यांनीच !

⁂ संथा – भूमिकेची

१९५६ – ५७ सालातली गोष्ट. चिंतामणराव कोल्हटकर 'भावबंधन'चा प्रयोग बसवीत होते. त्यात पु. ल. देशपांडे कामण्णा करणार होते. एक दिवस पु. ल. चिंतामणरावांच्या घरी गेले, तेव्हा चिंतामणराव धुंडिराजाची नक्कल म्हणण्यात गढून गेले होते. गडकऱ्यांचा शब्दन् शब्द बकुळीच्या फुलांसारखा अलगद वेचून उरी सोडविणाऱ्या टिपकागदासारखा पानांत टिपून ठेवणाऱ्या चिंतामणरावांनी धुंडिराजाच्या भूमिकेत नक्कल म्हणत बसावं हे पाहून पु. ल. ना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, चिंतामणराव, भाषण कशाला पाठ करायला हवं तुम्हाला? तुम्ही गडकऱ्यांची नाटकं उलटीकडून पाठ म्हणता !' त्यावर चिंतामणरावांचे उत्तर 'मिस्टर, आम्ही धुंडिराज म्हटला नाही कधी !' चिंतामणरावांनी अनेकांना धुंडिराजची संथा दिली होती. पण स्वतः धुंडिराज म्हणून रंगभूमीवर उभे राहिले नव्हते. म्हणून त्या वयातही संथा मुखोद्गत हवी म्हणून ते धुंडिराज म्हणत होते. त्यांना धुंडिराज म्हणून रंगायचे होते.

असे सांगतात, की गणपतराव जोशी तर नटांकडून, महिम्न, पवमान, रुद्र पाठ करून घेत असत. काय बिशाद शब्द अडेल? शब्द आपलं रूप गुण घेऊनच मुखातून बाहेर पडे. शब्द – शब्द – शब्द !! शब्द हाच अभिनयाचा आत्मा होता. नटाचं सामर्थ्य होतं. शब्दच प्रेक्षकांच्या काळजाला हात घालीत होता. त्याना रडवित होता. हसवित होता.

चिंतामणरावांच्या 'आम्ही धुंडिराज म्हटलं नाही' या उत्तरावर पु. ल.

मोठे सुरेख भाष्य करतात, 'रुद्र म्हटला' नाही त्यातल्या 'म्हटल्या'चा त्या म्हणण्याला अर्थ होता, प्राचीन ब्राह्मण वेद वाचीत नसत, 'म्हणत',नाटक हा त्यांच्या दृष्टीने मुख्यतः 'स्पोकनवर्ड' होता. आजही गणपतराव बोडस, केशवराव दाते त्यांच्यासारखी मंडळी हे 'म्हणणे' गेले, म्हणून हळहळतात. त्या काळातल्या परिभाषेत सांगायचे म्हणजे वेदासारखे 'ऑथर'चे वाक्य, त्यातल्या उभ्या-आडव्या आघातांसह म्हणणे त्याला निराळा अर्थ होता. त्या गद्याला स्वर होता. लय होती. ख्यालाप्रमाणे त्याची दमखम होती.'

❋ निरवानिरव !

नटश्रेष्ठ केशवराव दाते खूप थकले होते. दम्याने हैराण झाले होते. त्यांचे ते अखेरचेच दिवस होते म्हणाना ! मनात येतील ते विचार मुलांना नि स्नेही मंडळींना सांगवेल तसे सांगत असत. त्यात संसारापेक्षा, नाट्यसंसाराचीच त्यांना अधिक कळकळ. मुंबई मराठी साहित्यसंघाचे नि त्यांचे अगदी जिव्हाळ्याचे संबंध. एक दिवस तात्या अमोणकर नि डॉ. बाळ भालेराव (कै. डॉ. अ. ना. भालेराव यांचे सुपूत्र) यांना त्यांनी भेटायला बोलावले. ते नेहमी येतच असत. ते येता क्षणीच, पडल्या पडल्याच केशवराव म्हणाले, 'या उत्तरायणाची वाट पहात भीष्माचार्य शरपंजरी पडले आहेत.' मग संघाबद्दल नि इकडचे तिकडचे थोडेसे बोलणे झाल्यावर केशवराव एकदम बोलायचे थांबले. त्यांना अगदी भरून आले. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ते काही बोलणार होते; पण त्यांना बोलवत नव्हते. डॉ. बाळ नि तात्यांनी एकमेकांकडे पाहिले, तोच दाते म्हणाले, 'बाळ, तुझ्या वडिलांनी नि साहित्यसंघाने माझ्यासाठी खूप काही केले नि करीत आहे, म्हणून तुमच्याकडे मला एक मागणी करायची आहे. माझ्या मृत्यूची बातमी लोकांना कळवायची नाही. तुम्ही जे चार जण जमाल त्यांनी माझ्या देहाचे दहन विद्युतदाहिनीत करायचे. धार्मिक विधी करायचा नाहीत. शोकसभा भरवायच्या नाहीत आणि हे पहा, घरी भिंतीवर लावलेले माझ्या पत्नीचे छायाचित्र माझ्या प्रेताबरोबर दहन करायचे एवढीच माझी अखेरची इच्छा आहे.'

या नंतर थोड्याच दिवसांनी केशवराव गेले.

❋ घनःश्याम गहिवरला !

नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकरांनी वृंदावन, घनःश्याम, साबाजी मातंग युवराज, सेनापती विक्रमसिंह अशा अनेक भूमिका गाजविल्या; पण चिंतामणराव म्हटले की, आधी आठवण होते, ती त्यांच्या 'भावबंधन'मधल्या घनःश्याम'च्या भूमिकेचीच ! आयुष्यभर त्यांचा घनःश्याम गाजला. ताजा टवटवीत राहिला. गडकऱ्यांच्या नाटकात भक्तिभावाने रंगणे हा कोल्हटकरांचा कुळाचार–कुळधर्मच

म्हणा ना ! कारण चिंतामणरावांचे सुपूत्र चित्तरंजन आज घनःश्यामचा वसा मनोभावे वशीत आहेत. परंपरेने गडकऱ्यांचा घनःश्याम त्यांच्या घरात आला आहे.

चिंतामणरावांच्या उतारवयात (१९५६-५७ साल असेल) ते नाट्य-व्यवसायातून, तसे निवृत्तच झाले होते. तरी पण त्यांना घनःश्याम करण्याचा आग्रह रसिकांकडून वारंवार होई; पण ते म्हणत, 'आता तरुण मंडळी तयार झाली आहेत. घनःश्याम करण्याचे–मुलीला मागणी घालण्याचे-- विशीपंचविशीचे माझे वय नाही. मी आता धनेश्वर–धुंडिराजांच्याही पुढे गेलो आहे'; पण एका प्रयोगात त्यांनी धुंडिराज करण्याचे मनावर घेतले.

योग असा की–ते धुंडिराज तर त्यांचे चिरंजीव चित्तरंजन–घनःश्याम. तालमीत तर एकदा अशी मजा झाली की, घनःश्याम-धुंडिराज याचा पहिलाच प्रवेश सुरू झाला. 'माझे नाव घनःश्याम' म्हणून चित्तरंजनांनी आपल्या संवादाला सुरुवात केली; पण त्यापुढचे धुंडिराजाचे नि त्यानंतरचे घनःश्यामाचे-- असे सर्व संभाषण चिंतामणरावच बोलत राहिले. मध्येच थांबले नि म्हणाले, 'काय रे, तू का बोलत नाहीस?' चित्तरंजन हळूच म्हणाले, 'काका, आपल्या दोघांचेही संवाद तुम्हीच म्हणत आहा.' 'असं झालं होय? मग आधीच नाही का सांगायचं?' हाडीमाशी खिळलेला घनःश्याम त्यांची पाठ थोडीच सोडणार? नुसता घनःश्यामच नव्हे तर सगळा गडकरी त्यांच्या रोमारोमात भिनला होता !

प्रत्यक्ष प्रयोग फारच सुरेख झाला. चिंतामणरावांचा धुंडिराज ज्यांनी पाहिला ते भाग्यवान ! पहिल्या अंकातल्या रेल्वेस्टेशनच्या पाचव्या प्रवेशात, पोलिस वेषात घनःश्याम प्रवेशतो नि महेश्वराच्या सहाय्याने अश्राप धुंडिराजास दागिन्यांच्या चोरीच्या लचांडात गुंतवितो. कबुलीजबाब लिहून घेतल्यावर दये-खातर त्याला मोकळा सोडतो. या प्रसंगात अखेर, 'सरकार, आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाही' असे सांगून धुंडिराज घनःश्यामाच्या पायावर डोके ठेवतो. घनःश्यामाच्या (चित्तरंजनच्या) पायावर, काकांनी (चिंतामणरावांनी) जन्मदात्या पित्यांनी डोके ठेवताच त्याच्या अंगात सरकन वीज चमकून गेली. अंगावर काटा उभा राहिला. क्षणभर काही सुचेना ! (पण इथेच अंकाचा पडदा पडतो.) पडदा पडल्यावर चिंतामणराव उभे राहिले नि चित्तरंजनच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले, 'अरे, तू का असं डोळ्याला पाणी आणतोस? तुझे वडील नाही तुझ्या पाया पडले--पाया पडला तो मालतीचा बाप–धुंडिराज !' धन्य तो पिता नि धन्य तो पुत्र !

❋ बेटा से बाप...

चित्तरंजनचा घनःश्याम प्रेक्षकांना एकदम आवडला होता. अनेक प्रयोगात

गावोगावी ते घनःश्याम म्हणून उभे रहात होते. ते खेळ ठेकेदारांचे असत अगदी मा. नरेशपासून तो नयना आपटेपर्यंत दहा-पंधरा कलाकार 'लतिका' म्हणून त्यांच्याबरोबर उभे राहिले असतील.

पुण्यातल्या एका प्रकाशकांकडे गडकऱ्यांच्या नाटकांच्या प्रयोगाचे हक्क आहेत. त्यांचे नि भावबंधनचे प्रयोग लावणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरचे खेळाच्या रॉयल्टी-वरून भांडण झाले होते. त्यांनी प्रमुख कलाकारांना काम करू नये म्हणून नोटिसा बजावल्या होत्या. चित्तरंजननेही अनवधनाने ती नोटिस स्वीकारली होती; पण मुंबईच्या खेळात काम करण्याचेही कबूल केले होते. विनोद असा, की मुंबईच्या प्रयोगाच्या दिवशी कलावंतांना काम करू न देता, खेळावर बंदी आणण्यासाठी ते प्रकाशक नि त्यांचे वकील 'डेक्कन क्वीन'ने मुंबईला चालले होते. चित्तरंजनही त्याच डब्यात होते. प्रकाशक नि त्यांचे वकील यांच्याशी त्यांच्या गप्पाही झाल्या; पण 'आपण प्रयोग बंद पाडण्यासाठी जात आहो' याची त्यांनी ताकास तूर लागू दिली नाही. दादरला उतरल्यावर, एकदा थिएटरवर चक्कर मारावी म्हणून तिकडे गेले. मग हिंदु कॉलनीतल्या आपल्या घरी गेले. त्याआधी ही मंडळी चिंतामण-रावांना भेटायला गेली होती. हेतू हा की, चित्तरंजनने त्या प्रयोगात काम करू नये, नाही तर तो पकडला जाईल हे चिंतामणरावांनी त्याला समजावून द्यावे; पण चिंतामणराव कसले मख्ख ! ते म्हणाले, 'हे पहा तुम्ही सांगितले हे ठीक; पण त्याचा तो जाणता आहे. त्याला हवे ते करू द्या !' असे सांगून त्यांची बोळवण केली.

थोड्या वेळाने, चित्तरंजन घरी आल्यावर 'काय रे, तुझ्या आजच्या प्रयोगाची काय भानगड आहे ? ते रॉयल्टीवाले नि त्यांचे वकील आताच येऊन गेले.' असे चिंतामणरावांनी विचारले.' हो मलासुद्धा ते आताच कळलं. मला काम करू देणार नाहीत म्हणे !' –चित्तरंजन.

'हे बघ, मुळीच काळजी करू नको. आधी आपल्या सॉलिसिटर रेगे यांना भेटून ये. ते काय म्हणतात ते पहा आणि येताना त्या तुमच्या कलपाची एक बाटली घेऊन ये ! '–चिंतामणराव. त्यावर चित्तरंजन साहजिक म्हणाला, 'कलप कशाला ?' त्यावर चिंतामणराव म्हणाले, ' अरे, असावी गरज पडली तर ! तुझं काम ज्या प्रवेशात ज्या वाक्याला बंद पाडतील तिथपासून मी सुरू करीन. मी उभा राहीन घनःश्याम म्हणून ! मला हवा ना कलप. जा, खेळ झालाच पाहिजे !'

वा रे वा ! बेटा से बाप सवाई !

⁂ वारसा दिनकर कामण्णाचा ?

वसंत शिंदे एक गुणी विनोदी नट. आता बहात्तर उलटून त्र्याहत्तर-करीत पंचाहत्तरीची वाटचाल सुरू आहे. वसंतरावांनी एक काळ मराठी रंगभूमी

गाजविली; पण आज रसिक त्यांना ओळखतात, ते एक चित्रपटातील, विशेषतः ग्रामीण चित्रपटातील एक विनोदी नट म्हणून. आजही त्यांचे अनेक चित्रपटांचे शूटिंग सुरू आहे. गेली साठपासष्ट वर्षं नाटक-सिनेमात हा माणूस उभा आहे. शिवाय अनेक लोकनाट्यात, 'विनोदमूर्ति' नाही तर 'विनोदाचा बादशहा' म्हणून हे नाव झळकत आहेच. वसंतराव एक कलावंत म्हणून जितके थोर तसेच एक माणूस म्हणूनही मोठे गोड, रसीले आहेत. जुन्या नाटकांच्या गोष्टी निघाल्या की, अगदी रंगून जाऊन किती तरी मस्त आठवणी सांगतात.

'नाटक नि सिनेमात लहान असूनही (तशी आमची बालबुद्धीच म्हणा!) दिनकररावांच्या (दिनकर कामण्णा) जागी आमची स्थापना झाली. 'राजाराम संगीत मंडळी'ने 'प्रेमसंन्यास'ने सुरुवात केली. तिथे मामा (चिंतामणराव कोल्हटकर) होते. त्यांनी 'गोकुळ'साठी मला खास बोलावून घेतले होते. 'भावबंधन' खास दिनकररावांसाठी सुरू झाले. मग दिनकरराव गेले. त्यांच्या जागी 'कामण्णा' म्हणून उभा राहिलो. या नाटकांचे खूप खेळ झाले. माझी दोन्ही कामे पाहून खुद्द दिनकररावांनी पाठीवर हात थोपटून शाबासकी दिली. इतकेच काय पण त्यांनी 'गोकुळ' करावा म्हणून त्यांना खूप आग्रह झाला. त्यांचं नावच तसं खूप मोठं होतं. फार मोठे ॲक्टर! पण म्हणाले 'नाही. त्यालाच करू दे गोकुळ. फार छान काम जमवलंय त्यानं!'

वसंतरावांच्या कामण्णा नि गोकुळचे खूप कौतुक झाले. चित्रपटात तर ते दिनकर कामण्णाचे वारसदार म्हणूनच आले. भालजी पेंढारकरांचा 'सूनबाई' बोलपट खूप गाजला. त्यात कामण्णाची 'सुभान्या'ची भूमिका बेमालूम झाली होती. त्यानंतर या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची 'सासुरवास'ची भालजी जुळवाजुळव करीत होते. त्या वेळी दिनकर कामण्णा कालवश झाले होते. त्यांच्या तोडीचा माणूस डोळ्यांसमोर दिसत नव्हता. भालजी फिकिरीत होते. इथेही चिंतामणरावांनीच शिंद्यांचे नाव सुचविले. भालजींना पटले. वसंतराव आले. सुभान्याचा मेकप झाला. पहिल्या शॉटलाच भालजींनी 'ओके' म्हटले. दिनकररावांचा 'सूनबाई' गाजला. वसंतरावांचा 'सासुरवास' गाजला. वसंतराव तसे फार हळवे! दिनकरराव, चिंतामणराव, भालजी यांचा उल्लेख करताना, 'त्या सगळ्यांची पुण्याई' या भावनेने त्यांना भरून येते.

❋ ग्रहण सुटल्यावर जा!

विनोदी नटांना प्रसंगविशेषी पदरची वाक्ये घुसडण्याची लहर येते. प्रसंगावधान राखून चांगले चार शब्द टाकले, तर तो प्रसंग अधिक खुलतो. नाही तर त्या प्रवेशाचा, नाटकाचा विचका होतो; पण हे भान वसंतराव छान राखतात. तो गुण, त्यांनी आपल्या गुरूंकडून-दिनकररावांकडूनच उचलला आहे.

अगदी अलीकडची गोष्ट. शरद तळवलकरांच्या एकसष्टीसमारंभाला 'संशयकल्लोळ'चा प्रयोग होता. त्या दिवशी नेमके ग्रहण होते. फाल्गुनराव-कृत्तिकेचे भांडण होऊन ती माहेरी जायला निघते. भादव्या (वसंतराव) हा त्यांचा घरगडी. तो म्हणाला, 'बाईसाहेब, ग्रहणात नका हो जाऊ. ग्रहण सुटल्यावर जा!' कडकडून टाळ्या नि हशा!

❋ शकून-अपशकून

नाटक-सिनेमात मुहूर्त, शकून-अपशकून या गोष्टींना खूपच महत्त्व दिले जाते. नटश्रेष्ठ केशवराव दाते हे आपल्या गोष्टींना फारसे महत्त्व देणारे नव्हते. तरीही त्यांनी आपल्या निरीक्षणाने एका मोठ्या अपयशाची नोंद केलेली आहे.

कर्ण :

कुमारीमाता किंवा कर्णाच्या जीवनावरची सगळी नाटके अयशस्वी झाली आहेत. शिवराम महादेव परांजपे यांचे 'पहिला पांडव' महाराष्ट्र नाटक मंडळीने सुरेख बसविले होते; पण नाही चालले. प्रबोधनकार ठाकरे यांचे 'टाकलेले पोर' पडले. कविवर्य शिरवाडकरांचे 'कौन्तेय' दुर्गाबाई खोटे नि मा. दत्ताराम यांसारखे मोहरे इथे घालूनही उभे राहू शकले नाही. प्रेक्षकांची नाडी अचूक ओळखण्यात हातखंडा समजले जाणारे वि. ह. औंधकर ('बेबंदशाही'कर्ते) यांचे 'महारथी कर्ण' सुद्धा टिकले नाही!

राम :

असेच रामावरचे एकही नाटक यशस्वी झाले नाही. अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'रामराज्यवियोग' अर्धवटच राहिले. काकासाहेब खाडिलकरांचे 'सवतीमत्सर' प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही पडले. बामणगावकरांचे 'धनुर्भंग' चालले नाही. या मर्यादा पुरुषोत्तमावरच्या नाटकांना अशा पडाव्या?

राणी लक्ष्मी :

तेच झाशीच्या राणीच्या जीवनावरच्या नाटकांचेही झाले. एक गुजराथी नाटक कंपनी मोठ्या थाटमाटात झाशीची राणी नाटक करीत असे. ते नाटक तर चालले नाहीच; पण ती कंपनीच रसातळाला गेली! शां. गो. गुप्ते यांचे 'रणरागिणी' गाजले नाही. इतकेच काय सोहराब मोदींनी काढलेला राणीच्या जीवनावरचा भव्य चित्रपट कोसळला! शांतारामबापूंसारख्या सिद्धहस्त दिग्दर्शकाची 'इथे मराठीचिये नगरी' उभी राहू शकली नाही.

यात कुसुमाग्रजांच्या 'वीज म्हणाली धरतीला' याही नाटकाचा समावेश व्हायला हरकत नाही. सर्व नाटकांना एकमात्र अपवाद म्हणजे ग. कृ. बोडस यांच्या सुंदर संगीत मंडळीच्या 'झाशीची राणी' या नाटकाचा नि त्यांच्या गुणी पत्नी सरस्वतीबाई बोडस यांच्या राणी लक्ष्मी या भूमिकेचा. (अगदी

अलीकडे 'गारंबीचा बापू', 'पुत्रकामेष्टी' या नाटकांतून त्या काम करीत होत्या).

का कर्ण, राम, राणी लक्ष्मी हे सारेच एकप्रकारे शापित विषय समजायचे ?

❋ धुंडीराज पावला

मी जयवंत दळवींचे 'पुरुष' नाटक पाहून थिएटरबाहेर पडत होतो, तोच माझ्या शेजारून चालणाऱ्या एका तरुण जोडप्यातला पुरुष आपल्या पत्नीला म्हणाला, 'हा चंद्रकांत गोखले, नाटकातही चांगले काम करतो नाही ?' मला आश्चर्य वाटले; पण त्यात त्या तरुणाचा काय दोष ? ते चंद्रकांतांना सतत पहात आले ते मराठी चित्रपटातूनच ! पण चंद्रकांतांचा जन्मच मुळी नाटककंपनीत झाला.

चंद्रकांत हे नाट्यकला – कुलोत्पन्नच. त्यांचे वडील रघुनाथराव गोखले, जुन्या काळचे उत्तम स्त्रीपार्टी. चुलते रामभाऊ हे श्रेष्ठ गद्यनट. आई (कमलाबाई कामत) उत्कृष्ट अभिनेत्री. त्या स्त्री–पुरुष भूमिका सहजतेने करीत. बंधू लालजी नि छोटू हे प्रसिद्ध तबलापटू. चंद्रकांतचे चिरंजीव विक्रम गोखले हे आजचे आघाडीचे नाट्यचित्र कलावंत !

चंद्रकांत लहानपणापासून रंगभूमीवर वावरले. मा. दीनानाथ मंगेशकरांपासून गंगाधरपंत लोंढ्यांबरोबर स्टेजवर असलेले कलावंत. त्यांनी अनेक भूमिका गाजविल्या. अलीकडे त्यांनी 'नटसम्राट' उभा केला होता. आजही 'पुरुष', 'बॅरिस्टर' त्यांच्या नावावर जमा आहेत. नव्या नाटकातून येतच आहेत, पण एक जमाना असा होता की, चंद्रकांत गोखले म्हणजे 'धुंडिराज !' आज त्यांनी एक नामवंत चरित्रअभिनेता म्हणून जे अपूर्व यश संपादले आहे, त्या चित्रसृष्टीत या त्यांच्या भावबंधनमधल्या 'धुंडिराज'नेच त्यांना हात धरून आणले आहे.

एक दिवस राजाभाऊ परांजपे राजाराम संगीत मंडळीचे 'भावबंधन' पहायला आले होते. चंद्रकांतांचा गोष्टीवेल्हाळ, साधाभोळा धुंडिराज पाहून ते अगदी भारावून गेले. दुसऱ्याच दिवशी 'नवयुग'च्या पुंडलीक या चित्रपटासाठी घेऊन गेले. चाळीस रुपये पगार ठरला. चंद्रकांतांच्या आयुष्यातला हा पहिला एवढा मोठा पगार ! 'पुंडलीक' मधली त्यांची भूमिका सुरेख झाली. मग चित्रपटातल्या भूमिका एकामागून एक दाराशी चालून येऊ लागल्या. धुंडिराज पावला ! पुंडलीक प्रसन्न झाला !

❋ प्रिये पहा...

'सौभद्र' हे मराठी रंगभूमीचे सौभाग्य. त्यात कृष्णाची भूमिका वाटणीला येणे हे गायक नटांचे महत्भाग्य ! किंबहुना गायक नटांचा तो बहुमान. कारण

एक काळ असा होता की जी कंपनी सौभद्र करीत नाही, ती संगीत नाटक मंडळीच नाही असे समजले जाई.

अगदी बाळकोबा माटेकर यांच्या पहिल्या कृष्णाच्या भूमिकेपासून आजपर्यंत किती तरी कृष्ण होऊन गेले. कृष्णराव गोरे, गंगाधरपंत लोंढे यांच्या कृष्णाच्या कामाचे, गानअभिनयाचे खूप कौतुक झाले. गेल्या काही वर्षात नटवर्य जयराम शिलेदार, नेवरेकर, मा. भार्गवराम आचरेकर, रामभाऊ मराठे आदी अनेक गुणवंत त्या भूमिकेत गाजले; पण किर्लोस्कर किंवा गंधर्व सांप्रदायातून न येताही एका श्रेष्ठ गायक नटाने त्या भूमिकेवर अधिराज्य गाजविले ते म्हणजे सौदागर, स्वरराज छोटा गंधर्व यांनी !

१९४७–४८ च्या सुमारास जुन्या नाटक मंडळ्यांचा मामला संपुष्टात आला होता; पण पंडितराव तर्टे नावाच्या नाट्य व्यवसायातल्या मुरब्बी नि महत्त्वाकांक्षी माणसाने 'भारत नाट्यकला' नावाची संस्था उभारली होती. अनेक नामवंत नट त्यांनी हाताशी धरले होते. सौभद्र, विद्याहरण, मानापमान इत्यादी जुन्या नाटकांचा धडाका सुरू केला होता; पण कलावंताच्या हातात मात्र कधी वेळेवर पैसे पडत नव्हते. एक नट गेला तर दुसरा, हे मालकांचे व्यवहारी धोरण होते. एकदा असाच कृष्णाचे काम करणाऱ्या नटाचा पगार (हवे तर नाईटस् म्हणा !) थकला होता, त्या नटाने सभ्यतेने नि सबुरीने वागूनसुद्धा अखेर त्याला काम सोडावे लागले. अशाच अडचणीत पंडितरावांनी सौदागरांची विनवणी केली नि ते कृष्ण म्हणून उभे राहिले. 'कलाविकास'चा कारभार आटोपला होता. सौदागर कृष्ण म्हणून रंगले ती खरेच अमृतवेळा ठरली. नाही तर त्यांचे स्कूल बाल मोहन नाटक मंडळीचे. आचार्य अत्र्यांच्या सर्वच नाटकात ते हिरो होते; पण अत्र्यांच्या नाटकातले संगीत मर्यादित होते. नाटके सामाजिक होती; पण त्यातही सौदागरांचे खूप नाव झाले होते. गायक नट म्हणून ते कंपनीचा प्राण होते. साहजिकच त्यांच्याजवळ गोडे होतेच; पण कृष्णाची भूमिका रंगविताना त्यांना फार मोठा फायदा झाला तो सामाजिक नाटकातल्या अभिनयाचा. त्यांनी कृष्णाच्या मुकुटाआड लपलेला कृष्णाचा मिस्किलपणा त्या भूमिकेत असा ओतला की, प्रेक्षकांना तो कृष्ण पौराणिक राहूनही आपल्यातलाच वाटू लागला. रंगतदार झाला.

त्यांनी लहानपणी कृष्णराव गोऱ्यांचा कृष्ण पाहिला होता. तो त्यांच्या मनावर बिंबला होता. कृष्णराव गोऱ्यांचे त्यांच्यावर खूप प्रेम होते. त्याचा एक धागा सौदागरांचा गोड गळा. दुसरा, ते दोघेही सातारा जिल्ह्यातले. (गोरे–वाई, सौदागर–कोरेगाव) शिवाय गाण्यांची जुनी बैठक न मोडता, आपल्या खास ढंगात ती अधिक गोड केली. त्यांनी स्वतःची 'छोटा गंधर्व कर्न्सन' स्थापून कृष्णाच्या भूमिकेचे जणू पेटेंटच घेतले. सौभद्राचे शेकडयांनी खेळ केले. पंचवीस

तीस वर्षं, कृष्ण म्हणजे स्वरराज छोटा गंधर्वच अशी रसिकांची भावना होती. कृष्णासारखाच त्यांचा धैर्यधर नि चारुदत्त खूप लोकप्रिय झाला; पण एक वेळ यावी लागते. संधी मिळावी लागते. आजही ' प्रिये पहा, रात्रीचा समय सरूनी...'चे सूर कानावर पडले की, सौदागरांचा तिसऱ्या अंकातला तो शेवटचा प्रवेश जसाच्या तसा डोळ्यापुढे उभा राहतो.

मला आपलं उगीचच वाटतं, ' गंधर्व ' (नारायणराव बालगंधर्व) या नाममुद्रेची, या केसरकस्तुरी गंधटिळ्याचीच ही किमया असावी. मग ते छोटा-गंधर्व असोत, कुमारगंधर्व असोत, नाही तर सवाईगंधर्व असोत !

❋ टक्कल–एक जुगलबंदी !

दादरच्या डिसिल्व्हा हायस्कूलच्या प्रांगणात चित्रपट महोत्सव सुरू होता. सिनेकलावंताचे करमणुकीचे अनेक कार्यक्रम होते. त्यात आचार्य अत्रे यांच्या सदाबहार (Ever Green) ' लग्नाची बेडी ' या नाटकातले काही प्रवेश होते.

दुसऱ्या अंकातल्या गार्गी–गोकर्ण यांचा भांडणाचा प्रवेश सुरू झाला. गोकर्ण होते राजाभाऊ परांजपे. गोकर्ण म्हणतो, ' अग, तो अवधूत आहे महामूर्ख त्याचं काय सांगतेस ! ' तेवढ्यात अवधूत (शरद तळवळकर) प्रवेश करतो नि गोकर्णाला विचारतो, ' काय हो हे, आपल्या बायकोसमोर माझी धडधडीत बदनामी करीत होतात.' त्यावर गोकर्ण सुनावतो, नवरा–बायकोच्या खाजगी भानगडीतल्या गोष्टी ऐकायच्या नसतात अवधूत.' त्यावर अवधूत म्हणतो, ' वा, म्हणजे तुम्ही भांडत होतात होय ? अहाहा, बायकोशी भांडण्यातसुद्धा एक प्रकारचा रोमान्स असेल नाही ? आमच्या नशिबात हे भाग्य केव्हा यायचे असेल ते येवो.' त्यावर राजाभाऊ परांजप्यांनी (गोकर्ण) रिस्पॉन्स दिला (नाटकात नसलेला) तो असा– त्यांनी आपली पगडी काढली नि टक्कलावर हात फिरवीत म्हणाले, ' भाग्य ! हे असं होईल.' सहाजिकच प्रेक्षकात हशा पिकला; पण त्यांचे जोडीदार शरद तळवळकर (अवधूत) हेही काही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी तो हशा ओसरताच, आपल्या डोक्यातली घोंगडीची टोपी काढून आपल्या गुळगुळीत टक्कलावर हात फिरवीत किंचित खाली वाकून म्हणाले, ' अहो, आम्हाला सवय आहे त्याची; पण बायकोशी भांडण्यांचं भाग्य लाभू दे हो एकदा तरी ! ' अर्थातच या टक्कलांच्या जुगलबंदीने हास्याचा स्फोट झाला.

❋ तयांचे प्रेम खरे

पूर्वी पतीमागून सती जाण्याची चाल होती. काही मनोभावे आत्मार्पण करणाऱ्याही होत्या. पण बहुसंख्य स्त्रियांना मनात नसताही सती जाणे भाग पडे. भाग पाडले जाई. श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या मागे आपण जगूच शकणार नाही,

या भावनेने आत्मार्पण करणाऱ्या रमाबाईंचे सती जाणे मोठ्या कौतुकाचे ठरले.

पण बदलत्या जगरहाटीत, ज्यावेळी काही प्रेयसींनी आपल्या प्रियकराच्या मरणानंतर आत्मार्पण केले. (लौकिकदृष्ट्या आत्महत्या) त्यांचे कौतुक झाले नाही. उलट निंदाच झाली. कुत्सित टीकाही झाली. आपल्या नाट्यसृष्टीत अशा दोन घटना अगदी अलीकडच्या काळात घडल्या आहेत. त्या म्हणजे गंगाधरपंत लोंढे नि विमल पटवर्धन आणि नागेश जोशी नि नलिनी बर्वे.

लोंढे–पटवर्धन

लोंढे हे भरदार देहयष्टीचे, स्वच्छ वाणीचे, गोड गळ्याचे गायक नट. गंधर्व–हिरो म्हणून गाजलेले. चित्रपटातलाही त्यांचा प्रवेश कीर्ती देऊन गेलेला. त्यांनी स्वतःची 'राजाराम संगीत मंडळी' सुरू केलेली. विमल पटवर्धन खानदान कुटुंबातली दृष्ट लागेल अशी तरुणी. शिवाय पदवीधर. लोढ्यांनी तिचे कॉलेजच्या नाटकातले काम पाहिले नि तिचे रूप–वाणी–अभिनयावर निहायत खूष झाले. ही मुलगी आपल्याकडे काम करायला हवी असे त्यांच्या मनाने घेतले. त्यावेळी रंगभूमीवर स्त्रिया फारच कमी होत्या. प्रेक्षकांची अपेक्षा तर स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्या अशीच होती. स्त्री पार्ट्यांचा जमाना संपुष्टात येत होता. योग असा, विमलचे वडील नाटकाचे शौकी नि रसिक होते. त्यांनी लोंढ्यांच्या विनंतीला होकार दिला. विमल कंपनीत आली. गणपतराव बोडसांची तालीम मिळाली. ती 'सौभद्र' मध्ये रुक्मिणी नि 'संशयकल्लोळ' मध्ये कृत्तिका म्हणून उभी राहिली. 'ती आली, तिने पाहिले, नि तिने जिंकले' याच चालीवर तिने रसिकांची उदंड लोकप्रियता मिळविली. लोंढे–कृष्ण तर विमल–रुक्मिणी गणपतराव–फाल्गुनराव, तर विमल कृत्तिका. सौभद्र, संशयकल्लोळची रंगत वाढली. गल्लाही वाढला. राजारामचे रसिक मालक म्हणून लोंढे–विमलचीही गट्टी जमली; पण लोंढे हृदयविकाराच्या झटक्याने अचानक गेले. विमल पटवर्धनला एकाकी वाटू लागले. नाटकाची रंगत संपली. त्या खऱ्या अर्थाने कृष्णमय झाल्या होत्या. लोंढ्यांवर त्यांचा जीव जडला होता. लोंढ्यांचे मरण त्यांना सहन होईना. जीव रमेना. त्यांनी दोन-तीन दिवसातच विषप्राशन करून आपली जीवनयात्रा संपविली. रंगभूमीवरची एक उगवती चांदणी निखळून पडली.

नागेश–नलिनी

'बालमोहन' मधूनच 'कलाविकास' जन्माला आली. छोटा गंधर्व, नागेश जोशी, आपटे, कोरडे, सुमन मराठे, नलिनी बर्वे अशी कलाकारांची सुरेख प्रभावळ जमली होती. यातला प्रत्येक जण बालमोहनमध्ये गाजलेला होता. बुद्धिवान विनोदी नट म्हणून नागेश लोकप्रिय होताच. त्यात त्याच्या 'देवमाणूस' नाटकाला उदंड यश लाभलेले. कलाविकासमधले सततचे एकत्र रहाणे नि नागेशचे लोकांकडून होणारे वाढते कौतुक, यातूनच नलिनी–नागेशची जवळीक जडली.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर

कालांतराने यशाचा पारा खाली उतरला. कलाविकास कोसळली. नागेश मद्याच्या आहारी गेला. संसार उधळला; पण तशा हलाखीच्या अवस्थेतही नलिनीने नागेशची साथ सोडली नाही. एक दिवस नाटकात काम करीत असतानाच नागेशच्या जीवन-नाट्यावर अखेरचा पडदा पडला. नलिनीच्या दृष्टीने सारेच आटोपले होते. दुसऱ्याच दिवशी तिने आत्महत्या केली. ती इतकी धीराची, की सांगून विश्वास बसणार नाही अशा तऱ्हेने ती मरणाच्या सामोरी गेली. कसब्यातली एवढीशी खोली. घरातले सर्व सामान भिंतीलगत नीट ठेवलेले. मध्यभागी मोकळ्या जागेत अंगावर रॉकेल ओतून घेऊन स्वत:ला जाळून घेतले. हू की चू केले नाही. घरातून धुराचे लोट आल्याने शेजाऱ्यांनी दार फोडले, तो आत नलिनीचा कोळसा झालेला. एक चिठ्ठी लिहून ठेवली होती म्हणे ! 'नागेशाशिवाय जगणं मला सहन होत नाही. शक्य नाही.'

विमल पटवर्धन नि नलिनी बर्वे या दोन अभिनेत्रींच्या आत्महत्येची— आत्मार्पणाची आठवण झाली की, एक वेडा विचार मनात येतो की, विमल किंवा नलिनी या अपघाताने व अकस्मिक आजाराने आधी गेल्या असत्या तर लोंढे किंवा नागेश जोशी यांच्या हातून हे धाडस झाले असते का ? का स्त्री नि पुरुषांच्या प्रेमात हा मूलभूत फरक आहे ? एक प्रीत ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाची नि दुसरी भ्रमराची !

❋ गोखले – कोल्हटकर

मराठी रंगभूमीच्या मंदिरात गोखले–कोल्हटकरांच्या सेवेचा फार मोठा वाटा आहे. या मंडळींचा तिथं एवढा मोठा राबता होता नि आहे की, मंदिराच्या पायरीवर पाय ठेवला की, एखादा तरी गोखले – कोल्हटकर भेटतोच मग तो सभामंडपात असेल, नाहीतर गाभाऱ्यात असेल, (नट – नाटककार – निर्माता कोणत्याही भूमिकेत असेल) जितके गोखले – कोल्हटकर मला आठवतात तेवढे सांगतो. बाकीच्यांची क्षमा मागून इतकेच विनवितो की, त्यांनी आपल्या नावांची निशाणे शोधून घेऊन नाट्यपंढरीत सामील व्हावे. पंढरीच्या वारीला कुणी निमंत्रणाची का वाट पहातो.

गोखले

रघुनाथराव गोखले : उत्कृष्ट स्त्रीपार्टी – पार्वतीबाई (तोतयाचे बंड) खूप गाजलेली भूमिका भागीदार मालक – सामाजिक नाटक मंडळी. चित्ताकर्षक नाटकमंडळी.

रामभाऊ गोखले : रघुनाथरावांचे बंधू. श्रेष्ठ गद्य नट. गाजलेल्या भूमिका : प्रतापराव (त्राटिका) फाल्गुनराव, झुंझारराव मोहन (मोहनतारा).

कमलाबाई गोखले : (कमलाबाई कामत) रघुनाथरावांची पत्नी. स्वतःचीच संस्था असल्याने अनेक प्रमुख भूमिका करीत. त्यांचा गुणविशेष म्हणजे, त्या स्त्री-पुरुष भूमिका सारख्याच कौशल्याने करीत. धैर्यधर - भामिनी (मानापमान) चारुदत्त - वसंतसेना (मृच्छकटिक) नारद (कृष्णार्जुन युद्ध).

नानबा गोखले : (नारायण रामचंद्र) आधी चित्ताकर्षक नाटकमंडळी नि नंतर स्वतःची लोकमान्य नाटकमंडळी अस्खलित वाणीचे गुणी नट. डॉ. गुलाब (हाच मुलाचा बाप) नाना फडणीस (तोतयाचे बंड) या त्यांच्या खूप गाजलेल्या भूमिका.

बाळकोबा गोखले : बलवंत संगीत मंडळीचे प्रमुख नट. प्रसंगी कोणत्याही भूमिकेला उभे रहात. धनेश्वर - धुंडिराज (भावबंधन) चंद्र (ब्रह्मकुमारी) एक सेनापती (संन्यस्त खड्ग).

नानासाहेब गोखले : (गं. वि,) पत्रकार, नाटककार, अरुणोदय नाटक मंडळीचे मालक. प्राण प्रतिष्ठा, पोकळ प्रतिष्ठा, जनकोजी शिंदे, अनंत फंदी ही त्यांची नाटके.

चंद्रकांत गोखले : रघुनाथराव नि कमलाबाई यांचे पुत्र. लहानपणापासून रंगभूमीवर कामे. आताचे चरित्र अभिनेते. धुंडिराज (भावबंधन) कवजी (बेबंदशाही) गणपतराव वेलणकर (नटसम्राट) बॅरिस्टर, पुरुष, पर्याय, श्रद्धा इ. अनेक नाटके.

लालजी नि छोटू गोखले : चंद्रकांतांचे बंधू. उत्कृष्ट तबला पट्टू (तबला नवाज).

बबनराव गोखले : व्हॉयोलीनची सुरेख साथ.

बाबुराव गोखले : कवी - नट - नाटककार. 'श्री स्टार्स' या संस्थेचे चालक. त्यांचे लोकप्रिय नाटक - करायला गेलो एक.

विद्याधर गोखले : पट्टीचे वक्ते, पत्रकार, नाटककार (थोडेसे नटही) संगीत नाटकांची परंपरा सांभाळणारे श्रेष्ठ नाटककार. सुवर्णतुला, मंदारमाला, पंडितराज जगन्नाथ, मदनाची मंजिरी, जयजय गौरीशंकर, स्वरसम्राज्ञी, बावनखणी अशी अनेक नाटके. रंगशारदा ही त्यांची स्वतःची नाट्यसंस्था.

विक्रम गोखले : उमदा तरुण नट. महासागर, स्वामी, बॅरिस्टर, जास्वंदी अशा गाजलेल्या अनेक नाटकांचा नायक. चंद्रकांत गोखले यांचा सुपुत्र.

शरद गोखले : 'मराठी रंगभूमी' या जयराम शिलेदार यांच्या नाट्यसंस्थेतील गायक नट. कृष्ण (सौभद्र आणि स्वयंवर) संशयकल्लोळ (अश्विन शेट) अनेक संगीत नाटकातून भूमिका.

मोहन गोखले : नव्यानेच व्यावसायिक रंगभूमीवर भूमिका. कस्तुरीमृग, सूर्याची पिल्ले ही ते काम करीत असलेली नाटके.

महादेवशास्त्री कोल्हटकर : व्युत्पन्न विद्वान नटवर्य चिंतामणराव कोल्हटकरांचे आजोबा. १८६७ मध्ये शेक्सपियरच्या 'ऑथेल्लो'चे प्रथम मराठीत भाषांतर केले. याचीच रंगावृत्ती म्हणजे, पुढे खूप गाजलेले देवलांचे 'झुंजारराव' नाटक होय.

लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर : अजोड गायक नट. प्रामुख्याने मोहिनीरूपाचे स्त्री पार्टी. किर्लोस्कर संगीत मंडळीचे एक मालक. पहिली सुभद्रा (संगीत सौभद्र) पहिली मंथरा (रामराज्यवियोग) पुरुष भूमिका: कोदंड (शारदा) पुंडरीक (शापसंभ्रम) चारुदत्त (मृच्छकटिक) शूरसेन (वीरतनय) अकाली मृत्यू.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : (तात्यासाहेब) कवी, नाटकार, विनोदी लेखक, स्वतंत्र सामाजिक नाटकांचे जनक. वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, वधूपरीक्षा ही त्यांची स्वतंत्र शैलीची नाटके. राम गणेश गडकरी यांचे गुरू. अच्युतराव कोल्हटकर (साहेब कोल्हटकर म्हणून प्रसिद्ध) एक वादळी व्यक्तिमत्व. देशभक्त पत्रकार, तुफानी वक्ते, साहित्यिक, नाटककार 'संदेश'चे संपादक, (संदेशकार) सुंदोपसुंद, ताई तेलीण, नरिंगी निशाण. विवेकानंद ही त्यांची काही नाटके.

चिंतामणराव कोल्हटकर : अभिनय श्रेष्ठ गद्य नट. महाराष्ट्र नाटक मंडळीत पहिले पासून. नंतर 'श्री भारत' नि 'किर्लोस्कर' किर्लोस्करमध्ये गडकऱ्यांचे 'पुण्यप्रभाव' बसविण्याचा मान. पहिले वृंदावन. बलवंत संगीत मंडळीचे एक मालक. संस्थेची सर्व नाटके त्यांनीच निवडली आणि दिग्दर्शित केली.

गाजलेल्या भूमिका : वृंदावन–पुण्यप्रभाव, घनःश्याम–भावबंधन, साबाजी –राजसंन्यास, मातंग युवराज–रणदुंदुभी, विक्रमसिंह–संन्यस्त खड्ग, कमलाकर प्रेमसंन्यास किती म्हणून त्यांच्या भूमिका सांगाव्या ? नाट्यसंगीत अकादमीकडून श्रेष्ठ अभिनेते म्हणून गौरव. महावस्त्र, मानचिन्ह नि सनद, 'बहुरूपी' हा त्यांचा आपल्या कारकीर्दीचा आढावा घेणारा आत्मचरित्रात्मक ग्रंथ. या ग्रंथाचा (खऱ्या अर्थाने एका बहुरूप्याचा) साहित्य अकादमीकडून सन्मान नि पाच सहस्र रुपयांचे पारितोषिक.

प्र. श्री. (बापुराव) कोल्हटकर : श्रीपाद कृष्णांचे चिरंजीव. पत्रकार नाटककार. सेवा, वृद्धाश्रम, बातमीदार ही त्यांची काही नाटके.

चित्तरंजन कोल्हटकर : एक मातबर नट. जुन्या नव्या पिढीचा सुवर्णमध्य. जुन्या नव्या नाटकातून अनेक समर्थ भूमिका. नटश्रेष्ठ चिंतामणरावांचे

सुपुत्र. त्यांच्या काही लोकप्रिय भूमिका : खंडोजी–बेबंदशाही, नुपूर–पुण्यप्रभाव, जिवाजी कलमदाने–राजसंन्यास, सुधाकर आणि तळीराम–एकच प्याला, घनः-श्याम आणि कामण्णा–भावबंधन, सदू–दुरितांचे तिमीर जावो, शंभू महादेव–अश्रूंची झाली फुले, चिंतो बापूजी–विषवृक्षाची छाया.

बाळ कोल्हटकर : नामवंत नट नि नाटककार जुन्या अनेक नाटकातून विनोदी भूमिका. कामण्णा–भावबंधन, तळीराम–एकच प्याला, कमालखान–शिवसंभव अशा अनेक. ते आपल्या स्वतःच्या नाटकातून प्रमुख भूमिका करतातच. अत्यंत लोकप्रिय नाटककार. त्यांच्या अनेक नाटकांचे शेकड्यांनी प्रयोग झाले आहेत नि होत आहेत. बहुतेक खेळ त्यांच्या स्वतःच्या 'दुर्वांची जुडी' या नाट्यसंस्थेद्वारे होतात. त्यांची नाट्यसंपदा विपुल आहे. काही अत्यंत नावाजलेली नाटके : मुंबईची माणसे, एखाद्याचं नशीब, वेगळं व्हायचंय मला, दुरितांचे तिमिर जावो, वहातो ही दुर्वांची जुडी, सीमेवरून परत जा, देव दिनाघरी धावला, उघडले स्वर्गाचे दार इत्यादी.

दिलीप कोल्हटकर : नट, दिग्दर्शक, प्रकाशयोजनाकार अशा विविध भूमिका बजावित असलेला तरुण कलावंत. भूमिका–जास्वंदी, हमीदाबाईची कोठी. प्रकाश योजना–दिग्दर्शन देणाराचे हात हजारो, उघडले स्वर्गाचे दार, उचल बांगडी इत्यादी.

मधुसूदन कोल्हटकर : नट, निर्माता. एकच प्याला (सुधाकर) बेबंदशाही (संभाजी) ही नाटके नि या भूमिका सातत्याने सादर करतात.

⁂ स्वप्न नटसम्राटाचे

'मला कधी गाणं ऐकावासं वाटलं तर मी बालगंधर्वांच्या नाटकाला जातो.'

–अल्लादिया खासाहेब

'बालगंधर्वांच्या कीर्तिचंद्राला उदय, मध्य आणि अस्त या अवस्थाच माहीत नाहीत.'

–गोविंदराव टेंबे

'विधात्याने बालगंधर्वांना जणू काय नाट्य–काव्यसंगीत–चित्र आणि शिल्प या ललितकलांची एकरस मूस ओतून तिलोत्तमेप्रमाणे ईर्षेने निर्माण केले. बालगंधर्व हा केवळ एक नट गायक किंवा केवळ एक सौंदर्याचा आदर्श नसून, नाट्य, संगीत, काव्य, चित्र आणि शिल्प या ललित कलांचे निधान आहे.... गंधर्व नाटक मंडळीची रंगभूमी म्हणजे जणू काय गंधर्वलोक! अलका आणि अमरावती यांचे सारे वैभव त्या रंगभूमीवर एकवटलेले... बालगंधर्व म्हणजे त्या रंगभूमीची जणू उर्वशी!'

–ग. त्र्यं. माडखोलकर

बालगंधर्वांना ऐन उमेदित आपल्या साऱ्या कलावैभवानिशी पाहिलेल्या मान्यवरांचे हे काही सहजोद्‌गार ! शेकडो रसिकांच्या मनी मुखी, हे असेच कौतुकाचे बोल घोळत होते. आजही बालगंधर्व हे नाव जुन्या पिढीच्या कानावर पडताच, ती मंडळी क्षणात तरुण होऊन, साक्षात जणू नारायणरावांचे सौभद्र, मानापमान, स्वयंवर, एकच प्याला पहात आहोत, अशा आनंदात त्यांच्या अनेक आठवणी, तरुण पिढीला मोठ्या उत्साहाने ऐकवित असतात; पण आजच्या तरुणांच्या लेखी ते एक स्वप्न ठरले आहे. सुलेमानचा खजिना नाहीतर गुलबकावलीचे फूल झाले आहे.

नाही हो, अगदी काल परवापर्यंत, ते स्वप्न नव्हते सत्य होते. तीन पिढ्यांनी डोळे भरून पाहिलेले ते एक निखळ सत्य होते. नारायणराव बालगंधर्व हे रसिकांचे दैवत २५ ऑक्टोबर १९०५ गुरुद्वादशीच्या सुमुहूर्ती रंगभूमीवर अवतीर्ण झाले नि मराठी मनाला 'आनंदाचे डोही आनंद तरंगे' अशा सुखसागरात तब्बल पन्नास वर्षे न्हाऊमाखू घालून ५ जून १९५५ पहाटे–वटपौर्णिमेला, गडकऱ्यांच्या दैवतास्वरुप सिंधूची वेषभूषा उतरून अंतर्धान पावले. उरले ते कलेची कवचकुंडले उतरलेले गलितगात्र नारायणराव राजहंस ! पण तरीही मोत्याचा चारा खाणारा राजहंसच ! तुम्हाला आश्चर्य वाटेल त्याही विकलांग अवस्थेत, ते स्वप्न पहात होते, भव्यतेची, दिव्यतेची, ताजमहालची आणि कैलासलेण्याची.

पुण्यात विष्णू रामचंद्र तथा बापूसाहेब परांजपे यांच्याकडे त्यांचा महिनोगणती मुक्काम असे. बालगंधर्व हे बापूसाहेबांचे दैवत. नारायणराव आले की कोर्टकचेरीला सुट्टी. गाणं बजावणं नि नारायणरावांची सेवा हे एकच काम. नारायणरावांना भेटायला येणाऱ्या मंडळींची उठबस करण्यात दिवस कसा जात असे हेच समजत नसे. पाच पन्नास कप तरी रोज नुसता चहा होत असे. दूध–कॉफी निराळी. नारायणराव अगदी खुशीत असत. बापूसाहेबांच्या घरची सगळीच माणसं एखाद्या राजासारखी बडदास्त ठेवीत. पाणी प्यायला चांदीचे तांब्याभांडे, मागतील तेव्हा केशराचं दूध. तुमचा विश्वास बसणार नाही, पण नारायरावांना बेडपॅन दिलं, तर बापूसाहेब त्यात आधी युडिकोलन टाकीत असत.

बालगंधर्व एक दिवस (१९ जानेवारी १९६१) असेच दोन लोडांच्यामध्ये तक्याला टेकून (टेकवून म्हणा हवं तर) डोळे मिटून बसले होते. जणू आपल्या गतवैभवाच्या जीवन–नाट्याच्या पडद्याच्या दोऱ्या ओढीत, आपलीच शालूशेल्यातली स्वरूपगर्वा भामिनी, रुक्मिणी, सिंधू पहात होते. तंद्रीतून जागे होताच म्हणाले, ' मायबापा, हसू नका; पण माझ्या मनात अजून एक कंपनी काढण्याची इच्छा आहे. कंपनीचं नाव ठेवायचं ' जयहिंद नाट्य मंडळी, पण

ही कंपनी सरकारी बरं का ? त्यासाठी मी आमच्या बापूसाहेबांना घेऊन नेहरू, राधाकृष्णन यांना भेटणार आहे. ती फार चांगली माणसं आहेत. 'नाही' नाही म्हणायची. चौपाटीवर खूप मोठं थिएटर बांधायचं. पाच हजार सीट्स तरी हव्याच. मराठी–उर्दू–हिंदी सर्व भाषेत नाटक करायची. पहिला खेळ मात्र आपल्या अण्णासाहेबांच्या सौभद्राचा हं ! कंपनीची माणसं थिएटरवरच रहायची. तालमीचा खूप मोठा हॉल हवा. सारख्या तालमी हव्या. बायकांची कामं आता बायकाच करणार. त्यांना रहायला स्वतंत्र खोल्या हव्या. त्यांच्या गाण्याची तालीम आपल्या चंपूताई (हिराबाई बडोदेकर) घेणार. थिएटरमध्ये हत्यारे निराळी. तालमीला निराळी. तुम्हाला माहीत नाही, ऑर्गेनची ने– आण करण्यात फार खराबी होते. देवा या खेळांना खूप गर्दी होणार. परदेशचे राजे, पुढारी अशी बडी-बडी मंडळी पंडितजींच्या बरोबर नाटक पहायला येणार. ड्रेपरी, सीनसिनेरी अशी करू की, भाषा नाही समजली, तरी त्यांना गाण्याभिनयातून नाटक समजेल. देवा, अशी बडी मंडळी आली की, पोलीस लोकांना खूप त्रास होतो. त्यांच्या बायका–मुलांना खेळांचे पास द्यायचे बरं का ? '

थिएटर कुणी बांधायचे, तालमी कुणी घ्यायच्या, चाली कुणी लावायच्या, एक ना दोन, प्रत्येक गोष्ट ते मनापासून सांगत होते. एका नटसम्राटाचं, कल्पना–कुबेराचं ते पहाटस्वप्न होतं. कुणी सांगावं कदाचित होईलही खरे !

नारायणराव पुण्यातच १९६७ च्या जुलैत गेले. त्यांच्या अस्थी बापूसाहेबांनी जपून ठेवल्या होत्या. ते स्वतः अलाहाबादला जाऊन त्यांचे विसर्जन करणार होते; पण त्यांच्या कामाचा व्याप नि तब्बेत यातून ते अखेरपर्यंत घडले नाही. १९८१ च्या ऑगस्टमध्ये बापूसाहेब वारले. नारायणरावांच्या अस्थी एका चांदीच्या डब्यात ठेवून, वर भगवद्गीता ठेवलेली असे. लोक म्हणत, 'अस्थी घरात ठेवणं अशुभ आहे. नारायणराव भूत होऊन तुमच्या मागे लागतील.' त्यावर बापूसाहेब सांगत, 'निदान मला तरी या अस्थींसारखे दुसरे काहीच शुभ नाही. नारायणराव भूत झालेच तर आधी करीत होतो तसेच त्यांचे सारे काही करीन.'

शेवटी बापूसाहेबांचे सुपुत्र डॉक्टर बाळ (रामचंद्र विष्णू परांजपे) नि डॉ. प्रकाश यांनी अलाहाबादला जाऊन आपल्या वडिलांच्या अस्थींबरोबरच नारायणरावांच्या अस्थींचेही त्रिवेणी संगमात विधीपूर्वक विसर्जन केले. मला वाटतं, त्यावेळी बालगंधर्वांच्या अस्थीतूनही आवाज उमटला असेल, 'देवा, कसे चालले आहेत आपले खेळ ? '

❋ हेचि दान देगा देवा !

बुवांनी 'हेचि दान देगा देवा' सुरू केले, की श्रोत्यांना कीर्तन संपल्याचे समजते 'ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण' म्हणून सांगावे


लागत नाही. मी पण माझ्या 'नाट्यपंढरीच्या' वारीची गेलं वर्ष दीड वर्ष खांद्यावर घेतलेली पताका, 'स्वप्न नटसम्राटाचे' ही बालगंधर्वांची अखेरची आठवण सांगून खाली ठेवीत आहे.

मी सुरवातीलाच सांगितले होते की, हा रंगभूमीचा इतिहास नाही. या आहेत केवळ आठवणी. त्या जशा भावल्या तशा तुम्हाला सांगितल्या. फुलं जमविली नि तुमच्या ओंजळीत टाकली. आपल्याला नाट्यसुगंध लाभावा, क्षणिक का होईना, आपला आनंद उजळावा एवढाच हेतू! प्रत्येक फुलाचा रंग वेगळा. गंध वेगळा. या आपल्या मराठी नाट्यसृष्टीत इतक्या वेगवेगळ्या मकदूराचे समर्थ कलावंत होऊन गेले आहेत नि आजही आहेत की त्यांनी या रंगभूमीवर एक आगळीच किमया घडविली आहे. मराठी रंगभूमीची वाटचाल मंदावण्याच्या, तो प्रवाह खंडित होण्याच्या अनेक अशुभ वेळा आल्या पण हाडाच्या कलावंतानी कष्टांची तमा बाळगली नाही नि रसिकांनी पाठ फिरवली नाही. 'आलिंगिजे चंदु प्रकटता' हे चंद्र-कुमुदिनीचे नाते जिवंत राहिले. अतूट राहिले. म्हणूनच ही नाट्यगंगा आज दुथडी भरून वहात राहिली आहे.

रसिकहो, या आठवणी म्हणजे मधुकरी आहे. 'फोडिले धन्याचे भांडार, मी तव हमाल भार वाहे.' अशी माझी हमालाची भूमिका आहे. लहानपणी अडुळशाच्या फुलात मध असतो म्हणून अनेक फुलं खुडली. मोठेपणी नाटकाच्या नादाने, नाट्यसुगंध दरवळत रहावा म्हणून अनेक थोर कलाकारांच्या अंगणातली ही आठवणींची फुलं वेचली. माझा भोळा भाव सांगतो, की या आठवणी म्हणजे जुन्या भव्य वाड्यांचे पडके अवशेष आहेत. विटलेले का होईना, पण रंगभूमीचे शाबूत शेले आहेत; पण त्यातूनही आजच्या पिढीला एके काळच्या त्या संपन्न वास्तूचे, वैभवशाली मराठी रंगभूमीचे दर्शन घडविण्याइतका त्याचा पोत सुरेख आहे. श्रीमंत आहे. ते मोठेपण त्या वस्त्रांचे. माझ्या शब्दांचे खचित नव्हे.

सुजनहो, आपणही या आठवणींना दाद देत आलात. कौतुक करीत आलात. म्हणून तर मी वेड्यासारखं लिहित राहिलो. मी आपला अत्यंत ऋणी आहे; पण खरे कौतुक करायला हवे, ते ज्यांनी आपली भेट घडवून आणली, त्या दिलीप नि श्रीभाऊ (श्री. ग. मा.) या माजगावकर बंधुंचे. त्यांनी मला हात धरून लिहायला बसविले. लिहून घेतले. नाही तर 'चौकटीत बसणारा' माणूस नाही मी. मी आहे आपला अघळपघळ. पण 'माणूस'च्या सर्वच मंडळींनी सुरेख साथ दिली नि सांभाळून घेतले. त्यांच्या उपकारांचं ओझं मला न पेलण्याइतके मोठे आहे. तर रसिकहो, पुन्हा एकदा आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून — 'हेचि दान देगा देवा....'

नाट्यपंढरी




REFBK-0024616

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.